म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय नाटक
ग्रं. क्र. सन १८८८

१७५ सन १८८८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
(ठाणें जिल्हा वाचनालय) वाचनालय/नौपाडा.
पु. नांव - भाग्य मनोरथ ओपला
ले. - भोळ. वि. वि.
विषय - नाटक

१७५

नाटक

अनु - [illegible]

# प्रस्तावना.

नाट्यकला ही ह्या भरतखंडांत प्राचीनकालीं मूळ उत्पन्न होऊन तिचा फारच उत्कर्ष झाला होता. विक्रमादित्य, हर्ष, भोज, शूद्रक वगैरे राजे, या कलेचे पोशिंदे असल्यामुळें कालिदास, भवभूति, धावक, विशाखदत्त इत्यादि अनेक कवींनीं सुरस नाटकें रचून पूर्वी त्यांचे प्रयोग करून दाखविले; व ते लोकप्रिय होऊन, त्यांनीं आपल्या कीर्तीचे ध्वज अजरामर या भूतलावर उभारले; हें हल्लीं उपलब्ध असलेल्या त्यांच्या नाट्यग्रंथावरून सिद्ध आहे. अशी ही भरभराटीच्या शिखरास जाऊन पोहोंचलेली कला ह्या देशावर अनेक दुर्धर परचक्राचे प्रसंग आल्यामुळें, अजमासें बाराव्या शतकापासून जी बंद पडली होती तिचा ऊर्जित काल पुन्हां एकोणीसाव्या शतकांत झाला.

इ. स. १८४२ या वर्षी आमचे तीर्थरूप **विष्णु अमृत भावे ऊर्फ विष्णुदास** यांनीं महत्प्रयासानें, त्या कलेचें पुनरोज्जीवन केलें. ती त्यांची कृति लोकमान्य होऊन त्यांनीं मोठी कीर्ति संपादिली. पुढें ह्या कलेकडे पुष्कळ विद्वानांचें लक्ष लागून बरेच नवीन नाट्यग्रंथ झाले व अनेक प्रयोगही त्यांनीं केले, हल्लीं तर हजारों लोकांचा हा धंदा होऊन ते यावर गुजराण करीत आहेत, आणि हें एक मोठें जनमनोरंजनाचें साधनच होऊन बसलें आहे.

ह्या नाट्यकलेचें पुनरोज्जीवन आमच्या वडिलांपासून झाल्यामुळें व घरीं बारमहा या विषयाची चर्चा चालत असल्यामुळें नवीन नाटकें वाचण्याचा व प्रयोग पाहण्याचा छंद फार

दिवसांपासून आहे. या विषयावर जरी मी आजपर्यंत ग्रंथ लिहिलें आहे तरी प्रसिद्धपणें जगापुढें येण्याचा हा माझा पहिलाच प्रसंग आहे. ग्रंथरचनेचें काम मोठ्या विद्वत्तेचें आहे व तशी विद्वत्ता माझे अंगीं नाहीं. परंतु "काव्य करावें नच भ्यां वचकावें दूषितो परी लघुस। कां सदन न बांधावें कीं त्यांत पुढें बिळें करिल घूस॥" हें पंतवचन मनांत आणून धाष्टर्य करून मी ही पंचांकी शोकरसप्रधान नाटिका विद्वज्जनांस सादर करीत आहें; तर ते "हंसक्षीर न्यायानें" तींतील गुण ग्रहण करून दोष टाकितील अशी आशा आहे.

ह्या नाटिकेचें कथानक कल्पित असून तें शोकपर्यवसायी आहे. ह्या तऱ्हेचीं नाटकें संस्कृत भाषेंत नसल्यामुळें त्यांचा प्रघात पूर्वीपासून नाहीं; परंतु इंग्रजींत अशीं नाटकें पुष्कळ आहेत; व तीं आनंदपर्यवसायी नाटकांपेक्षां प्रेक्षकांच्या मनावर चांगला परिणाम वठवितात; ह्मणून हें नाटक शोक परिणामीं रचिलें आहे. यांतील भाषा, ग्रांथिक न घालतां, बोलण्याच्या प्रघातांत जशी आहे, तशी घातली आहे. व्याकरणरीत्या जरी ती अशुद्ध आहे, तरी प्रयोग करण्यास हीच भाषेची पद्धती पुष्कळ विद्वानांस मान्य असल्यामुळें, ती तशी ठेविली आहे.

सांगली, ता. २० मार्च सन १८८८.

ग्रंथकर्ता.


त्यजंति शूर्पवद्दोषान् गुणान् गृण्हंति साधवः
दोषग्राही गुणत्यागी चलनीरिव दुर्जना ॥

# या नाटकांतील पात्रें.

| | |
|---|---|
| सारंगदेव .... | .... विलासपूरचा राजा. |
| रणदेव .... | .... सारंगदेवाचा प्रधान. |
| चंद्रसेन ........ | सारंगदेवाच्या पूर्वीच्या प्रधानाचा (संग्रामसिंहाचा पुत्र ( नायक. ) |
| रतिपाळ .... | ....चंद्रसेनाचा मित्र व वासंतिकेचा नवरा. |
| हरपाल .... | .... तुरुंगावरील अधिकारी. |
| नारायणप्रसाद .... | न्यायाधीश. |
| मणिपाळ .... | .... एक सरदार. |
| विद्याधर दीक्षित.... | राजगुरु. |
| गोपालसिंग .... | सुवर्णपूरचा वकील. |
| रणछोडदास ... | एक किराण्या जिनसाचा व्यापारी. |
| वल्लभ .... | .... रणछोडदासाचा गुमस्ता. |
| रमाकांतबुवा .... | राजवैद्य. |
| शंकरजी .... | .... रणदेवाचा हुजऱ्या. |
| दौलतसिंग .... | सांडणीस्वार. |
| रामजी .... .... | चंद्रसेनाचे हुजरे. |
| गणोजी .... .... | |
| यदुवीर ... | .... राणीवशांतील हुजऱ्या. |
| इंदुमति .... | .... सारंगदेवाची राणी. |
| कमला .... | .... सारंगदेवाची मुलगी (नाइका.) |
| वासंतिका.... | .... कमलेची माऊसबहीण. ( रतिपाळाची स्त्री. ) |

## भग्नमनोरथनाटिका. पात्रें.

| | | |
|---|---|---|
| चंपकमाला | .... | रत्नपूरच्या राजाची कन्या चंद्रसेनावर प्रीति जडलेली. |
| सुंदरी .... | ... | कमलेची दासी (वेषधारी चंपकमाला) |
| आनंदी .... | .... | कमलेची दासी. |
| गजरा .... | .... | राणीची दासी. |



# भग्नमनोरथ नाटिका.

## अंक १.

**प्रवेश १. स्थळ जयनगर एथील प्रधानाचें घर.**

( चिंताक्रांत चंद्रसेन लोडाशीं टेंकून बसला आहे. )

**चंद्रसेन**–( आपल्याशीं ) काय करावं मोठी पंचाईत आहे ! मामासाहेबांचा विचार आहे कीं, माझं लग्न त्या लढाईंतून हिरावून आणलेल्या रत्नपूरच्या राजकन्येशीं करावं. बरेच वेळ त्यांनीं ती गोष्ट मजजवळ काढिली, परंतु मला कांहीं उघड सांगतां येईना. " एकीकडे आड आणि एकीकडे विहीर " अशी माझी स्थिति झाली आहे कारण, तिकडे माझी प्रिया कमला, हिला तर हे पंचप्राण मीं कधींच अर्पण केले आहेत आणि इकडे मामासाहेबांचं असं ह्मणणं. ( थोडावेळ विचार करून ) पण नाहीं. व्यर्थ कां मी घुचकळ्यांत पडलों आहें ? जें एकवार ठरलं आहे तेंच कायम.

( इतक्यांत रतिपाळ येतो. )

**रतिपाल**–कां रावसाहेब कसं काय आहे ? काय विचार चालले आहेत ?

**चंद्रसेन**–( त्याजकडे पाहून ) कोण, रतिपाळ काय ? ये गे कांहीं नाहीं, सहज बसलों आहें.

**रतिपाळ**–( त्याच्या शेजारीं बसून ) गड्या कांहीं ह्मण पण अलीकडे तुझी चित्तवृत्ति बदललेली दिसते. केव्हांही

पाहिलं तरी तूं चिंताग्रस्त भांबावल्यासारखा दिसतोस. काय असेल तें असो; मला तर कांहीं याचं कारण समजत नाहीं.

चंद्रसेन—अं:, तसं कारण ह्मणशील तर कांहीं नाहीं, परंतु दीड वर्ष झालं, आपण या मोहिमेवर आहोंत; या मुळं माईसाहेबांना आणि कमलेला भेटण्याची उत्सुकता होऊन, एकदां त्यांना केव्हां पाहीनसं झालं आहे. त्यांत बरेच दिवसांत तिकडचं पत्र नाहीं, यामुळं विशेष काळजी लागली आहे दुसरं काय!

रणपाल—अं: ! त्यांत काय आहे ! इतके दिवस गेले तसेंच थोडा दम धरा आणि त्या जिंकून आणलेल्या सुंदर पुतळीची भट घेऊनच त्यांच्या दर्शनास चला ह्मणजे झालं.

चंद्रसेन—वाहवा ! तुझी आपली सदा थट्टाचनं ! (बोलण्याचा ओघ फिरवून) अरे पुतळी काय आणि मोहोर काय ! खरोखर माईसाहेबांचे जे मजवर उपकार आहेत, ते जन्मोजन्मीं आपल्याच्यानं फिटणार नाहींत. जन्म देणारे आईबाप लहानपणींच मला सोडून गेले, तेव्हांपासून पोटच्या पोरापेक्षां अधिक प्रेमानं माझा प्रतिपाल त्यांनीं केला. अहाहा ! किती तरी त्यांची ममता मजवर आहे ! आपणाला इकडे पाठवितेवेळीं नाहीं कां तूं पाहिलंस ? मामासाहेबांनीं अत्याग्रह केला, तेव्हां कुठं पधरा दिवसांत परत पाठविण्याच्या बोलीनं मला इकडे धाडिलं; नाहीं तर, आजपर्यंत अशी बोलावणीं किती येऊन गेलीं ! ह्यावेळीं तरी काय ! मामासाहेब स्वतः आल्यानं, माईसाहेबांचं कांहीं चालेना. त्या पंधरा दिवसांच्या बोलीला, दीड वर्ष झालं, तरी आपण तिकडे

गातोंच आहोंत ! त्या काय बरं ह्मणत असतील आह्माला. या रत्नपूरच्या मोहिमेवर गेल्यानं, असा घोटाळा झाला. रत्नपुरास त्यांजकडून आलेलं पत्र तूं पाहिलसंच; त्यांत त्यांनीं किती बरं दोष दिला आहे आपल्याला ? आतां भेटलों ह्मणजे चांगली पूजाच आहे !

रतिपाल—खरंच सांग गड्या, त्यांत काय बरं आपलं नुक-सान झालं ? आमचा आग्रह पाहून मामासाहेबांनीं आह्मांला त्या मोहिमेवर नेलं; त्यामुळं चार देश पाहण्यांत आले, उभ-यतांना जाहगिरी मिळाल्या आणि तुझ्या पराक्रमाची कीर्ति झाली. प्रसंगावांचून मनुष्याच्या अंगचा खरा गूण तरी कसा समजणार ! नाहीं तर हाच तूं विलासपुरांत असतास ह्मणजे काय ? सुग्रास खावं, हिंडावं फिरावं, फारच झालं तर एकादे दिवशीं शिकारीस जावं कीं झालं; येणेंकरून तुझी कीर्ति कां होणार होती ? आणि ती चंद्रवदना चंपकमाला कोठून बरं मिळाली असती !

चंद्रसेन—अरे वेड्या कुठली चंपकमाला आणि कुठलं काय घेऊन बसला आहेस ! तो मामासाहेबांचा सर्व विनोद आहे. माझ्या प्रेमसौख्याची खाणी माझी सुंदर प्रिया असतां मी हें कशाला मनांत आणूं !

रतिपाल—छी: ! त्यांत शंकाच नको मामासाहेबांचा तर तिच्याशीं तुझं लग्न करण्याचा पक्का विचार ठरला आहे. का-लच माझं आणि त्यांचं या संबंधानं बोलणं झालं. आणि खरंच सांग तुझ्या तरी मनांत हें नसेलचनारे ! अरे मित्रा, हे बहाणे कोणाजवळ ?

चंद्रसेन—वाहवा ! भलतंच कांहीं तरी ! हें पहा त्या

बिचारीचे आईबाप त्या लढाईत कुठं नाहींसे झाले, यामुळं ती अगोदरच दुःखानं पोळत आहे आणि त्यांत असा, हा भलता जुलूम तिजवर करणं, ह्मणजे किती अन्याय बरं? तूंच विचार कर.

**रतिपाल**–मी पूर्ण विचार केला आहे. अरे बुवा कामराजाचा तडाखा कांहीं वेगळाच आहे ! त्याच्या पुढं सुख, दुःख, न्याय, अन्याय हीं सारीं लटपटून जातात. तूंच पहा, ज्यावळीं तूं तिला छापा घालून धरलीस, त्या वेळीं काय तिनं आकांत केला; रडून रडून आकाश पाताळ एक केलंन. कांहीं दिवस तर अन्नपाणीही वर्ज केलंन, पुष्कळांनीं नाना तऱ्हेनं समजून सांगितलं. पण कोणाचंहि ऐकेना; तेव्हां पण आपणच ना गोंजारून गोड गोड भाषणांनीं तिला ताळ्यावर आणलीत; त्या दिवसापासून तिनें आपल्याला पाहिलंन, ह्मणजे जी कांहीं तिची वृत्ति होते तुला सांगूं? आहाहा ! त्याचं वर्णन सुद्धां करवत नाहीं. आपल्याला अनुभव आहेच ह्मणा, मी सांगावं असं नाहीं.

**चंद्रसेन**–वाहवा वाहवा ! फारच खाशी कल्पना ! स्त्रिया तारुण्याच्या बहरांत आल्या, ह्मणजे सहजी त्यांचे विलास कोकांच्या मनांत असले भलभलते संशय आणण्यास कारण होतात; तसंच हेंहीं आहे.

**रतिपाल**–सर्वच उडवाउडवीचं जर बोलूं लागलास तर कसं चालेल? वारंवार तुझ्या पुढं पुढं करणं, स्मित हास्ययुक्त वक्रदृष्टीनें तुजकडं पाहणं, वरचेवर तुजशीं बोलणं, नाना तऱ्हेचे पदार्थ तुजकडे करून पाठविणं, वेळोवेळीं एकांतीं गाठीचे प्रसंग आणणं, असे जे नेहमीं तिचे खेळ चालले

असतात त्याचा अर्थ काय बरं ?

**चंद्रसेन**—तें कांहीं असो. आपला जो एकदां निश्चय झाला आहे, तो कधींही ढळणार नाहीं. आतां या प्राणाचा धनी मी नाहीं; समजलास ?

**रतिपाल**—हँः ! तुला पुष्कळवेळां सांगितलं तरी तुझं तें आपलं आहेचना ? वेड्या ! व्यर्थ कशाला तूं ती आशा धरून बसला आहेस ! हातचं सोडून पळत्याच्या पाठीं लागण्यांत काय बरं अर्थ आहे ? बाबा, ते सारे बाळपणचे विनोद; ते कुठं खरे कां झाले आहेत ? त्यांतून एक कमलेच्या मनांत तसं आहे ह्मणा, पण माईसाहेबांना व राजेसाहेबांना तो विचार पसंत पडला पाहिजेना ! आपल्यावर राजेसाहेबांचं पूर्वीपासून फारच प्रेम आहे ! त्यांत हल्लीं तर वृत्ति कशी झाली आहे तें तुला माहीतच आहे. तुला सांगतों आला लाभ पदरीं घ्यावा कारण, हातचा बाण एकदां गेला कीं, पुन्हां तो हातीं येणं नाहीं; आणि त्यांतून चंपकमाला बाईंत कां आहे ? (थोडा वेळ थांबून ) पण गड्या या नादांत मी सारंच विसरलों. आतां हेंच मला घरचं लवकर येण्याबद्दल पत्र आलं आहे; त्यांत तुजविषयींही थोडा मजकूर आहे.

**चंद्रसेन**—पत्र कुणाचं आक्कासाहेबांचं वाटतं ? पाहूं पाहूं काय लिहिलं आहे तें ?

**रतिपाल**—पत्र एथें मजजवळ नाहीं; पण त्यांतील हकीगत. तुला सांगतों महेश्वरच्या छावणींतून या मोहिमेची सविस्तर हकीगत मी घरीं लिहिली होती; त्यांत तूं जीं मोठ्या जिवावरचीं शौर्याचीं कामें केलींस तीं, व आपली मोठी

बहादुरी होऊन जी जहागीर आम्हांस मिळाली त्याबद्दलची एकंदर हकीगत लिहिली होती. तें पत्र कुठ कमलात ईच्या हातीं गेल तें वाचून पाहातांच तिला फार आनंद झाला. त्या भरांत तिनं आमच्या घरीं जो कांहीं तुझ्या स्वरूपाची गुणाची आणि स्वभावाची तारीफ केली ती कांहीं पुसू नको! तशांत तिनं आपला निश्चयही पण बोलून दाखविला, कीं, वरीन तर तुलाच. नाहीं तर सारा जन्म तसा काढीन. तें पत्र पाहिलंस म्हणजे तुला समजेल! त्यांतच आपल्यासह लवकर निघून येण्याविषयीं लिहिलं आहे एक दोन दिवसांत पत्र घेऊन माईसाहेबांकडून सांडणीस्वारही येणार आहे आपल्याला न्यावयाला.

चंद्रसेन–वाहवा! याचंच नांव वचन! मित्रा, मी कृतकृत्य झालों खरोखर गेल्या लढाईंत मी मोठा पराक्रम करून जय मिळविला, त्याचा सुद्धां इतका आनंद मला झाला नाहीं. पाहूं पाहूं कुठं आहे तें पत्र? पत्र अक्काचं असलं तरी मला पहावयाला हरकत नाहीं.

रतिपाल–हरकत कसली? पण त्यांत यापेक्षां विशेष मजकूर काहीं नाहीं पत्रच पाहिजे असेल तर मी देईन.

( इतक्यांत रामजी जासूद प्रवेश करतो व मुजरा करून )

रामजी–इलमपुरासन योक सांडनीस्वार पतर घेऊनशानी आलाया सरकार; हुकूम व्हईल तर धाडूनशानी देतों.

चंद्रसेन–वाहवा! जा जा त्याला घेऊन ये लवकर वर.

रामजी–जी साहेब. ( निघून जातो व स्वारासह येतो. )

चंद्रसेन–कोण? दौलतसिंग कब आये?

दौलतसिंग–जी सरकार अबी आया.

**चंद्रसेन**-रानीसाहेब, माईसाहेब, अक्कासाहेब और ताई-साहेबकी तबीयत अछी है ना ?

**दौलतसिंग**-हां जी सरकार, सबकी तबीयत अछी है. (पत्र पुढें करून) यह रानीसाहिब और ताईसाहेबका खत है. और महाराज इन दोनो महाराजको आपको मिलनेकी बहुत ख्याल लग रही है; वास्ते आपकूं जलदी बुलाया है.

**चंद्रसेन**-बहुत अच्छा. कोण आहे बाहेर ! **रामजी** जा यांच्या शिधापाण्याची सर्व तरतूद कर.

**रामजी**-जी सरकार.

(दौलतसिंग व रामजी मुजरा करून जातात)

**चंद्रसेन**-(लाखोटा फोडून पत्राकडे पाहून) वाहवा! खुद्द हातचें पत्र आहे. (पत्र वाचण्यास लागतो) सकल-गुणैश्वर्यसंपन्न विजयश्रीमंडित प्रियकर **चंद्रसेनरावसाहेब** मुक्काम **जयनगर** यांस आल्यारीं; अरे वा: कायही विशेषणाची गर्दी ! बरं पुढं काय आहे? (पत्राकडे पाहून) चरणीं लीन दासी **कमला** हिची करद्वय जोडून विज्ञाप्ति कीं, आपलेकडून तीन महिन्यांत पत्र नाहीं; यामुळे जिवास फार काळजी लागली होती, परंतु नवाबसाहेब **रतिनाकररावांचें** पत्र आलें तें पाहून व आपल्या विजयाची सुवार्ता ऐकून, मला व माईसाहेबांना जो आनंद झाला तो नाहीं लिहितां येत नाहीं. आपल्या भेटीला किती तरी दिवस झाले बरं; आतां आपणाला केव्हां पाहीन-सं मला झालें आहे, यंदा माझें लग्न करण्याचा बाबांचा विचार आहे आणि त्यासंबंधानें खटपटही सुरू आहे; परंतु आपली वचनं पूर्वींच झालीं आहेत आणि शेवटपर्यंत माझा तोच निश्चय कायम आहे; तर कृपा करून हें पत्र पोहोंचतांच

घटकेचाही विलंब न करितां इकडे निघून यावें. माझे डोळे वाटेकडे लागले आहेत. कळावें लोभाची वृद्धी असावी ही विज्ञाप्ति, आपल्या भेटीकरितां तृषित झालेली, आपली लाडकी कमला. (थोडावेळ थांबून) आतां माईसाहेबांच्या पत्रांत काय बरं लिहिलं आहे? (पत्र मनांत वाचून) हंः! किती तरी मला भेटण्याची उत्कंठा त्यांना लागली आहे! हो कां न लागावी? त्यांचं प्रेमच मजवर तसं आहे! कां रतिपाळराव पाहिलीत कां हीं पत्रं? (पत्रें त्याजपाशीं देतो) आतां मात्र गड्या एथून लवकर निघालं पाहिजे.

**रतिपाल**–(पत्रें वाचून) माझ्या मनांतून केव्हांच निघावयाचं होतं, परंतु मध्यंतरी हें तुझ्या लग्नाचं निघालं, त्यामुळं जाण्याची गोष्ट मला मामासाहेबांपाशीं काढतां येईना.

**चंद्रसेन**–बर पण दोन्ही पत्रं तूं वाचलीसना? आतां आहे कां शंका?

**रतिपाल**–अरे कमलाताईविषयीं मला शंकाच नव्हती पण माईसाहेब व राजेसाहेब त्या कृत्यास अनुकूल पाहिजे-तना? माईसाहेबांच्या पत्रीं तर त्या संबंधानं कांहींच मजकूर नाहीं.

**चंद्रसेन**–हें पहा, त्याची शंकाच नाहीं. त्यांच्या मनांत हा विचार फार दिवस आहे. कित्येक वेळा माझ्या देखत त्यांनीं तें बोलून सुद्धां दाखविलं आहे; आणि तें तूं ऐकलंही असशील. असं असून मामासाहेबांच्या मतास मी कसं बरं अनुमोदन देऊं? पण गड्या आतां एक मात्र मोठी पंचाईत आहे. येथून आपल्याला निघावयाला परवानगी कशी मिळणार!

**रतिपाल**—अंः! त्याची काळजी बिलकुल करूं नको. कारण, मामासाहेबांचं जरी तसं ह्मणणं आहे तरी, तूर्त मुहूर्ताचे दिवस नाहींत, चार महिने अवकाश आहे, इतक्यांत तिकडे दोन महिने जाऊन भेटून येतों, ह्मणून सांगावं ह्मणजे झालं. येणेंकरून त्यांचंही एकिल्यासारखं होऊन आपला हेतु साधेल, व याला आणखी पाठबळ आजच्या पत्रांचं आहेच. समजलास ?

**चंद्रसेन**—ठीक आहे, हाच विचार. आजच ही गोष्ट काढून त्यांची परवानगी घेऊं, ह्मणजे उद्यां पहाटेच एथून निघण्यास बरं पडेल. देनों तर याच मजकुराचं पत्र स्वाराबरोबर; आणी आजच रवानगी करतों त्याची.

**रतिपाल**—अरे पण काय उतावळीपणा हा! अगोदर मामासाहेबांची परवानगी घेऊं, मग उत्तर पाठीव.

**चंद्रसेन**— बरं आहे चला तर आतांच मामासाहेबांकडं जाऊं. ( उठतो. )

( दोघे निघून जातात. )

---

## प्रवेश २.

### स्थळ—जयनगरच्या प्रधानाच्या घराची गच्ची.

( दुःखित अंतःकरण झालेली चंपकमाला प्रवेश करिते. )

**चंपकमाला**—( आपल्याशीं दुःखानें ) हर हर देवा! काय माझ्या प्रारब्धाचे खेळ होणार आहेत समजत नाहीं! हंः एकून त्यांना जाण्याचा विचार झाला अं! इतके दिवस माझा मनोरथ सफळ होईल, ही आशा मला होती; ती व्यर्थ झाली! पूर्व जन्मींचं कर्म संपून, सुखाचे दिवस येतील,

ह्मणून मी स्वस्थ होतें; पण आतां कोणत्या बरं आशे-वर मी हा सारा जन्म काढूं? देवा अशी कशाला रे या अभागिणीला तूं जन्माला घातलीस? सोन्यासारखं माझ्या बाबांचं राज्य गेलं! शेवटीं त्यांची आणि आईची काय वाट झाली हें कळत नाहीं! (डोळे पुसून) एकून मामासाहेबांच्या मनाला ते अनुकूल नाहींत अं! अहाहा! परमेश्वरा अशी कोण बरं ती दैवाची पुतळी असेल कीं, जिज-वर त्यांचं इतकं मन बसलं आहे? प्रियकरा असं जर तुमच्या मनांत होतं, तर इतक्या साहसानं कशाला बरं मला धरून आणलीत? एखाद्या मनुष्यास विहिरींतून निम्मे वर घेऊन जसा दोर तोडून टाकावा, तशी माझी स्थिती झाली आहे. देवा आतां मी काय करूं? त्या वेळीं मी दुःखानं अगदी पोळून गेलें होतें व आपल्या प्राणावर उदार झालें होतें. पण त्या वेळीं गोड गोड बोलून, माझं मन मोहून, आपल्या बरोबर घेऊन आलात; असं मेलं मधात्र बोट लाऊन आतां मला टाकून जाणं आपल्याला योग्य कां? काय करावं माझ्या बतीनं चार शब्द जाऊन कोणी सांगेल ह्मटलं, तर इथं माझ्या ममतेचं कोणी नाहीं. तशांतून ही मेली पराधीन स्थिति, काय बरं करावं? मीच जाईन ह्मटलं तर तें मजसारखीस योग्य नाहीं! बरं न जावं तरी पंचाईतच! (कांहीं वेळ विचारांत स्तब्ध राहून) कांहीं असो, आतां स्वतःच जाऊन एकदां शेवटची विनंति करावी झालं. (कांहीं वेळ विचार करून) हो आतांच तिकडं जावं हें बरं, कारण राजेपालराव बाहेर गेले आहेत, तेव्हां हाच संधी बरा आहे. (असें बोलून निघून जाते.)

---

## प्रवेश ३

स्थळ—जयनगर येथील प्रधानाच्या घरचा दिवाणखाना.

( चंद्रसेन छप्परपलंगावरील बिछान्यावर बसला आहे. )

चंद्रसेन —( आपल्याशीं ) एकंदर तयारी तर झाली. आतां फक्त निघण्याचा अवकाश. मी मोठ्या काळजींत होतों कीं येथून सुटका होते कशी ? पण झाली एकदाची. आम्ही जाणार ही हकीगत चंपकमालेला समजली नाहीं हें एक बरंच झालं आहे; नाहीं तर ती एक पचाईत निराळीच! असो, पण रातिपाळ कां बरं आला नाहीं अद्यापि? मध्यरात्र तर होऊन गेली. ( जांभई देऊन ) येईल आतां तोंपर्यंत थोडं पडावं पहाटे लवकर उठावयाचं आहे. ( पांघरूण घेऊन निजतो. )

( इतक्यांत चंपकमाला महालाच्या दारांत प्रवेश करिते. )

चंपकमाला—( आपल्याशीं ) अहाहा ! किती तरी निवांत वेळ आहे ही ! जगांतील सर्व व्यापार बंद झाले आहेत ! बाहेर अंधेर तरी किती पडला आहे ! डोळ्यांत बोट घातलं तरी दिसत नाहीं ! रातकिड्यांचा व बेडकांचा उदास शब्द ऐकूं येत आहे, त्यामुळं मनाला भीति वाटत आहे! जिकडे तिकडे लोक आनंदानं विश्रांती घेत आहेत. अहाहा ! निद्रा ही एक प्राणिमात्राला मोठी विश्रांती आहे खरी ! पण तें विश्रांतिसौख्य कुणाला ? मज सारख्या दुःखी जनाला कां हीं विश्रांती आहे ? देवा असं सौख्य आमच्या कपाळीं कुठलं ! दुःख आणि चिंता यांनीं ज्याचं मन व्यापलं आहे, त्याला सौख्य कुठलं आणि निद्रा तरी कुठली ! ( कपाळास हात लाऊन ) दैव समजावयाचं दुसरं काय ! ( थोडा वेळ स्तब्ध

राहून ) बरं पण अशा विचारांत वेळ व्यर्थ घालवून उपयोग नाहीं. महालांतही दुसरं कोणी नाहीं, तर दार बंद करून आपण आंत जावंच. ( आंत प्रवेश करून, चंद्रसेनास निजलेला पाहून ) अग बाई झोंप लागली वाटतं !

चंद्रसेन—( चाहूल ऐकून डोळ्यावरील पांघरूण काढून ) कोण आहे रतिपाळ, ( चंपकमालेस पाहून चपापून उठून ) ई: कोण राजकन्ये, येवढ्या रात्रीं तूं कुणीकडे !

चंपकमाला—तां बरं ? आपल्याला भेटायाला मीं येऊंच नये वाटतं !

चंद्रसेन—वाहवा ! मला भेटायला आणि ही वेळ !

चंपकमाला—हो असली म्हणून ? आपल्या माणसांना केव्हांही भेटायला कांहीं नड आहे कीं काय !

चंद्रसेन—ठीक ! (आपल्याशीं ) ज्या करितां भीत होतों तें आलंच शेवटीं कपाळीं; आणि त्यांतून, आजच्या बोलण्याचा रंग निराळाच आहे ! ( उघड ) तें खरं, पण मला भेटायला उद्यां दिवसा वेळ नाहीं कीं काय !

चंपकमाला—हो खरंच तें ! आजची संधी गेल्यावर उद्यां तें कुणाला भेटायचं ? उद्यां सकाळीं स्वारी येथून जाणार म्हणून ऐकलं ! खालीं तयारीही चालली आहे गडबडीनं.

चंद्रसेन—चंपकमाले उद्यांच जरी जाणार आहें तरी तुला भेटल्यावांचून कां मी गेलों असतों !

चंपकमाला—वाहवा ! एकून सर्वांबरोबर उभ्या उभ्या मलाही विचारून जायचं होतं वाटतं ! बरं पण आतां एकटंच कां जायचं तिकडे !

**चंद्रसेन**–कां बरं एकटा कां? **रतिपाल** आहे, शिवाय गडीमाणसं पुष्कळ आहेत.

**चंपकमाला**–तें खरं. ते **रतिपाल**राव आणि तीं गडीमाणसं जरी पुष्कळ असली, तरी पण स्वतःचे आपण एकटेचना?

**चंद्रसेन**–( हंसून आपल्याशीं ) आलं बरं जवळ ! (उघड ) हो तर मजबरोबर आणखी कोण बरं दुसरं येणार?

**चंपकमाला**–वाहवा ! ह्मणजे दुसरं कोणीच कां नाहीं आपलं इथं ? सुईमागं दोरा असायचाच; त्यानं बापड्यानं कुणीकडं बरं जावं ?

**चंद्रसेन**–वः ! राजकन्ये आज तुला भ्रांतीबिंती तर झाली नाहींना !. असें भलभलतें काय बोलतेस ? सुई कोण, दोरा कोण, मला तर बुवा यांतलं कांहीं कळत नाहीं !

**चंपकममाला**–अहाहा ! ठीक ! किती तरी मेलं वेड पांघरायचं ! जसं कांहीं समजलंच नसेल ! हो कसं समजेल मन कुठं आहे जाग्यावर ! तें मेलं कुठं नाहींसं झालं आहे कोण जाणे ! लोकांचीं मनं मात्र हरणकरून त्यांना पाशांत गोवायचं आणि आपला मात्र अंत लागूं द्यावयाचा नाहीं ! बरंच आहे हें ! !

**चंद्रसेन**– ( आश्चर्ययुक्त ) हंः! आतां आलं माझ्या लक्षांत. एकून **चंपकमाले** ते तुझ्या मनांतले भलते विचार अद्यापी गेले नाहींतनां ? तर ते दिवशींचा माझा उपदेश सर्व व्यर्थच झाला ह्मणावयाचा ! !

( **चंपकमाला** त्याच्या जवळ जाते व तो मागें सरतो. )

**चंपकमाला**–हें काय आतां एवढी भीड कशाला धरण

होत आहे? प्रियकरा उपदेशाचं फळ कुठं? ज्याचं मन जागीं नाहीं त्याला तो आपला सारा उपदेश पालथ्या घागरीवर पाणी ओतल्या प्रमाणं आहे! अहाहा! काय सांगूं जसा एकादा जादूगार एकाद्या मनुष्याला भारून टाकतो, अथवा एकादा गारोडी आपल्या पुंगीच्या नादानं नागिणीला गुंगवून डोलऊं लागतो, तसं प्रिया हा आपला मुखचंद्र पाहिल्यापासून हें मन वेडावून या चरणीं जें एकदां लुब्ध झालं आहें तें जाग्यावर कुठं आहे?

**चंद्रसेन**–हंः काय हें राजकन्ये, तुला वेड तर लागलें नाहीं ना? काय हें भलभलतं बोलतेस!

**चंपकमाला**–काय सांगूं! प्रियकरा उगीच भीत भीत कां ह्मणतां? मी आपल्याला पाहिल्यापासून अगदीं वेडी होऊन गेलें आहें; मला दुसरं कांहीं सुचत नाहीं, जेवतांखातां, निजतां, बसतां, सारखी ही मनोहर मूर्ती माझ्या मनांतून हलत नाहीं! तर प्रिया द्याना एकदां माझ्या वचनाला मान! मामासाहेबांच्या मनांतून तर हें फार दिवस आहे. फक्त मुहुर्ताचे दिवस येण्याचा अवकाश; तर प्रिया सांगा बरं या दीन अनाथ अबलेचे मनोरथ आपल्यावांचून कोण पुरविणार आहे?

**चंद्रसेन**–छी छी! राजकन्ये काय हें भाषण! तूं पूर्वी किती विनयसंपन्न होतीस; आणि आज तुझी ती सारी मर्यादा गेली तरी कुठं? विचार कर कांहीं.

**चंपकमाला**–विचार कसला? इतके दिवस मामासाहेबांच्या बोलण्यावर विश्वास ठेऊन मी स्वस्थ होतें, मला खचित वाटलं होतं कीं, माझे हेतु परिपूर्ण होणार; पण आज संध्या-

काळचं आपलं भाषण ऐकल्यापासून मला कांहीं सुचेनासं झालं आहे. प्रिया माझ्या या आशारूप वृक्षाचा जर मुळापा- च्छेद होणार, तर आतां विनय किती वेळ बरं धरूं! संध्याकाळपासून आपली एकांतीं गांठ पडणार कशी, ाचारांत मी होतें, तों दैवयोगानं ही वेळ सांपडली. तर नाथ आतां किती वरं मनुष्याचा अंत पहावयाचा? खरो- मी मेली आनंदांत मुहुर्ताचे दिवस कसे नखा बोटावर ीत होतें. काय सांगूं प्रिया आपल्यावांचून मला कांहीं चत नाहीं! माझ्या पुढील जन्माचं सुख किंवा दुःख हें सर्व या प्राणावर अवलंबून आहे. मामासाहेबांच्या कृपेनं मला कांहीं कमी नाहीं, पण काय करूं; ही कामव्यथा फार दुःसह आहे. त्या मेल्याची झडप एकदां कां या शरीरावर पडली, ह्म- णजे कोणत्या तऱ्हेनं दुःख होतं ह्मणून सांगूं? प्राणेश्वरा सुग्रा- स अन्न पुढं आणलं, तर तें मेलं नकोसं वाटतं, रात्रंदिवस झोप नाहींशी होते, त्यांतून थोडी लागली तर भयंकर स्वप्नं पडतात. खरोखर प्रिया हा आति दुःखानं पोळलेला जीव पुढील सुखाची आशा आहे ह्मणूनच्च इतके दिवस तरी राहिला आहे. आतां आपण जर माझा अव्हेर कराल, तर मी पुढं काय बरं करावं! जा गडे किती तरी माणसाचा अंत पहावयाचा? (जवळ जाऊन) मी आपल्याला हात जोडून विनंति करतों कीं, घ्या एकदां मला पदरीं आणि ह्मणा आपलीशी. (आंगावर हात टाकते.)

**चंद्रसेन**—(तिला मागें सारून साश्चर्य आपल्याशीं) हंः! काय चमत्कार आहे पहा! ही कामव्यथा मोठी अनिवार्य खरी! एकदां कां तिच्या तडाख्यांत मनुष्य सापडलं ह्मणजे काय

त्याची अवस्था होते? डोळे असून दिसत नाहीं, कान असून ऐकूं येत नाहीं, मन असून विचार नाहींसा होतो, फारच कठीण त्याची स्थिती अँ!! नाहीं तर हीच **चंपकमाला** कि[illegible] गुणी, सुशील, मर्यादशील पण सर्व एकीकडे राहून काय [illegible] स्थिति झाली आहे पहा! ( उघड ) **चंपकमाले** असं [illegible] ला योग्य नाहीं.

**चंपकमाला**—प्रियकरा काय बरं यांत माझं गैर आहे

**चंद्रसेन**—(आपणाशीं) हं: ही अशानं ऐकत नाहीं; दुसरीच कांहीं तरी तोड काढली पाहिजे. ( उघड ) राजकन्ये तूं ह्मणतेस त्याप्रमाणं कसं बरं साजेल? किती झालं तरी तूं राजकन्या आणि मी एका सरदाराचा मुलगा, तुझी न माझी बरोबरी कशी वरं होईल. हल्लीं जरी तूं या स्थितींत आहेस तरी **जयनगर**चे राजेसाहेब आपल्या मुलीप्रमाणं तुजवर लोभ करितात; शिवाय मामासाहेबांचेंही प्रेम तुजवर आहेच; ते लक्षावधी रुपये खर्च करून उद्या एखाद्या थोर राजपुत्राबरोबर तुझं लग्न करून देतील. आणि तेथें तुझे सर्व मनोरथ पूर्ण होतील. वेड्यासारखं मजसारख्या भिकाऱ्याला वरण्यांत काय बरं अर्थ आहे. मामासाहेब जरी पुष्कळ वेळां तसं बोलले तरी तो सर्व विनोद आहे.

**चंपकमाला**—पुरे मेलं या बोलण्यांत काय अर्थ आहे? प्रिया मनुष्याचनं आपल्या पराक्रमावर राज्य मिळवितात? हे सर्व मुळचेच का राजे आहेत? तशांतून मी आतां कसली राजकन्या! माझ्या बाबांचं राज्य गेलं, ते कुठं आहेत त्याचा ठाव ठिकाण नाहीं, आतां मी केवळ घातल्या अन्नाची आणि देतील त्या वस्त्रांची मालकीण झालें आहें. आपली स्थिति म-

नपरीस किती चांगली आहे ! असं असून व्यर्थ कां बरं मला हिणविता ? मी आपल्या मनास येत नाहीं असं पाहिजे तर ह्मणा ! पण प्रिया काय करूं हें मन मेलं वेडं आहे ! तें जें या चरणीं जडलं आहे, तें तेथून हालत नाहीं. मी आपल्याला शपथ देऊन सांगतें कीं, आपल्यावांचून जगांतील अन्य पुरुष मला पित्यासमान आहेत; तर प्रिया पुरे गडे आपला तो हेका. या मदनसंतप्त देहाला एकदां प्रेमालिंगन द्या. आणि म्हणा आपलीशी. किती तरी आतां चाळवण्या दाखवायाच्यां. ( आलिंगावयास जाते. ).

**चंद्रसेन**–( मागें सरून, विस्मरणानें ) प्रियसखे:– अरे:– ( स्तब्ध राहतो. )

**चंपकमाला**–अहाहा! धन्य झालें मी! प्राणनाथ पुन्हां एकदां तेच शब्द ह्मणा पाहूं ! देवा, किती तरी हे शब्द माझ्या मनाला आनंद देत आहेत ! आतां बाई माझ्या जिवांत जीव आला ! प्रिया बोला बोला पुढं काय तें.

**चंद्रसेन**–( आपल्याशीं ) अरे ! मला भान न राहून काय बरं हें मी भलतेंच बोललों ! ( उघड ) हर हर ! राजकन्ये काय ही तुझी स्थिति झाली आहे ! केस काय विखुरले आहेत, पदर काय अस्ताव्यस्त झाला आहे, शुद्धीवर ये; काय हा बेहोषपणा !

**चंपकमाला**–( पदर सांवरून ) प्रिया आतां इथं बरं कुणाला लाजायचं ? परकी कां कोणीं आहे इथं ! आतां हा सारा देहच मी आपणास अर्पण केला आहे ( आलिंगावयास पुढें सरते. )

**चंद्रसेन**–( रागानें ) राजकन्ये विवेक कर; विवेक कर.

काय हा विषयांधपणा ! असं भळभळतं कृत्य करण्यास काय तूं उद्युक्त झाली आहेस? हं: अज्ञान कां माझं मन वळेल..? छि: चल दूर हो ! ( तिला हातानें ढकलून ) शहाण्यानं अशा ठिकाणीं शब्द टाकावा कीं, जिथं त्याचं साफल्य होईल.

**चंपकमाला**–( डोळ्यास पाणी आणून ) नका हो नका अशी मला दूर लोटूं ! हर हर प्राणनाथ माझी कांहींच का हो आपल्याला दया येत नाहीं ! हाय हाय ! महाराज एकून या **चंपकमालेनं** सारा जन्म दुःखांत काढावा असं आपल्या मनांत आहेन ? अग आईग आतां मी काय करूं !! हे आई अहो बाबा तुह्मी कुठं हो मला सोडून गेला !! शिव शिव देवा आतां ही दीन दासी निराधार झालीना( रडूं लागते ).

**चंद्रसेन**–( आपल्याशीं) अरे! ही तर मोठ्यानें रडूं लागली, आतां काय करावं ! ( उघड ) राजकन्ये खालीं जर हे ऐकूं गेलं तर काय बरं ह्मणतील? नको नको व्यर्थ शोक कां करतेस ? तुझी सर्व आशा निर्फळ आहे. ह्या प्राणाचा धनी आतां मी नाहीं. असा नियम आहे कीं, जिकडे मन तिकडे इंद्रियें आणि जिकडे इंद्रियें तिकडे हा देह. तुझ्या अशा कोणत्याही कृतीनें हें मन वळणार नाहीं. तर व्यर्थ दुःख न करितां स्वस्थ रहा. उद्या पहा राजेसाहेब तुला उत्तम वर पाहून देतील, मग तुझं हें सर्व दुःख नाहींसं होऊन तूं आनंदांत राहशील. नंतर तुला माझी आठवण सुद्धां होणार नाहीं.

**चंपकमाला**–( कपाळास हात लाऊन ) हाय हाय ! नशीब माझं ! प्रियकरा आतां कुठलं हो या अभागणीचें कपाळीं सौख्य आलं आहे ! जोपर्यंत हा जीव आहे तोंपर्यंत ही मूर्ती का

हलणार आहे या हृदयांतून. छी: त्याचं नांवच नको. झालं आज माझ्या सर्व संसारसुखावर पाणी पडलं. आतां हा प्राण आहे तों आपल्या विरहानं झिजून झिजून शेवटीं प्रिया प्रिया असें ह्मणतां, म्हणतां एके दिवशीं त्या कामाग्नींत या प्राणाची आहुति पडणार आहे ! ( कांहीं वेळ स्तब्ध राहून सुसकारा टाकून आपल्याशीं ) देवा, आतां मी कायरे करूं ! अरे अरे आतां या माझ्या स्वरूपाची, तारुण्याची, तशीच जन्माची माती होणारना ! (उघड) मग नाहींच ना माझी दया येत ! मी हात जोडून विनंति करतें कीं, नकाच या दीन दासीचा मनोभंग करू !

**चंद्रसेन**—नको नको आतां व्यर्थ आर्जव करूं. तुझं बोलणं मी कधींही मान्य करणार नाहीं. व्यर्थ जिवाला त्रास करून घेऊं नको; हां हां ह्मणतां हे दिवस जाऊन पुढं तूं सुखी होशी-ल. (खिडकींतून बाहेर पाहून) अरे ह्या पहा दिशा फांकल्या ! आतां निजून उपयोगीं नाहीं ! ( स्तब्ध राहून ऐकल्यासा-रखे करून ) वाहवा ही **रतिपाला**ची गडबड ऐकूं येतआहे ! स्वारी आज निजलीच नाहीं वाटतं ! आतां खालीं जाऊन आपणही तयारी करावीच, ( उठून खालीं जातो. )

**चंपकमाला**— ( खिन्न मनानें आपल्याशीं ) शिव शिव देवा ! आतां मी हा सारा जन्म कसारे घालऊं ! हरहर ! चंपकमाले तूं अशी दुर्दैवी जन्माला तरी कशाला आलीस ! ( कपाळास हात लाऊन ) नशीव समजावयाचं दुसरं काय? (कांही वेळ स्तब्ध राहून रागानें.) अहारे निर्दया; तूं आपला हेका शेवटीं सोडला नाहींसनां ? अरे अरे किती कठोर अंतः-करण हें ! इतका वेळ केलेली माझी विनवणी ऐकून एखाद्या पाषाणालासुद्धां द्रव आला असतां, पण चांडाळा तुला कांहींच

वाटलं नाहींना ? कुचल्याचीं फळं बाहेरून किती चांगली दिसतात, परंतु आंत प्राणघातक विषानं भरलेलीं असतात, त्याप्रमाणं तुझं बाह्यस्वरूप जितकं मोहक आहे, तितकं तुझं अंतःकरण किरे दुःष्टा कठीण आहे ! ( बोटें मोडून ) मेल्या माझा हा असा घात करून, मला धाय धाय रडायाला लाऊन, तूं मात्र आनंदानं सौख्य भोगणार काय ? ठीक आहे ही नांवची **चंपकमाला** आहे पाहून घेईन. ( कांही वेळ स्तब्ध राहून विचार करून ) चला आतां येथून लवकर कोणाला नकळत आपली सुटका होण्याची तजवीज केली पाहिजे. मग; मी आहें आणि तो आहे.

( रागानें निघून जाते. )

## अंक पहिला समाप्त.

---



# अंक २.

## प्रवेश १ स्थळ-विलासपूरच्या राजवाड्यांतील कमलेचा महाल.

( विचारांत निमग्न **कमला** बसली आहे व **आनंदी** जवळ उभी आहे. )

**कमला**-( आपल्याशीं ) अजून कां बरं स्वारी आली नाहीं? मला तर त्यांनां केव्हां भेटेनसं झालं आहे! काय करावं अलीकडं मेलं कांहीं करमेनासं झालं आहे ! हं: ह्मण आहे ती खोटी कां ! 'कीं मन चिंती तें वैरी न चिंती'! काय मेला चमत्कार आहे परवापासून नानातऱ्हेच्या विचारांनीं मन कसं घोंटाळून गेलं आहे ! एकदां वाटतं कीं त्यांचं आणि माझं वचन झालं आहे, त्यांत अंतर येणार नाहीं, आणि एकदां वाटतं कीं, काय नियम चार देश फिरतां फिरतां एकाद्या नाजूक ठिकाणीं जर मन गुंतलं तर माझी आठवण कशानं होणार ? आणि उगीच माझं मन कशाला दुखवावं ह्मणून आजच्या पत्रांत मला अश्वासन दिलं नसेल कशावरून ? असे एक एक आणि दोन दोन, मेले हजारो विकल्प मनांत येतात ! ( कांहीं वेळ स्तब्ध राहून ) पण नाहीं, माझं मन मेलं कितीतरी अविश्वासी ! हं: वेडे **कमले** उगीच कां बरं ह्या तुझ्या भलभलत्या कल्पना ? जन्मापासून सहवास असून हीच कां तूं त्यांची

परीक्षा केलीस ? छीः असं कधीं होणार नाहीं ! जें एकदां वचन झालं तें कधींही फिरावयाचं नाहीं.

**आनंदी**–हंः ! ताईसाहेब काय वरं मेल्या भलत्यासलत्या कल्पना मनांत आणून एकट्याच वेड्यासारख्या सदां विचारांत निमग्न असतां ?

**कमला**– नाहींग उगीच आपलं कांहीं तरी मनांत येतं. पण गडे अजून कसं वरं येणं झालं नाहीं ?

**आनंदी**–हें काय ताईसाहेब ज्या त्या गोष्टीचा उतावळी-पणा किती हा ! नुकतंसं कुठं सकाळीं पत्र आलं नाहीं तों इतक्यांत ह्मणे कसं वर येणं होईल ?

**कमला**–किती दिवस बाई तिकडच्या दडी दिली आहे तरी ! दीड वरीस तर होऊन गेलं ! नित्य उठून आई शंभ-रदां आठवण काढते; तुला ठाऊक नाहीं कां ? इथं असतानां जर एकादे दिवशीं शिकारीला जायचं झालं, तर आह्माला किती वरं अवघड होई ? त्या वेळीं तुह्मी सर्व आमची थट्टा सुद्धा करीत होता ? पण आतां तिकडच्या ध्यानीं मनीं तरी आहे कां तें ? स्वारी काय जिकड रंगली तिकड रंगली.

**आनंदी**–हे पहा ताईसाहेब मनुष्य गांवाला गेलं, ह्मणजे कमीजास्त दिवस तिकडं लागायचेच.

**कमला**–काय करावं ? आपल्या आवडत्या माणसाच्या वियोगाचे दिवस घालविणं मेलं फारच कठीण ! मला तर ते कधीं येतीलसं झालं आहे ! कारण आमच्या उभयतांचा संबंध व्हावा असं बाबांच्या मनांतून नाहीं, हें तुला माहीत आहेच. त्यांनीं तिकड निराळ्याच खटपटी चालविल्या आहेत. एक आई मला अनुकूल आहे ह्मणून तिजवर सर्व भार टाकून

मी स्वस्थ आहें. पण कायग ते आतां मोठं दिसत असतील नाहीं बरं ?

**आनंदी**–आतां काय ताईसाहेब पुसतां ? आधिच मनोमोहक सुंदर स्वरूप, त्यांत ती तरुणपणाची झांक ! आपल्या नाहीं कां स्वरूपांत फेर झाला ? मनुष्य आपल्या तारुण्याच्या बहारांत आलं ह्मणजे त्याचं तेजच कांहीं निराळं होतं ! आपल्याला बरीक ते आतां एकाएकी ओळखायचे नाहींत.

**कमला**–हंः कांहीं तरीच आपलं तुझं ! अगे अग वेडी तर नाहींस ना तूं ! रात्रंदिवस मूर्ती कशी या हृदयांत साठविली आहे आणि मी कां ओळखणार नाहीं ! पण आतां बाई त्यांच्या पुढं उभं रहावयाला, तसंच बोलाय चालायला मला लाज वाटेल ! कारण आधिच तें मनोहर स्वरूप त्यांत विजयश्रीचं तेज ! खरोखर मला बाई तिकडं पाहतांच कसंच वाटेल !

**आनंदी**–वाहवा ! हें काय बोलतां ताईसाहेब ! आपल्या माणसापुढं उभं रहावयाला, बोलाय सवरायला लाज ती कसली ? त्यांतून आपली आज नव्यानं कां ओळख व्हावयाची आहे ?

**कमला**–तसं नव्हे ग पूर्वीचे लहानपणचे दिवस होते, अरे जारे सुद्धां आह्मीं एकमेकाला ह्मणत होतो; पण आतां आपल्या हातून तसं वागणं कसं बरं होईल ? खरच गडे बाळपणचे दिवस सुखाचे खरे ! जसं जसं मनुष्य मोठं होतं जातं तसतसे नानातऱ्हेचे उपव्याप आणि काळजी मेली मागं लागते, तसं कांहीं बाळपणीं आहे कां ?

**आनंदी**–तें खरं पण तरुपणचीं जीं सुखं आहेत, त्यांचा

बाळपणीं कसा बरं अनुभव येणार ! याकरितां प्रत्येक स्थितीचा अनुभव मनुष्यानं घेतलाच पाहिजे.

**कमाल**–( स्मित हास्य करून आळस देऊन ) बरं असो, दिवस अजून दोन तास आहे. आतां वेळ जाण्याला काय बरं करावं ? ( आठवलेसें करून ) आनंदी काल त्या जरीच्या चोळीवर कलावतूची वेलबूट काढतां काढतां तशीच राहिली आहे, दे बरं ती आणून ती पुरी तरी करूं दे ! काय करावं अलीकडं कशावरच चित्त लागत नाहीं.

**अनंदी**–जी सरकार ! (कशीद्याचं सामान व चोळी आणून देते. )

( **कमला** कशीदा काढीत बसली आहे तों महालाच्या दारांत **वासंतिका** प्रवेश करते. )

**वासंतिका**– ( आपणाशीं ) हंः एक एक मनुष्यच मेलं चमत्कारिक असतं ! हा काय बरं राजेसाहेबांचा हेका ? ताईच्या आणि माईसाहेबांच्या मनाला जर तो **चंद्रसेन** येत आहे, तर ह्यांनीं कां बरं मोडा घ्यावा ? खरंच जर पाहिलं तर माझ्या भाऊरायासारखा वर ताईला सारी पृथ्वी धुंडाळली तरी मिळावयाचा नाहीं; पण काय करावं उपाय नाहीं. आतां मी माईसाहेबांकडून आलें, त्यांनीं या कामीं आपल्याकडून होता तितका प्रयत्न केला, पण तो व्यर्थ झाला. राजेसाहेबांचं मन कांहीं वळत नाहीं; तेव्हां मला त्यांनीं कांहीं तरी युक्तीनं ताईचं मन वळऊन, देशोदेशींच्या आलेल्या राजपुत्रांच्या तसबिरींतून एकादा वर पसंत करण्यास सांगितलं आहे; पण मी कसं बरं करूं? भाऊ आह्मांला परका कां वाटत आहे? तो मी आणि ताई ऱ्हानपणापासन एके जागीं वाढलों?

मराठी ग्रंथ संग्रहालय

त्याचं प्रेम तर मजवर कसं थोरल्या बहिणीप्रमाणं आहे, आणि घरांतून तरी जें कांहीं जिवस्यकेरहस्य आहे तें पुसूं नका! तेव्हां भाऊरायाला आपल्याकडून होईल ती मदत करावयाची सोडून, अशी गोष्ट करणं बरोबर आहे कां? ( थोडा वेळ विचार करून ) पण आधीच कशाला त्या मेल्या भलत्यासलत्या कल्पना ? अगोदर ताईकडचा रागरंग पाहून मग पुढं काय तो विचार! ( महालांत येते. )

**आनंदी**–( वासंतिकेस पाहून ) ताईसाहेब अक्कासाहेबांची स्वारी आली.

**कमला**–( उठून ) अग बाई आक्कासाहेब कां ? या या. आज फार दिवसांनीं कुणीकड वाट चुकलां ? बसा. ( दोघी बसतात. )

**वासंतिका**–हं खरंच आहे ! तुमचं मनच तुह्माला कुठं चुकऊन गेलं आहे, त्यानं हें असं व्हायचंच. यांत नवल तें काय ?

**कमला**– वाहवा! ह्मणजे मी आपलं खोटंच बोलतें वाटतं! आज पंधरा दिवसांत हीच न आपली स्वारी इकड येत आहे ?

**वासंतिका**–हो खरंच आहे! पंधरा दिवसांत ही पांचवी खेप ! तरी पण आज ही स्थिति, उद्यां एखाद्या थोर राजपुत्राबरोबर लग्नविघ्न होऊन राणीसाहेब झाला, ह्मणजे तर आमच्या सारख्यांची दादच लागणं कठीण! पण बाईसाहेब थोडीशी आठवण तरी करा; परवाचे दिवशींच न तिकडून आलेलं पत्र मी आपल्याला दाखविलं ? बाई आनंदी तुला तरी आहे कां स्मरण ? नाहींतर काय तुह्मीही थोराजवळच्या बायका !

**आनंदी**–( किंचित हंसून ) हो मला आठवण नसायला काय झालं अक्कासाहेब ?

**कमला**–हो हो, खरंच गडे आतां माझ्या ध्यानांत आलं! अक्का किंइ काय असेल तें असो, मला बाई आतांशा आठवणच राहीनाशी झाली आहे!

**वासंतिका**–( हंसून ) हो ह्मातारपणच झालं आपलं आठवण कशानं राहणार ? असो त्यांत तुजकडे काय आहे ? हे सारे खेळ या वयाचे आहेत. बरं पण **जयनगराहून** कुणी आलं कां ?

**कमला**–हो आज सकाळींच तिकडून पत्र आलं, त्यांत तुलाहि लिहिलं आहे. बहुतकरून स्वारी उद्यां येण्याचा संभव आहे **अने** ते पत्र आण बरं !

**आनंदी**—जी ताईसाहेब. (पत्र आणून **वासंतिके**जवळ देते. )

**वासंतिका**–(पत्र वाचून उलटते) हें खालीं काय लिहिलं आहे? हेंचि पत्रीं तीर्थस्वरूप सौभाग्यवति परम प्रिय भागिनी अक्कासाहेब यांचे चरणीं बालकाचा साष्टांग नमस्कार तुह्मीं सर्व माझ्या ममतेचीं तेथें आहांतच; तेव्हां माझं हित करण्याविषयीं लिहावयास नको. आपल्या दर्शनाकरितां मी उद्ईक एथून निघतों. कळावें बरं पण ताई मी तुला कायसं विचारणार होते. ( आठवण करून ) हो महाराजांनीं सांगितल्यावरून प्रधानजींची स्वारी तुला वर पाहण्याकरितां गेली होती, ती कालच आली ह्मणे; त्यांनीं बरींच स्थळं पाहिलीं आहेत आणि त्या त्या राजपुत्रांच्या तसबिरीही आणल्या आहेत असं ऐकलं; तूं पाहिल्यास कां त्या ?

**कमला**—छे बाई मला कांहींच माहीत नाहीं. आणि मला करायचं आहे काय त्या पाहून ?

(इतक्यांत एक जासूद तसबिरी घेऊन येतो.)

**जासूद**—(मुजराकरून) सरकार म्हाराजांनीं ह्या तसबिरी बगुनशानी पसंतकरन्यापाई आपनाकड द्याया सांगितल्यात. (तसबिरी **आनंदी**जवळ देतो) येतों साहेब. (जातो.)

**वासंतिका**—**आनंदी** घे बरं त्या इकड पाहूं.

(**आनंदी** तसबिरा **वासंतिके**जवळ देते)

**वासंतिका**-[त्यांपैकीं एक तसबीर हातांत घेऊन पाहून] ही कुणाची बरं तसबीर? (तसबिरी खालचें नांव वाचून) हे **सुवर्णपुर**चे राजपुत्र **चंद्रशेखर.** वाहवा! (**कमलेस**) अग ताई पहा तरी इकड; (**कमला** तोंड फिरविते तें पाहून) अहाहा ! हें काय! तोंड कां फिरविलंस ?

**कमला**—(तिरस्कारानें तिचा हात झिडकारून) असूं-देत ग मेल्या; त्यांत काय पहावयाचं आहे? (दुःखाचा सुसकारा टाकून आपणाशीं) हर हर देवा! आतां माझी आशा निर्फल होणारना? ज्याला मी आजवर भीत होतें, तेंच शेवटीं कपाळीं आलन! एकून आईचे सर्व प्रयत्न व्यर्थ गेले अँ! खरंच ती तरी बापडी काय करील! मी तरी आतां लाज सोडून बाबांना सांगूं कां? हंः पण काय उपयोग ! तिकड शब्दसुद्धां काढण्याची पंचाईत! देवा आतां मी काय रे करूं. (रडूं लागते.)

**वासंतिका**- (**कमले**च्या खांद्यावर हात टाकून) अग बाई इतक्यांत डोळ्याला पाणी आणावयाला काय झालं! (ति-च्रे डोळे आपल्या पदरानं पुसून) उगी माझी बया! ज्या वयांत जें सौख्य पाहिजे, तें नसलं ह्मणजे वाईट वाटायचंच;

ह्मणून असं कां कुणी करतं ? होईल आतां मेलं लग्न, त्याची इतकी काळजी कशाला पाहिजे ? महाराज त्याच्च प्रयत्नांत आहेत.

**कमला**—जा गडे, तुझं आपलं कांहीं तरीच ! अक्का अग त्याकरतां कां मला वाईट वाटतं आहे ? सर्व कांहीं तुला माहीत असून मला कां वरं पुसतेस ?

**आनंदी**—त्याचं कारण, अक्कासाहेब आपल्याला ठाऊक आहेच; हें पहा, ताईसाहेबांचं सारं लक्ष **चंद्रसेन**रावांवर आहे, आतांशा त्यांना दुसरं कांहीं सुचत नाहीं, सदासर्वदां त्यांच्याच गोष्टी चालल्लेल्या असतात. माईसाहेबांच्या मनांतही उभयतांचा विवाह व्हावा असं आहे; एक महाराजांच्या मनाला मात्र तें येत नाहीं, ह्मणून त्यांनीं वर पहावयाला प्रधानसाहेबांना धाडून या तसबिरी आणविल्या आहेत. तेव्हां आपल्या मनासारखं होत नाहीं ह्मणून ताईसाहेबांना वाईट वाटतं आहे; दुसरं काय ?

**वासंतिका**—( आपल्याशीं ) आतां कांहीं तरी निराळंच बोलणं काढलं पाहिजे. (उघड) वाहवा ! अग ताई वेडी तर नाहींसना तूं ! हं. मला बाई मोठा चमत्कार वाटतो. लहानपणीं बोललंसवरलेलं तूं खरंच कां घेऊन बसली आहेस ? हें पहा, कितीं केलं तरी तो एका सरदाराचा मुलगा, आणि त्याला कां तूं वरण्याचं मनांत आणलं आहेस? वाः ! या पहा एका परीस एक अशा थोर थोर राजपुत्रांच्या तसबिरी आल्या आहेत, त्यांतून कोणतीही पसंत कर. थोरांनीं कोणतंही करणं झालं, तरी तें विचारानंच केलं पाहिजे. अग वेडे,

त्या **चंद्रसेनाला** वरून तुझी कोणती बरं हौस पूर्ण होणार आहे ! असा भलता हेका काय धरावा ?

**कमला**–( रागानें ) अक्का अग हेंच वाटतं बोलायला तूं इथं आली आहेस ! बाई "परदुःख शीतळ वाटायचंच" !

**वासंतिका**–अग तसं नव्हे, मला वाटलं तें मी बोललें. खरंच सांग त्या **चंद्रसेना**ला वरण्याचं जें तूं मनांत आणलं आहेस, त्यांत कां तुझ्या दागिन्याची हौस पुरणार आहे, कां लुगडींचोळ्या उंची मिळणार आहेत, कां चार चाकरमाणसं सेवेला असणार आहेत, एक तरी मेली मनची हौस पूर्ण होणार आहे कां ?

**कमला**– अक्का, असं भलभलतं बोलून उगीच कां बरं माझ्या दुःखावर डाग देतेस ! तुला मी आपला निश्चय कधींच सांगितला आहे, आणि पुन्हां पुन्हां काय विचारतेस ? बाई तुझं ह्मणणं सारं खरं आहे, पण एक जर मेलं मनासारखं नाहीं, तर त्या संपत्तीला आणि दागदागीन्यांना घेऊन काय बरं करायचं आहे ? माझं मन जें त्या चरणीं लुब्ध झालं आहे तें त्यांच्या श्रीमंती किंवा गरीबीकड कां पाहून ? आणि तुला माहीत नाहीं कां ? मेलं लक्ष्मीचं आणि गुणीजनांचं वाकडं असायचंच.

**वासंतिका**-- ( पुन्हां त्या तसबिरींपैकीं एक हातांत घेऊन ) बरं तें असो, पण ह्या पाहशील तर अगोदर; हा **सुवर्णपुरचा** राजपुत्र, पहा बरं हा स्वरुपानं वाईट कां आहे ? तसाच हा **अनिलपूरचा मदनसेन** बाकीच्या साधारणच आहेत ह्मणा ! पण ह्या दोन आणि त्यांतून हा **वज्रसेन**

वाईट कां आहे ? यापरीस **चंद्रसेनांत** तें अधीक काय आहे ?

**कमला**— अक्का, अग उगीच कशाला हे वेड्याचं सोंग घेतेस ? तुझ्या ध्यानांत नाहीं कां तें स्वरूप ? त्याशीं ताडून पहा ह्मणजे खातरी होईल ; मला कशाला पुसतेस ?

**वासंतिका**— ( आपल्याशीं ) अहाहा ! आतां मी काय बोलूं ! माझ्या **चंद्रसेनाची** सर कोणाला तरी येणार आहे कां ? पण उपाय काय ? ( उघड ) तूं कांहीं ह्मण पण मला किनई बाई हा **वीरसेन** चांगला दिसतो.

**कमला**— अहाहा ! हेंच कां तें शहाणपण ! आतां तसं नको; हातच्या कांकणाला आरसा कशाला पाहिजे ? **अने** आण ग त्या माझ्या बारद्वारींत पलंगाजवळ तिकडून आलेली तसवीर ठेवली आहे ती

**आनंदी**— तिकडून कुठली ताईसाहेब, ती आपण काढलीन ?

**कमला**— ( हंसून ) मेलं जास्त किती बोलावं ? होहो तीच. जा आण पाहूं ?

( **आनंदी** तसवीर आणून **वासंतिके**जवळ देते )

**वासंतिका**— ( तसवीर पाहून ) शाबास ताई ! इतकी कां तरबेज झाली आहेस तूं या कामांत ? मला नव्हतं ठाऊक ! कधीं काढलीस ही ? मी नव्हती बाई पाहिली कधीं ?

**आनंदी**—बरेच दिवस झाले काढून. रावसाहेब तिकडं गेल्यापासून, ताईसाहेबांच्या मनाला करमणूक होण्याला काय तें हेंच साधन आहे.

**वासंतिका**–( पुन्हां तसबिरीकडे पाहून ) अगदीं हुबे-हूब निघाली आहे ! (आपल्याशीं) हं:, आतां मी काय बरं बोलूं ? अहाहा ! काय तो वर्ण, काय तो हसतमुख चेहरा, डोळ्यांत पाणी किती, आणि गुण तरी काय सांगू ! असले हजारो राजपुत्र माझ्या भाऊरायावरून ओंवाळून टाकावे. खरोखर धन्य ती त्याची माता कीं, असलें अनुपम रत्न प्रसवली ! ( स्वस्थ बसते. )

**कमला**– ( वासंतिकेच्या खांद्यावर हात टाकून ) कां अक्कासाहेब बसल्या, आतां कां तोंड मिटलं ?

**वासंतिका**–गडे प्रसंगालाच गोष्ट आली, आतां मी काय बरं बोलूं ! खरोखर अशी कोण बाई पुण्यशील असेल कीं, जिनें मागल्या जन्मीं हरतालिका चांगल्या पुजिल्या असतील तिलाच हा वर प्राप्त होईल !

**कमला**–अग एक राज्यच काय तें कमीन ? मला बाई त्या राज्याची नाहीं, संपत्तीची नाहीं, कशाची आशा नाहीं. एक माझ्या मनासारखं होऊन आह्मीं जरी गरीबस्थितींत असलों तरी पुरवलं ! एक मनुष्याच्या अंगीं पराक्रम असला, ह्मणजे कांहीं कमी नाहीं ! परवा दहा हजारांची नाहीं कां जाहगीर मिळाली ? मेलं राज्यच कशाला पाहिजे ? पण अक्कासाहेब मला बाई तुमचा चमत्कार वाटतो, पत्रांत तर तिकडून किती आगत्यानं पण लिहिलं आहे ! मला वाटतं मघापासून तुह्मी जें बोलत आहां तें सारं तिकडच्या ममतेचंच लक्षण वाटतं ! बरं आहे, आल्यानंतर मी सर्व सांगतें.

**वासंतिका**–( हंसून तिच्या गळ्यास मिठी घालून ) छे गडे, पुरं पाव तुझं नको हो ! माझ्या गळ्याची शपथ

आहे तुला ! नाहींतर कांहीं तरी भलतंच करशील ! मी तर मनापासून रात्रंदिवस तेंच इच्छीत आहे; पण बाई त्याला विघ्नं आहेतन ! मला तर मोठी काळजी पडली आहे, कीं हें सिद्धीस जाणार कसं.

**कमला**—हें पहा त्याची कांहीं काळजी नको करायला. आईच्या मनांतून हें आहे आणि ती सारं तें जमविण्याच्या तंत्रांत आहे.

**वासंतिका**—बरं बाई, देव करो, आणि एकदाचं हें शेवटाला जाऊन तुह्माला सोन्याचे दिवस येवोत ह्मणजे झालं दुसरं काय !

**कमला**—कांहीं होवो तुला मी आपला निर्धार सांगतें, वरीन तर त्यांनाच; नाहीं तर हा जीव टेवणार नाहीं.

**वासंतिका**—नको बाई संध्याकाळच्या वेळीं असं भलभलतं बोलूं ! बरं चल आज आमच्याच वरीं; रात्रीं रहा आणि उद्यां ये परत. ( उठून ) चला; मला माईसाहेबांना भेटायचं आहे.

**कमला**— ( उठून ) चल तर आईला विचारून मग जाऊं ! ( निघून जातात. )

## प्रवेश २.

**स्थळ विलासपूरच्या राजवाड्यांतील राणीचा महाल.**

( **इंदुमति** आणि **गजरा** प्रवेश करितात. )

**इंदुमति**—**गजरे**, अजूनी **हरपाळजी** कां बरं आले नाहींत! आज प्रहर रात्रीं येतों असं सांगितलं होतं. आतां किती बरं

**गजरा**—आतां ह्याच सात वाजल्या, इतक्यांत येतील बाई-साहेब.

**इंदुमति**—**चंद्रसेन** बाळाचं पत्र काल आलं. बहुतकरून उद्यां दोन प्रहरीं तो इथं येईल ! ( कांहीं वेळ स्तब्ध राहून आपणाशीं ) हं: देवा आतां मी काय बरं करूं ! मला वाटलं होतं की, **वासंतिके**च्या सांगण्यानं **कमले**चं मन वळेल! पण ती वेडी कां आहे ! तिला बरं वाईट सारं समजतं आहे ! पण माझी आपली वेडी समजूत ! ( हातांतील पत्राकडे पाहून ) बाळानं काय लिहिलं आहे? " सर्वस्वी माझं कल्याण करणार आपण आहांत, तेव्हां मी जास्त काय लिहूं" हो समजले बाळा तुझा हेतु ! खरंच आहे. तो आणखी उघड काय लिहील ? त्याचा सर्व भरंवसा मजवर आहे; हो लहानाचा थोर मी त्याला केला, तेव्हां मजवांचून त्याचा कोणताही हट्ट पुरविणार दुसरं कोण बरं आहे ! पण त्याचा हेतू पूर्ण व्हावा कसा ! ( सुसकारा टाकून ) आतां एक उपाय राहिला आहे, तेवढा करून पहावयाचा ! ( उघड ) कायग **गजरे कमला वासंतिके**च्या घरून आली नाहीं न अजूनी ?

**गजरा**—नाहीं बाईसाहेब आतां रात्रीं कसच्या येतात, उद्यां येतील.

**इंदुमति**— ( विस्मयानें ) हं: काय करावं या छांदिष्टपणाला ! काल ह्मटलं तूंच कशाला जायला हवीस तिकडं, तिलाच इथं टेऊन घे ह्मणजे झालं ! पण ज्याचं नांव तें, कांहीं केल्या ऐकेना ! मला तर सध्यां असं झालं आहे कीं, कोणी-कडून तरी ती सुखी असो! आतांशा जी तिला आपल्या

लग्नाची काळजी लागली आहे, ती कांहीं पुसूं नका! वाळून वाळून अगदीं अशी झाली आहे!

**गजरा**– खरंच आहे बाईसाहेब; त्या लहान कां आहेत?– आतां त्यानं सर्व कळूं लागलं आहे.

**इंदुमति**–( पदरानें तोंडांवरील घाम पुसून ) आज बाई उकाडा तरी किती होत आहे हा! हुश्श! **गजरे** वारा तरी घाल अंमळ!

**गजरा**–जी सरकार. ( पंखा घेऊन वारा घाल्ते. )

( इतक्यात काठी टेंकीत टेंकीत **हरपाळ** द्वाराबाहेर येतो.)

**हरपाळ**–( आपल्याशीं. ) हुश्श! राम! राम! राम! देवा हा नोकरीचा पेशा बेटा फारच वाईट! हं:! ह्मणं आहे ती खोटी कां; कीं, "कोणी कोणाचा होऊं नये चाकर आणि कोणी कोणाची होऊं नये बाईल"! पण एकं मनुष्य द्रव्य-लोभांत गुतलं म्हणजे हा त्रास असावयाचाच! ही माझीच स्थिति पहा! जिवाला सुख म्हटलं तर काडीमात्र नाहीं! ही दरबारस्थिति अशी झाल्यानं, जीव सदां धुगधुग्यांत असतो. कोणत्या वेळीं काय प्रसंग येईल कोण जाणें! बस पुरे; आतां मिळविली! एकदांचा या सर्वांस शेवटचा रामराम करून एखाद्या पुण्यक्षेत्रीं जाऊन हरी हरी म्हणत बसावं हें बरं! ( कांहीं वेळ थांबून ) आज राणीसाहेबांनीं कशाला बरं मला बोलावलं असाव? असो आतां भेटलों म्हणजे काय आहे तें समजेल. ( दारांतून वांकून पाहून ) कोण आहे **गजरा**बाई सरकारस्वारी काय करीत आहे?

**गजरा**–( त्यास पाहून ) यावं. आपलीच वाट पहात आहेत. ( **इंदुमतीस** ) सरकार **हरपाळजी** आले आहेत.

**इंदुमति**–यावं **हरपाळजी** बसा. आताशां फार दिवसांत इकडं कुठं आला नाहीं.

**हरपाळ**–मी काय! सरकारच्या पायाचा नोकर, हजरच आहें पाहिजे तेव्हां! हल्लीं थोडी कामाची दगदग जास्त पडते, त्यानं जीव अगदीं दमून जातो आणि वयाच्या मानानं शक्तीनंही सोडलं! ह्मणून आपला स्वस्थ घरींच असनों झालं.

**इंदुमति**–खरंच आहे! आतां दिवस कां हे आपले काम करण्याचे? पण मला बाई एक मोठं समाधान वाटतं, कीं त्या बलवलपुरींत सध्यां जुन्यापैकीं काय ते तुह्मींच आहांत एकादी विचाराची गोष्ट सांगायला!

**हरपाळ**– हं: काय सरकार! कोण पुसतं आतां आह्मांला! ते **रणदेव** कारभारी, ते **शंखपाळ** खजीनदार, ते **नारायणप्रमाद** न्यायाधीश, अशी एका पेक्षां एक मुत्सद्दी मंडळी मिळाली आहे; त्यांत मी ह्मणजे कोणत्या झाडाचा पाला! पण कळावर नजर देऊन परमेश्वर चालवील तोंवर कसे तरी दिवस काढायचे झालं! दुसरं काय?

**इंदुमति**– ( सुसकारा टाकून ) हं: आतां काय मेलं कोणी अडपतं न दडपतं! करायचं काय! **संग्रामसिंहजी** होते तोंवर ठीक होतं सारं! कांहीं तरी दाब होता.

**हरपाळ**– हं:, त्यांची गोष्ट कशाला पाहिजे? त्यांचा माझा फार दिवसाचा लोभ; तसा मनुष्यच होणं नाहीं. शूर तसाच, वजनदार तसाच, दयाळु तसाच, नीतिमान तसाच, काय सांगूं सरकार, तें एक रत्नच होऊन गेलं!

**इंदुमति**– आह्मांवर थोडे कां उपकार आहेत त्यांचे? हं

सारं राज्य त्यांच्या खटपटीनं आह्मांला मिळालं! त्यांनीं त्या वेळीं हरतऱ्हेनं मदत केली, ह्मणूनच आमचे पाय थाऱ्याला लागून, हे दिवस आमच्या नजरेस पडले! नाहींतर कित्येक दिवस रानावनांतून नाहीं अन्न, नाहीं पाणी, असा मेला हिंडतां हिंडतां जीव बेजार झाला होता! बरं पण काय हो आतांशा मेल्या इतक्या खटपटी काय चालल्या आहेत? वरचेवर स्वाऱ्या जातात कोणीकडे?

**हरपाळ**— (चकित होऊन इकडे तिकडे पाहून) सरकार जरा गैरसावध असावं, कारण हल्लीं भिंतीस सुद्धां कान झाले आहेत!

**इंदुमति**— हो तुह्मी ह्मणतां तें कांहीं खोटं नाहीं. दिवसच तसे आले आहेत. (दासीस) **गजरे** तें दार बंद कर बरं.

**गजरा**— जी सरकार. (दार बंद करते.)

**हरपाळ**— काय सांगूं साहेब हल्लीं तिकडच्या संबंधाची गोष्ट बोलणं ह्मणजे जीव कसा थरकांप भितो! (तोंडास पदर लाऊन हळूच) **हिराचंद** या नांवाचे एथें एक लक्षाधीश सावकार आहेत. त्यांची कन्या सासरीं जात असतां, मध्येंच छापा घालून धरून, **चतुरंग**गडावर प्रतिबंधांत ठेविली आहे; आणि ती यानां अनुकूल होत नाहीं ह्मणून नित्य तिचा अत्यंत छळ मांडला आहे! वरचेवर महाराजांचे मुक्काम तेथेंच होत असतात. हल्लीं तरी स्वारी तेथेंच आहे. ऊंद सरकार त्याचा जास्त विचार करण्यांत अर्थ कोळसा जितका उगाळावा तितका काळाच.

**इंदुमति**— (दुःखाचा सुसकारा टाकून) शिव शिव! हरपाळजी! खरंच कां हो हें! (डोळ्यास पाणी आणन)

मी ह्म- आहे! झालं आणं

काय करावं या कर्माला ! मला तर असं झालं आहे कीं, नको नको देवा हा जन्म नको ! एकदांचे झटदिशी डोळे झांक म्हणजे मिळविली ! हं:, आतां हे दिवस कांहो असे करायचे ? काय हा अनर्थ !

**हरपाळ**—नका नका बाईसाहेब ! असे दुःष्ट शब्द उच्चारूं सुद्धां नका ! हें पहा, एक आपण आहांत, म्हणून दुःखांत सुख मानून आम्हीं कसेही दिवस काढीत आहों; आणि अजूनी आपलं काय झालं आहे ! आपल्या ताईसाहेबांचं लग्न व्हावयाचं आहे. पुढं त्यांना मुलबाळं व्हावयाचीं, आणि इतक्यांत आपले हे काय भलते विचार !

**इंदुमति**— हो बरीच गोष्ट निघाली **कमलेचं** लग्न यंदा करावं ह्मणतें, पण काय करावं तिच्या योग्य चांगलं स्थळ एक सुद्धां नाहीं. मोठी बाई पंचाईत आली आहे.

**हरपाळ**— वाहवा ! सरकार आपल्या सारख्यांना याची कसली पंचाईत ? स्थळाकरितां लांब कशाला जायला पाहिजे? तें तर आपल्या जवळच आहे ; आणि सरकारच्या मनांतही रावसाहेबाना ताईसाहेब देण्याचा विचार फार दिवसांपासून आहे. तशांतून तें स्थळ मनास येतच नसेल, तर कारभारी-साहेबांनीं पांच चार स्थळं पाहिलीं आहेत ह्मणून ऐकलं [illegible] ांतलं एकादं पसंत करावं ह्मणजे झालं.

खरोख [illegible] ऱ्यांत प्रवासी पोषाखानें **चंद्रसेन** प्रवेश करतो. )

**ह [illegible] द्रसेन**— ( आपणाशीं ) काय चमत्कार आहे पहा ! रवा त्य [illegible] ा कोणत्याही गोष्टीची अति उत्सुकता असली, ह्मणजे व [illegible] फारच विलक्षण स्थिति होते. हं:, काल सकाळीं मी **जयनग**-राहून निघालों तो आज एथें सत्तर कोसावर तयार ! केवढी

मजल ही ! बरोबरचे लोक अद्यापी येतच आहेत. माझ्या प्रियसखीला व माईसाहेबांना केव्हां भेटेनसं झालं होतं ! पण येथें येऊन शोध करितों, तों ती कालपासून अक्काच्चेच घरीं आहे ! मी आल्याची बातमी कळविण्याकारितां मनुष्य पाठविलाच आहे. आतां ती येईल. हं:, तिला कुठला दम ! तोंवर आपण माईसाहेबांना तरी भेटावं. ( महालाच्या दारा जवळ येऊन ) अरे पण हें दार बंद कां बरं ? (कानोसा घे-ऊन ) आंत कोणसं बोलत आहे. बरं आपण कांहींवेळ येथेंच उभे राहूं. ( स्तब्ध उभा राहतो. )

**इंदुमति**— **हरपाळजी** मी तुमच्या बोलण्याचा सार हेतू समजलें. माझ्या मनांत **कमला चंद्रसेनालाच** द्यावी असं आहे ! पण काय करूं? तिकडच्या मनाला आलं पाहिजेन !

**चंद्रसेन**—अरे ! माईसाहेब **हरपाळजींशीं** माझ्या लग्ना विषयींच बोलत आहेत ! ( पुन्हां कान देतो )

**हरपाळ**— वाहवा ! बाईसाहेब आपल्या मनांत जर चं-**द्रसेन**रावसाहेबांना ताईसाहेब द्याव्या असं आहे, तर तें महाराजांना कां पसंत पडणार नाहीं ?

**चंद्रसेन**— ( आपल्याशीं ) मला तर हें माहीत आहेच. महाराज अनुकूल नसायचेच !

**इंदुमति**— ( चिंताक्रांत मुद्रेनें ) तुह्मांला काय .., **हर-पाळजी** आतां ते कां पूर्वींचे दिवस आहेत ? हल्लीं ह्म-णजे करापलीकडं झालें आहें ? माझं काय चालतं हि ! मागं एकदां ही गोष्ट काढली होती, त्यावेळीं सागणं गालं कीं, "आह्मी असल्या भिकाऱ्याशीं संबंध करून, आपल्या अ-कुला कधींही बट्टा लावणार नाहीं. खबरदार पुन्हां असें बो-

लणें काढशील तर " पण मेली या आंतड्याला लाज कुठं आहे ! परवा आणखी एकदां गोष्ट काढली, तो बाई एक एक डोळा मजवर असा ( हातानें दाखऊन ) करणं झालं ! तेव्हांपासून मी तर बाई हें बोलणंच काढायचं सोडलं.

**चंद्रसेन**— ( आपल्याशीं ) अरे अरे ! बापड्या **चंद्रसेना** तुझी आशा निर्फलचना ! दैव आपलं समजावयाचं !

**हरपाळ**— ( विस्मयानें ) हंः, एकून हें बरं नाहीं झालं; काय बरं हा राजेसाहेबांचा हेका ! ( आपल्याशीं ) हंः, अजूनी मागचं वैर आहेच अँ ! तें कुठलं विसरायला !

**इंदुमति**— हें पहा **हरपाळजी** आमचं तरी मेलं मागं कोण आहे ? येऊन जाऊन कायती एक पोर ! तिच्या मनाप्रमाणें आह्मीं कां बरं करूं नये ? त्यांतून स्वरूपानं, विद्येनं, गुणानं, आमच्या **चंद्रसेना**सारखा कोण बरं मिळणार आहे ? काय तें मेलं एक राज्यचना त्याला कमी, आमचं आतां वय झालं आहे, हेंच राज्य त्याला दिलं असतं ह्मणजे झालं होतं. तुह्मी सांगा यांत गैर काय तें ? पण मेलं हें होणार कसं ? लहानपणापासून उभयतांचं प्रेम जडलेलं , त्यानां आतां हें समजलं ह्मणजे काय बरं होईल !

**चंद्रसेन**— ( आपल्याशीं ) अहाहा ! किती तरी हे शब्द ---- मनाला आनंद देत आहेत. धन्य त्या माउलीची ! खरोखर परदुःखानें कळवळणारे प्राणी जगांत थोडे !

**हरपाळ**— यांत काय गैर आहे सरकार ! काय सांगू परवा त्या **रत्नपूरच्या** लढाईची हकीगत ऐकिली ! हंः, एवढ्या लहान वयांत काय पराक्रम ! माझी तर छाती दडपून गेली; आणि काल दुसरं ही ऐकलं कीं, **रतिपाळरावांना**

पांच हजारांची आणि रावसाहेबांना दहा हजारांची जहागीर त्या राजाकडून मिळाली ह्मणून कून बापसे सवाई बेटा खरा!

**इंदुमति**–अहो किती केलं तरी तो सिंहाचाच बचानं!

**हरपाळ**–खरोखर सरकार पुत्र असावा तर असाच! असें स्थळ मनाला जेव्हां येत नाहीं तेव्हां काय ह्मणायचं?

**इंदुमति**–या करितांच आज आपल्याजवळ गोष्ट काढिली कीं तुह्मी तरी चार गोष्टी सांगून कसंही हें जुळवाल.

**हरपाळ**–वाहवा! काय सरकार! माझ्या हातून हें कसचं घडणार! माझें काय चालत आहे? व्यर्थ अपल्याला ही भ्रांति आहे.

**इंदुमति**–असं बोलूं नका, किती केलं तरी तुह्मीं आहांत तिकडच्या मर्जीतले! एकादी सुविचाराची गोष्ट जर तुह्मी सांगितली, तर ती सहज रुचणार आहे.

**चंद्रसेन**– (आपल्याशीं) अरे, माउली मजकरितां किती तरी प्रयत्न करीत आहे, दवा, हे उपकार जन्मोजन्मीं माझ्या हातून फिटणार नाहींत!

**हरपाळ**– छे! छे! सरकार हें काम आपल्या हातून खास होणार नाहीं. आपल्याकडून मी सांगेन पण तें व्यर्थ होणार आहे; किती केलं तरी महाराज समजून उमजून आपल्या वैऱ्याशीं:– अरे! (चपापून जीभ चाऊन आपल्याशीं) किती तरी मी वेडा!– बोलण्याच्या भरांत भान न राहून भलतेच शब्द तोंडांतून गेले!

**इंदुमति**–(विस्मयानें) काय ह्मटलंत **हरपाळजी**? **चंद्रसेन** तिकडचा वैरी? काय तरी मेला चमत्कार आहे; तो कसा बरं?

**चंद्रसेन** (आपल्याशीं) हं:, काय मी राजेसाहेबांचा वैरी! आश्चर्य आहे!

**हरपाळ**–नाहीं सरकार वैरी कसचे, बोलतां बोलतां भलते शब्द तोंडातून गेले!

**इंदुमति**–छी? असं कसं बरं होईल; मला तर खास वाटतं कीं, यांत कांहीं तरी गुह्य आहे; सांगा तरी बाई एकदांच काय तें, तुह्मांला माझ्या गळ्याची शपथ आहे.

**हरपाळ**–(आपल्याशीं)आतां काय करावं मोठं लचांड आलं! ती गुप्त गोष्ट फोडणंही रास्त नाहीं; बरं न सांगावी तर शपथेंत गुंतलों! थोडा विचार करून(उघड)अरे अरे काय सांगू सरकार! दैवानं मोठा कठीण प्रसंग आणला! असो, मी ती सर्व हकीगत सांगतों, पण पायापाशीं एवढी विनंति आहे कीं, ती बाहेर न-फुटण्याची व्यवस्था व्हावी; कारण एक महाराज आणि मी यांवांचून तिसऱ्या कानीं ही गोष्ट गेली नाहीं.

**इंदुमति**–काय **हरपाळजी** इतकी कां खात्री माझी नाहीं आपल्याला? मी परमेश्वराला स्मरून सांगतें कीं, या देहांत प्राण आहे तों, ती गोष्ट फुटणार नाहीं. तशीच या **गजरेची** सुद्धां मी खात्री सांगतें.

**चंद्रसेन**–( आपल्याशीं ) इतकी गुप्त गोष्ट काय बरं आहे? हं: ! राजेसाहेबांनीं मशीं वैर धरण्यासारखा अपराध तर माझ्या हातून घडल्याचं मला स्मरत नाहीं. ( थोडा-वेळ थांबून विस्मयानें) असो, आतां समजेलच काय आहे तें.

**हरपाळ**–हर हर ! बाईसाहेब काय सांगू ! त्या- प्रसंगाची आठवण झाली कीं, अंगावर शहारे येतात ! आपल्याला मी हात जोडून विनंति करतों कीं, नकाच ती हकीगत ऐकण्याच्या भरीस आपण पडूं. तेणेंकरून आपल्या जिवाला मात्र अति दुःख होणार आहे !

**इंदुमति**–सांगा सांगा **हरपाळजी** असं मेलं काय आहे तें ऐकूं दे तरी !

**हरपाळ**–ऐकावं सरकार तर सांगतोंच. पूर्वी महाराजांचं आणि **संग्रामसिंहजीं**चं किती रहस्य होतं, तें आपल्याला माहीत आहेच. पुढं कांहीं दिवसांनीं हलकट लोकांच्या संगतीनं महाराजांचं वर्तन अगदीं बिघडून, जेव्हां जिकडे तिकडे अनाचार आणि झोटिंगबादशाही माजली, तेव्हां **संग्रामसिंहजीं**नीं पांच चार वेळ पुष्कळ समजुतीनं सांगितलं, पण तें सर्व व्यर्थ जाऊन यांचा वर्तनक्रम होता, तसाच चालला होता; परंतु **संग्रामसिंहजी** होते, तोंवर त्या चांडाळचौकडीचं फारसं चालत नव्हतं; तेव्हां हा अडथळा काढून टाकावा, ह्मणून केव्हां त्यांचे बेत होऊन कपटानं तें घोर कृत्य करण्याचं ठरलं आणि तो दुष्ट प्रसंग आला नकळे ! जळो तो दिवस ! हाय हाय ! बाईसाहेब पुढं आतां माझ्यानें सांगवत नाहीं.

**चंद्रसेन**–( आपल्याशीं ) काय दुष्ट प्रसंग आला ! आणि तो सांगवत मुद्धां नाहीं अँ ! असो. पुढं काय तें ऐकूं !

**इंदुमति**–देवा ! त्यांच्या हातून तर कांहीं घोर कर्म झालं नसेल ना ! **हरपाळजी** सांगा सांगा पुढं काय झालं?

**हरपाळ**–पुढं **संग्रामसिंहजीं**चा आणि महाराजांचा अगदीं बेबनाव आला; त्याचं कारण आपल्याला माहीत आहेच कीं, **संग्रामसिंहजी** त्यांच्या कोणत्याही वाईट कृत्यास आड असत. **रणदेवजी** तर कसे त्यांना पाण्यांत पहात होते. एकदां भर सभेंत कांहीं बोलाचाली होऊन, एक अपशब्द **रणदेवजीं**च्या तोंडांतून निघतांच, **संग्रामसिंहजीं**नीं महाराजासमक्ष त्यांच्या

श्रीमुखांत भडकावली. त्या वेळेपासून तर **रणदेवजी** मनांत फारच जळूं लागले. **रणदेवजी** हे महाराजांचे प्यारे अस-ल्यामुळें, त्यांच्या मनांत हवे ते दुष्ट विचार भरऊन देऊन, **संग्रामसिंहजीं**च्या नाशास तेच कारण झाले. पुढं सर्व बेत ठरून कपटानं महाराजांनीं **संग्रामसिंहजीं**शीं सख्य केलं व कांहीं दिवस त्यांच्या विचारानं वागूं लागले. असे कांहीं दि-वस गेल्यावर एके दिवशीं सडे शिकारीस जाण्याचा बेत ठरला व **चतुरंगड**च्या खोऱ्यांत थोडेसे लोक बरोबर घेऊन, महाराज आणि **संग्रामसिंहजी** गेले. मी ही महाराजाबरोबर होतों. शिकार वगैरे करून थकून सारी मंडळी दोनप्रहरच्या वेळीं तेथें ओढ्याच्या कांठीं एक वडाचें झाड आहे, त्याच्या साव-लीस आलों. जेवणखाण आटपल्यावर बाकी सर्व लोकांस शहरांत परत जाण्यास सांगून, फक्त महाराज, मी, **संग्रामसिंह-जी** आणि त्यांचा तो विश्वासूक हुजऱ्या **हरसिंग**, असे चौघे मागें राहिलों. घोड्यावरचा गाशा मी महाराजास टाकून दिला. त्याच्यावर ते पडले, पण त्यांची चित्तवृत्ति त्या दिवशीं कांहीं चमत्कारिक झाली होती. महाराजानीं **संग्रामसिंहजीं**सही सांगितलं कीं, आपल्याला फार श्रम झाले आहेत, किंचित डोळा ह्मणजे बरं वाटेल. वृद्धपणीं फार श्रम झाल्यानं पड-तांच त्यांस झोंप लागली. बापड्या **हरसिंगा**चाही डोळा ला-गला. मी मात्र कांहींसा अंतरावर जागाच पडलों होतों; इतक्यांत महाराज चटकन् उठले आणि जवळचा खंजीर मेणांतून बाहेर काढला !

**इंदुमति**–( शोकाकुल होऊन ) हर हर देवा ! आतां पुढं काय ऐकण्याचा प्रसंग येणार नकळे !

**चंद्रसेन**–( संतापानें आपल्याशीं ) हाय रे दुष्टा !

**हरपाळ**–असं पाहून बाईसाहेब मी घाबरून गेलों व एक सारखी माझी नजर तिकडे लागली. तों रागानं महाराजनं मिशावर ताव दिला, अस्तनी मागें सारली आणि तोंडा. कांहींसं पुटपुटत **संग्रामसिंहजी** जेथें निजले होते तेथें गेले. कांहीं तरी आज हें विपरीत आहे, असं मला वाटून मी झट-कर उठून धांवत पुढं जातों, तों हर हर बाईसाहेब ! काय सांगूं ! " नीचा वे हें प्रायःश्चित फार माजला होतास " असं ह्मणून एका घावासरसे महाराजांनीं **संग्रामसिंहजीं**चं मुडकं धडापासून वेगळं केलं व त्याच हातानं बिचाऱ्या **हरसिंगा**-च्याही प्राण घेतला !

**चंद्रसेन**–( आपल्याशीं ) हायरे दुष्टा ! (मूर्छित पडतो.)

**हरपाळ**–शिव शिव ! बाईसाहेब तो प्रसंग आज झाल्याप्रमाणं या डोळ्यासमोर दिसत आहे ! हायरे बापडया **संग्रामसिंहा** ! तुझा परिणाम असा व्हावाना ! (बेशुद्ध होतो.)

**इंदुमति**–शिव शिव ! महाराज कायहो हें निंद्यकर्म ! हाय हाय ! देवा कशीरे अशी दुःष्ट बुद्धि दिलीस ! ( बेशुद्ध होते. )

**गजरा**–अरे अरे ! बाईसाहेबाना मूर्छा आली ! बाईसाहेब सावध व्हा सावध व्हा ! आतां काय करावं दोघंही बेशुद्ध झालीं ! ( राणीस सावरून धरते. ! )

**चंद्रसेन**–( सावध होऊन क्रोधानें आपल्याशीं ) अरे नीचा **सारंगदेवा** ! दुःष्टा हें कर्म तुझंच काय ! आणि असा मी तुझा वैरी ॐ ! हरहर ! काय हा द्वेष ! हायरे गळेकापू, विश्वासघातक्या, कपटपटो ! जळोत तुझे ते हात ! अधमाध-

मा! अरे ज्या महात्म्यानें तूं आपल्या राज्याकरितां धाय धाय मोकलत जगभर हिंडत होतास, त्या तुला सहाय करून तुझं पूर्वपद तुला दिलं, त्याचीच कायरे ही फेड! (दांत खाऊन) कृतघ्ना! अरे तुझं हें नीचकर्म ऐकून माझ्या अष्टांगाची कशी आग होऊन गेली आहे! (शोकाकुल होऊन) हाय हाय! बाबा कायहो आपली दशा झाली! काय तें आपलं लोकोत्तर शौर्य, सुजनता, नीति, दयेचे केवळ आपण सागर होता, अशा आपल्या अनेक गुणाचं विलासपुरांतील सर्व लोक कीर्तन करीत आहेत आणि शोकाश्रूंनीं अद्यापी जलांजली देतात; अहा! त्या सत्पुरुषास तुझं हें बक्षीस अं! जळो तुझें तें जीवित आणि आग लागो तुझ्या त्या राज्यपदाला! अंगीं हिम्मत होती तर अधमा, शस्त्र हातांत घेऊन जागृत अवस्थेंत जायचं होतंस पुढं म्हणजे समजला असता तुला त्याचा तडाखा! निर्दया! अरे जसा एकादा विषारी सर्प न समजतां एकाद्यास दंश करितो, त्या प्रमाणं कपटानं हें अति घोरकर्म केलंस अँ! (शस्त्र उपसून दांत खात आवेशानें) पहातों आतां! ह्या दुःष्ट कृत्याचा सूड घेतल्यावांचून मी कधीं रहाणार नाहीं. एक तुला मारीन किंवा मी मरेन! (क्रोधानें निघून जातो.)

**हरपाळ**–(शुद्धीवर येऊन राणीकडे पाहून) अरे अरे! **गजराबाई**, बाईसाहेब बेशुद्ध झाल्या! बाई थोडं पाणी तरी डोळ्याला लाव! हरहर! देवा कुठलं मी आज हें दुःष्ट वर्तमान सांगितलं!

**गजरा**–मघापासून सारखे तेच उपाय चालले आहेत काय करावं (राणीच्या तोंडाकडे पाहून) बाईसाहेब अहो

**चंद्रसेन**–( संतापानें आपल्याशीं ) हाय रे दुष्टा !

**हरपाळ**–असं पाहून बाईसाहेब मी धावरून गेलों व एक सारखी माझी नजर तिकडे लागली. तों रागानं महाराजनं मिशावर ताव दिला, अस्तनी मागें सारली आणि तोंडा. कांहींसं पुटपुटत **संग्रामसिंहजी** जेथें निजले होते तेथें गेले. कांहीं तरी आज हें विपरीत आहे, असं मला वाटून मी झटकर उठून धांवत पुढं जातों, तों हर हर बाईसाहेब ! काय सांगूं ! " नीचा घे हें प्रायःश्चित फार माजला होतास " असं ह्मणून एका घावासरसे महाराजांनीं **संग्रामसिंहजींचं** मुडकं धडापासून वेगळं केलं व त्याच हातानं बिचाऱ्या **हरसिंगा**-चाही प्राण घेतला !

**चंद्रसेन**–( आपल्याशीं ) हायरे दुष्टा ! (मूर्छित पडतो.)

**हरपाळ**–शिव शिव ! बाईसाहेब तो प्रसंग आज झाल्याप्रमाणं या डोळ्यासमोर दिसत आहे ! हायरे बापडया **संग्रामसिंहा** ! तुझा परिणाम असा व्हावाना ! (बेशुद्ध होता.)

**इंदुमति**–शिव शिव ! महाराज कायहो हें निंद्यकर्म ! हाय हाय ! देवा कशीरे अशी दुःष्ट बुद्धि दिलीस ! ( बेशुद्ध होते. )

**गजरा**–अरे अरे ! बाईसाहेबाना मूर्छा आली ! बाईसाहेब सावध व्हा सावध व्हा ! आतां काय करावं दोघंही बेशुद्ध झालीं ! ( राणीस सावरून धरते. ! )

**चंद्रसेन**–( सावध होऊन क्रोधानें आपल्याशीं ) अरे नीचा **सारंगदेवा** ! दुःष्टा हें कर्म तुझंच काय ! आणी असा मी तुझा वैरी ॲं ! हरहर ! काय हा द्वेष ! हायरे गळेकापू, विश्वासघातक्या, कपटपटो ! जळोत तुझे ते हात ! अधमाध-

मा! अरे ज्या महात्म्यानें तूं आपल्या राज्याकरितां धाय धाय मोकलत जगभर हिंडत होतास, त्या तुला सहाय करून तुझं पूर्वपद तुला दिलं, त्याचीच कायरे ही फेड! ( दांत खाऊन ) कृतघ्ना! अरे तुझं हें नीचकर्म ऐकून माझ्या अष्टांगाची कशी आग होऊन गेली आहे! ( शोकाकुल होऊन ) हाय हाय! बाबा कायहो आपली दशा झाली! काय तें आपलं लोकोत्तर शौर्य, सुजनता, नीति, दयेचे केवळ आपण सागर होता, अशा आपल्या अनेक गुणाचं विलासपुरांतील सर्व लोक कीर्तन करीत आहेत आणि शोकाश्रूंनीं अद्यापी जलांजली देतात; अहा! त्या सत्पुरुषास तुझं हें बक्षीस अं! जळो तुझें तें जीवित आणि आग लागो तुझ्या त्या राज्यपदाला! अंगीं हिम्मत होती तर अधमा, शस्त्र हातांत घेऊन जागृत अवस्थेंत जायचं होतंस पुढं म्हणजे समजला असता तुला त्याचा तडाखा! निर्दया! अरे जसा एकादा विषारी सर्प न समजतां एकाद्यास दंश करितो, त्या प्रमाणं कपटानं हें अति घोरकर्म केलंस अँ! ( शस्त्र उपसून दांत खात आवेशानें ) पहातों आतां! ह्या दुःष्ट कृत्याचा सूड घेतल्यावांचून मी कधीं रहाणार नाहीं. एक तुला मारीन किंवा मी मरेन! ( क्रोधानें निघून जातो. )

**हरपाळ**–( शुद्धीवर येऊन राणीकडे पाहून ) अरे अरे! **गजराबाई**, बाईसाहेब बेशुद्ध झाल्या! बाई थोडं पाणी तरी डोळ्याला लाव! हरहर! देवा कुठलं मी आज हें दुःष्ट वर्तमान सांगितलं!

**गजरा**–मघापासून सारखे तेच उपाय चालले आहेत; काय करावं ( राणीच्या तोंडाकडे पाहून ) बाईसाहेब अहो

बाईसाहेब ! ( राणी डोळे उघडते तें पाहून ) हे पहा आतां किंचित् डोळे उघडले.

**इंदुमति**–(उठून सुसकारा टाकून)हाय ! हाय ! देवा, काय हा घोर प्रसंग आज ऐकिला ! जगंनिवास अशी कशी वरं तिकड बुद्धी दिलीस ! अरे अरे ! ज्यांनीं आह्मांला पदोपदीं सहाय केलं ! आह्मांकरितां ज्यांनीं नानातऱ्हेचे कष्ट भोगिले, त्यांची स्थिती अशी व्हावी अँ ! देवा, आतां हें जर **चंद्रसेन**बाळाला समजलं तर काय होईल ? तशीच ही हकीगत सर्व लोकांस समजली, तर त्यांच्या मनास वाईट वाटून ते सर्व आह्मांशीं बद्दलल्यावांचून राहतील काय ? शिव शिव काय करावं हें वर्तमान ऐकल्या पासून माझं काळीज कसं करपून गेलं आहे ! तर मग कायहो **हरपाळ**जी वाघानं खाल्लेल्याची बातमी खोटीच नं ?

**हरपाळ**–तें दुःष्ट कृत्य झाल्यावर, बाईसाहेब वाघानं मारल्याच्या निशाण्या करून, तीं दोन्हीं प्रेतं महाराजांनीं आणि मी एका गुहेंत दूर नेऊन ठेविलीं; नंतर मागून हुडकावयास गेलेल्या लोकांस तीं सापडलीं ! त्यावेळींच महाराजांनीं ती गोष्ट न फुटण्या बद्दल मजकडून शपथ घेतली.

**इंदुमति**–हर हर देवा ! काय हें मी आज ऐकलं ! नको नको असा प्रसंग वैऱ्यावरही येऊ नये: ( रडूं लागते ) **हरपाळजी**: आतां हा जन्म मला नकोसा झाला आहे !

**हरपाळ**–नका नका बाईसाहेब दुःख करूं नका, झाल्या गोष्टीस उपाय नाहीं ! आतां त्याबद्दल शोक करून काय फळ ?

**इंदुमति**–हूँः ! याकरितां कां **चंद्रसेनाला कमला** द्यायची

नाहीं! बरं तुह्मीच सांगा **हरपाळजी संग्रामसिंहजी** एक तिकडचे वैरी; पण बाळ **चंद्रसेनानं** काय बरं केलं आहे? त्याच्याशीं कसलं इतकं वैर?

**हरपाळ**–काय सांगूं बाईसाहेब! तिथं कांहीं बोलायची सोय आहे कां?

**इंदुमति**–हर हर देवा! माझी समूळ आशा कि रे आज नष्ट झाली! बाई **कमले** तुझे हेतु कसचे पूर्ण होणार! आतां हें वर्तमान तिला समजलं ह्मणजे काय बरं होईल! (रडूं लागते.)

**हरपाळ**–नको सरकार, आतां ती गोष्ट बिलकुल मनांत आणूं नये! प्रसंगाला पाठ दिली पाहिजे, उपाय काय?

**इंदुमति**–( सुसकारा टाकून ) अरे अरे! हें जग किती तरी मोहांत गुतलं आहे! हँ:, एक सुखाच्या आशेनं माणूस मरे मरे तों प्रयत्न करीत असतं, पण सारं व्यर्थ आहे! जगांत खरं सुख ह्मणून कसलं तें नाहींच अँ!

**हरपाळ**– हं चाललच आहे! (कांहीं वेळ स्तब्ध राहून) बरं येतों तर मी आतां आज्ञा. मघाशीं सांगितलेलं मात्र गुप्त असावं एवढी विनंति आहे. ( उठतो. )

**इंदुमति**– **हरपाळजी** मी शपथ दिली तरी अजूनी आपली खात्री नाहींन? तुह्मी त्याविषयीं अगदीं काळजी करूं नका; समजलां.

**हरपाळ**– येतों तर मी आतां. त्यांतून आपल्याला सांगतों कीं, संधी पाहून एकवार महाराजांपाशीं ती गोष्ट मी काढतों आणि त्यांचं ह्मणणं मी आपल्याला कळवितों. ( मुजरा करून जातो. )

**इंदुमति**–.( आपल्याशीं ) देवा, आतां हें कसचं जुळून

येणार! ही व्यर्थ आशा मात्र आहे! आतां धडगती दिसत नाहीं. तिच्या मनाची खात्री होती कीं, कसंही करून मी हें जमवीन ह्मणून; पण आतां मी काय करूं! ( डोळ्यांस पाणी आणून ) परमेश्वरा आतां माझा सर्व भार तुजवर आहे! या संकटांतून कशी पार पाडशील ती पाड झालं!

( दोघी निघून जातात. )

---

## प्रवेश ३.

**स्थळ—सारंगदेवाच्या महालाच्या खालचा बाग.**

( कोपाविष्ट झालेला व हातीं तरवार घेतलेला **चंद्रसेन** येतो. )

**चंद्रसेन**-- ( क्रोधानें ) हाय हाय! देवा! आतां मी काय करूं! मला कांहीं सुचेनासं झालं आहे! वादळानं जसा समुद्र खवळतो तद्वत हें अंतःकरण खवळून गेलं आहे! अरे अरे! बाबा तुमची गती अशी व्हावी काय! काय हा दैव! हर हर संसाराण्य किती भयंकर आहे! कामक्रोधादिक षड्रिपूंच्या प्राबल्यानं किती तरी अनर्थ मानवी प्राण्याच्या हातून होतात! बाबा ज्या वेळीं त्या दुष्टानं आपल्या गळ्यावर तरवार ठेवली, त्यावेळीं आपली काय बरं स्थिति झाली असेल! ( सुसकारा टाकून स्तब्ध राहतो. )

( इतक्यांत **कमला** व **आनंदी** प्रवेश करतात. )

**कमला**— ( आनंदानें ) **आनंदी**, बाई आतां कुठं बरं असेल स्वारी? दुसरी कडे कुठं, आईच्या महालांत असेल झालं? **अन्** आतां मी त्यांच्यापुढं जाऊं तरी कशी? मला बाई लाज वाटते.

**आनंदी**—वाहवा! हें काय मेलं असं बोलतां; यांत लाज ती कसली? (पुढें कोणी आहेसें पाहून) अगबाई ताई-साहेब! इथं कोणसं आहे, पोषाख भव्य आहे आणि हातांत तरवार घेऊन इकडून तिकडं हिंडत आहे! मला वाटतं रावसाहेबच!

**कमला**—अग बाई खरंच कीं; तुला नाहीं कां ओळखले! पण हें काय? चित्त व्यग्र झालेलं दिसतं आहे; तशीच हातांत तरवार आहे आणि ती नागवी! (थोडा वेळ स्तब्ध राहून) अग ऐक, रागानं आपल्याशीं कायसं बोलत आहेत! हें काय आहे बाई कांहीं कळत नाहीं! आपण इथंच थोडावेळ आड उभ्या राहूंया. (स्तब्ध उभ्या राहतात.)

**चंद्रसेन**-(आपणाशीं) अरे अरे! काल काय विपरीत आला पहा! हं:, ज्याला पाहतांच शत्रूंनीं थरकांप ध्यावं! एका घटकेंत रंकाचा राव आणि रावाचा रंक करण्याची ज्याची शक्ती! **संग्रामसिंह** हें नांव ज्याला योग्य! अशा त्या महापुरुषाचा प्राण, अधमाधम चांडाळा **सारंगदेवा** त्वां कपटानं असा घ्यावास काय? नरपशो अरे भूतदया ह्मणून काय पदार्थ आहे, हें तुला माहीतच नाहीं अँ! हर! हर! बाबा! ज्या वेळीं त्या निर्दयानं तें अघोर कर्म केलं, त्या वेळीं आपल्याला किती दुःख झालं असेल! किती तरी विचार मनांत आले असतील! माझ्या प्रियकर आईची तशीच माझी आठ-वण झाली असेल! आपल्या मागं आमचं कसं होईल! आ-मचं पालन पोषण कोण करील! असे शेंकडों विचार मनांत आले असतील! पण नाहीं, असं कशानं होणार! ज्याप्र-माणं विद्युत्पातानं एकाद्या पदार्थाचा नाश व्हावा, त्याप्रमाणं

दुष्टा तुझं तें निर्दय शस्त्र माझा तात निद्रिस्त असतां, त्याचा कंठनाल भेदून गेलं असेल ! मग कोठून हे विचार त्यांच्या मनांत येणार ! हाय हाय ! आई तुला तें वर्तमान एकाएकी ज्यावेळीं समजलं असेल, त्यावेळीं तुझी स्थिति काय झाली असेल ! देवा दुसरं काय होणार ! ( डोळ्यांस पाणी आणून ) एकदम आकाश कोसळल्यासारखं वाटलं असेल आणि दुःखानं रडून रडून तूं आकाशपाताळ एक केलं असशील ! आई, ज्या वेळीं त्या दुःखोद्वेगानं तूं सहगमन केलंस, त्या वेळीं मला सोडून जाणं तुला फार अवघड झालं असेल ! जीव किती वेळ अडकून राहिला असेल ! आई ! ज्यावेळीं तूं मला शेवटचं प्रेमालिंगन देऊन, माईसाहेबांच्या ओंच्यांत घातलंस, तेव्हांपासून आजपर्यंत त्यांनीं तुजप्रमाणं ममतेनं माझा प्रतिपाल केला; त्यामुळं आई ! तुझी आणि बाबांची कधीं मला आठवण सुद्धां झाली नाहीं ! ती आज मला झाली ! आपण उभयतां एकाकी मला सोडून गेला, त्यावेळीं मी जरीं अगदीं लहान होतों, तरी आपण आज माझ्या डोळयासमोर मूर्तिमंत दिसत आहां ! हर हर ! देवा आतां मी काय करूं ! ( शोकाकुल होऊन ) हे आई! अहो बाबा ! तुम्ही मला टाकून कसे हो गेलां ! ( मूर्छित होऊन धाडकन् जमिनीवर पडतो. )

**कमला**—( धावून लगबगीनें पुढें येऊन ) आनंदी अग बाई धांव ग धांव ! पाणी तरी थोडं आण ! हर ! हर ! देवा मूर्च्छा येऊन बेशुद्ध किंग पडले ! ( **चंद्रसेनास** सावरून धरून पदरानें वारा घालते ) हाय हाय ! परमेश्वरा काय संकट हें आलं ! ( डोळ्यांस पाणी आणून ) भेटीकरितां

किती उत्सुकतेनं आलें आणि काय मेलं भलभलतं ऐकलं!
प्रिया सावध व्हा! सावध व्हा! (इतक्यांत आनंदी पाणी आणते व कमला तें चंद्रसेनाच्या डोळ्यास लावते व वारा घालते.)

कमला—बाई आनंदी आतां मी कायग करूं? (रडूं लागते.)

आनंदी—(चंद्रसेनानें किंचित डोळे उघडलेसें पाहून) ताईसाहेब रडूं नका, हे पहा रावसाहेब सावध झाले.

(चंद्रसेन सावध होऊन धडपडीनें उठून वीरासनावर बसतो.)

चंद्रसेन- (आपल्याशीं.) हाय हाय! बाबा! आपल्या घाताची बातमी ऐकून माझ्या अष्टांगाची कशी आग होऊन गेली आहे! (दांत खात) केव्हां जाऊन त्या दुःष्टाच्या नरडीचा घोट घेईन असं मला झालं आहे! हें हृदय आतां वज्रापेक्षां कठीण झालं आहे! खचित खचित याचा सूड घेतल्यावांचून मी कधीं रहाणार नाहीं! दुःष्टा सारंगदेवा! अरे आजपर्यंत तूं हजारों अति निंद्य कर्मे केलीस, कीं जीं ऐकलीं असतां अंगावर शहारे उत्पन्न व्हावे! पण त्यांकडे मी बिलकुल लक्ष्य दिलं नाहीं; कारण तूं माझा अन्नदाता पडलास, आणि ज्या ताईनीं पोटच्या पोरापेक्षांही अधिक ममतेनं माझा प्रतिपाळ केला, तिजकडे पाहून मी स्वस्थ होतों; पण दुःष्टा कृतघ्ना! आज जें तुझं घोर कर्म ऐकलं, त्यावरून तूं खचित खचित क्षमेला पात्र नाहींस! दाखवितों चांडाळा तुला आतां माझा हात! (आकाशाकडे पाहून) अहाहा! किती तरी आजची ही काळरात्र भयंकर आहे! जिकडे तिकडे गाढ अंधःकार

पसरला आहे ! व सर्वत्र सामसूम झालं आहे ! आकाशांत काळे निळे ढग कसे इकडून तिकडे नाचत आहेत ! मला वाटतं कीं, यमराजाची स्वारीच आपले मृत्युपाश घेऊन खालीं उतरत आहे ! तशीच नदीतीरची स्मशानभूमी पहा कशी दुष्टा तुझी आहुती घेण्याकरितां आ पसरून बसली आहे ! तर हीच वेळ माझं कार्य साधण्यास उत्तम आहे. ( पुन्हां आकाशाकडे पाहून हात जोडून ) तात ! देतों बरं खास आतां त्यास प्रायःश्चित ! तरच नांवचा हा **चंद्रसेन.** ( तरवार घेऊन आवेशानें उठतो व इकडे तिकडे फिरतो. )

**कमला**— ( आपल्याशीं ) हर हर देवा ! आज काय अनर्थ होणार आहे कांहीं समजत नाहीं ! काय बाई आश्चर्य आहे ! आमच्या बाबांनीं कपटानं **संग्रामसिंहजींचा** वध केला अँ ! छीः असं होईल तरी कसं ! तर मग मागं ऐकलेली त्यांच्या मरणाची हकीगत खोटीच ना ? हंः, दुर्दैवी **कमले !** आतां कसचे तुझे हेतु पूर्ण होणार ! ( **चंद्रसेना**जवळ जाऊन ) महाराज मजकडे पहा. काय ? इकडं पहायचंही नाहीं ? ही आपली लाडकी **कमला** ! प्रिया मजकडे लक्ष्यही नाहीं अँ !

**चंद्रसेन**— ( क्रोधानें आपल्याशीं ) **चंद्रसेना.** अरे स्वस्थ काय आहेस ! वेड्या, अरे ही वेळ अशी दवडण्याची काय ? छीः आतां विलंब उपयोगीं नाहीं ! दुष्टा आलों बरं. आतां थोड्याच वेळांत तुला यमपुरीस पाठवितों. ( राजाच्या महालाकडे पाहून ) अरे ! पण हें काय ? आज महाल बंद कां ? ( आठवून ) हं आलं लक्ष्यांत ! आज तो हरामखोर शिका-

रीला गेला आहे, असं मघांशी समजलं ! ( खिन्न होऊन ) अरे अरे काय करूं ! आज माझे मनोरथ पूर्ण होत नाहींत तर ! ( विचारांत उभा रहातो. )

**कमला**–महाराज, हे काय बरं आपल्या मनांत भलभलते तरंग उठत आहेत ? प्रिया, आपलं भाषण ऐकून आज माझ्या काळजाचं कसं पाणी होऊन गेलं आहे ! हाय हाय ! प्रियकरा ! माझ्या बावांचा प्राण तुझी घेणारनं ! अग आईग काय हा प्रसंग मजवर आला ! देवा आतां मी काय करूं ! प्रियकरा! आज आपल्याला झालं तरी काय ! नेहमी आपळं मुख कसं आनंदित असावयाचं, त्याकड पाहून आज मला भय वाटत आहे ! आपले नेत्र किती कावरेबावरे झाले आहेत ! तसंच सर्व शरीर क्रोधानं संतप्त झालं आहे ! आपला हा आजचा वेश पाहून माझ्या जीवाचा थरकांप झाला आहे ! ( हात जोडून ) प्रिया ! आपण मला ओळखली नाहीं काय ? (त्यास आलिंगून) ही आपली दीन दासी **कमला** !

( चंद्रसेन तीस झिडकारून एकीकडे होतो. )

**आनंदी**–रावसाहेब मघांपासून ह्या पहा ताईसाहेब आपल्याशीं बोलत आहेत इकडं लक्ष्य द्यावं; किती तरी आपल्याला भेटण्याकरितां त्या उतावीळ झाल्या होत्या.

**चंद्रसेन**–( तिकडे लक्ष्य न देतां आपल्याशीं ) असो हरामा, अरे आज तूं एक ह्या सिंहाच्या तडाख्यांतून सुटलास तरी जाशील कुठं ? ही पृथ्वी फोडून पाताळांत गेलास तरी तेथें येऊन मी आपला सूड घेईन. ही केवळ मरणाला रात्र आडवी आहे.

**कमला**–( **चंद्रसेना**जवळ जाऊन आपणाशीं ) हर हर!

देवा ! हे आतां बाबांचा जीव घेणारन ! अग आईग आतां मी काय करूं ! ( उघड ) महाराज ही आपली कमलानं मग कां बरं असं ? प्रिया बोला हो बोला, मजकडून अपराध तरी काय झाला आहे असा अबोला धरावयाला ? एकादी मजकडून चूक झाली असेल तर क्षमा करा. प्राणनाथ भुईवर जर पाय निसरला तर त्याला सावरणारी तीचन. अग बाई काय मजकडे पहावयाचं देखील नाहींन ! ( डोळ्यांस पाणी आणून) शिव शिव देवा ! शेवटीं गोष्ट या परिणामाला आली नं ! आजपर्यंत मी आपल्या येण्याची वाट चातकासारखी पहात होतें; त्याचा शेवटीं हा परिणाम व्हावा काय ! प्रिया इतका कोप यावयाला अशी बातमी तरी मेली आपल्याला कोणी सांगितली ! देवा काय हा अनर्थ ! ( चंद्रसेनाच्या हातचें शस्त्र धरून ) महाराज इकडे पहा, ही मी आपली कमला आलें आहें ! काय बरं मजकडं इतकं न पहायाला झालं आहे ?

**चंद्रसेन**–( कमलेस एकीकडे करून आपल्याशीं ) अरे दुष्टा घातक्या ! आतां मी हा तुझा सूड घेणार ! अधमा! अरे-ज्याला ह्मणून मन आहे व जो मनुष्य आहे तो अशा कृत्याचा सूड घेतल्यावांचून स्वस्थ राहील काय ? आज नाहीं उद्यां मी तर तुझा प्राण घेणार.(कांहीं वेळ स्तब्ध राहून) पण नाहीं याला विलंब उपयोगीं नाहीं; आतांच चतुरंगगडावर जाऊन त्याला गांठतों ( मिशावर ताव देऊन व तरवार पडताळून ) अरे नीचा हारामखोरा ! ( दांत खात ) हा मी आलों पहा ! ( आवेशानें जाऊं लागतो. )

**कमला**–( चंद्रसेनास अडवून ) प्रिया, असं काय बरं

मेलं करायचं; मी नाहीं जा सोडणार. महाराज कधी नव्हे तें आज काय हें आपल्याला झालं आहे? काय बरं हें साहस करण्याचं मनांत आणलं आहे? आपल्याला किती तरी संताप झाला आहे हा! चित्तवृत्ति ही भ्रमिस्तासारखी झाली आहे! ( आपल्या पदरानें त्याच्या तोंडावरील घाम पुसून. ) अग बाई वाटेचे श्रम तरी किती झाले आहेत! हें काय बरं, मी नाहीं गडे जाऊं द्यायची! ( **चंद्रसेनास** आलिंगितें तों **चंद्रसेन** तिला ढकलतो तेणेंकरून ती मूर्च्छा येऊन पडते. )

**आनंदी**–( गडबडीनें तिला सांवरून ) अग आई राव-साहेब काय हो हें केलंत! ह्या पहा ताईसाहेब आपल्याला प्रेमानं आलिंगावयास आल्या असतां तुह्मी त्यांना ढकलून किहो दिल्यात! ( **कमले**कडे पाहून ) अग बाई ताईसाहेब तर अगदींच बेशुद्ध झाल्या! हाय हाय! अहो धांवाहो धांवा; रावसाहेब आतां अंत पाहूं नका: ( **कमले**स ) ताईसाहेब अहो ताईसाहेब! नाहीं शुद्धि नाहीं!

**चंद्रसेन**–( **कमले**कडे पाहून व ओळखून ) हाय हाय! कोण माझी प्रियसखी **कमला** काय! घात झाला! अरे अरे! काय अवस्था तरी हिची झाली आहे! ( तरवार खालीं टाकून तिला मांडीवर घेतो व **आनंदी**स ) अगे हिला काय बरं झालं?

**आनंदी**–काय सांगूं रावसाहेब, मघांपासून ताईसाहेब आपल्याला बोलवीत असून तिकडं लक्ष्य न देतां -आपण आपल्याच नादांत होतां व त्या जवळ आल्या असतां भान न राहून आपण त्यांना ढकलल्यात तेणेंकरून मूर्च्छा येऊन त्या पहा अगदीं निचेष्टित पडल्या!

**चंद्रसेन**–हर हर ! काय प्रमाद घडला ! प्रिये **कमले** सावध हो ! हा पहा तुझा प्रियकर **चंद्रसेन** तुजजवळ आहे ! **अने** अग थोडं पाणी तरी आण. ( **कमले**चा घाम पुसून वारा घालतो. )

( **आनंदी कमले**च्या डोळ्यास पाणी लावते तेणेंकरून ती सावध होते. )

**कमला**–( डोळे न उघडतां आपल्याशीं ) हर हर देवा ! काय मी मघांपासून ऐकतें आहे ! हँ, काय मेला चमत्कार ! बाबांनीं आणि **संग्रामसिंहजीं**ना मारलं? छी छी ! असं कधीं होणार नाहीं ! शिव शिव देवा ! कोणी तरी दुष्टानं आमचं प्रेम न साहून प्राणप्रियाच्या मनांत हें भलतं भरवून दिलं असावं ! जळो त्याची जीभ ! त्या मेल्याचा सत्यानाश होवो! प्रियकरा,आपण आला असें समजतांच किती पण लग-बगीनं मी आपल्याला भेटायला आलें ! आणि एथें पाहतें तों सर्वच विपरीत! हाय हाय! प्रिया, आतां मी काय हो करूं ! आजपर्यंत मी पुढच्या आशेवर दिवस काढले, त्याचा काय हा घोर परिणाम झाला ! माझी आतां जगण्याची आशा संपली! देवा आतां हे प्राण तरी ठेऊन काय करायचे आहेत ! हर हर प्रिया ! मी आतां कोणाला शरण जाऊं ? हे दीनदयाळ प्रभो! ने एकदां आपल्या चरणापाशीं ! ( पुन्हां बेशुद्ध होते. )

**चंद्रसेन**–( आनंदित होऊन ) अहाहा ! प्रिये तुझं प्रेम मजवर पूर्ववत आहे न? देवा धन्य आहें मी. सखे सावध हो आणि मजकडे डोळे उघडून पहा ? मजकडून मोठा अपराध झाला आहे त्याची क्षमा कर ! हा तुझा प्रेमानं बद्ध झालेला **चंद्रसेन** तुला शरण आला आहे ! ( थोडा वेळ

स्तब्ध राहून निराशेनें ) हं:, पण काय मी आतां वेड्यासारखा प्रिये प्रिये ह्मणत आहे ! वा चंद्रसेना आतां कुठलं रे बाबा तुझ्या नशीबीं तें सुख !

**कमला**– ( सावध होऊन ) सखे आनंदी नको नको आतां कशाला मला सावध करितेस ? झाला आज सर्व शेवट झाला ! पुढील सर्व सुखाला मी अंतरलें ! हे प्रभो दीनदयाळ आतां तुजपाशीं या दासीचं दुसरं कांहीं मागणं नाहीं; आतां हा दुःखभार माझ्यानं सहन करवत नाहीं; कसंही करून या अभागिणीचे डोळे झांक आणि एकदाची यांतून मुक्त कर. आई जगदंबे, माझ्या मनाप्रमाणं सर्व यथास्थित झालं, ह्मणजे मोहरा पुतळ्यांनीं तुझी ओटी भरीन ह्मणून नवस केला होता, त्याचं हेंच का फळ ? बरं असो, त्यांत तुजकड तरी काय आहे ? आपलंच कर्म समजावयाचं ! आतां एवढं कर कीं अन्यजन्मीं तरी माझा प्रियकराशीं समागम व्हावा ! ( सुसकारा टाकते. )

**चंद्रसेन**– ( आपल्याशीं ) अरे अरे ! किती निर्दय मी ? गंगोदकाप्रमाणं निर्मळ अंतःकरणाच्या माझ्या प्रियसखीस मी किती तरी त्रास दिला ! सखे डोळे उघड आणि इकडे पहा; हा तुझा प्रियकर चंद्रसेन तुजजवळ आहे ! ( तिच्या तोंडावरून हात फिरवितो. )

**आनंदी**–ताईसाहेब आतां किती दुःख कराल —हे पहा रावसाहेब आपल्याला मांडीवर घेऊन बसले आहेत. एकदां डोळे उघडून पहा तरी त्यांजकडं.

**कमला**– ( चंद्रसेनाकडे पाहून लाजून एका बाजूस होऊन ) हं:, काय तरी बाई हें ? अने अग इतका वेळ मी

आपली खुशाल मांडीवरच होतें न ? (आपल्याशीं ) अहाहा! धन्य झालें मी; प्रियाच्या मांडीवर पडून इतका वेळ मी स्पर्श-सुख अनुभवलें (हसून उघड) बरं पण प्रिया मजांशीं काय आपण भलभलतं बोलत होता ? आपल्याला कोप तरी मेला किती आला होता ! मी किती वेळ बाई विनवणी करीत होतें, पण तिकडे कांहीं तरी लक्ष्य होतं कां ? असं एकाएकी काय गडे झालं होतं कोण जाणे ?

**चंद्रसेन**–( तिच्या खांद्यावर हात टाकून ) प्रिय सखे नको नको आतां तो विचार. ( कांहीं वेळ स्तब्द राहून आपणाशीं ) हं:, पण वेड्या **चंद्रसेना** तूं कशाला आतां प्रिये प्रिये असा जप करतोस ? राजकन्ये आतां कुठली तूं माझी प्रिया ! ( दुःखित होऊन ) हर हर देवा ! माझ्या पुढील सर्व सौख्याचा आशातंतुच तुटून गेला ! माझ्या मनोरथाचा भंग झाला ! आतां मी ढिला व्यर्थ प्रिये प्रिये ह्मणून कशाला हाक मारूं !

**कमला**– ( दुःखित अंतःकरणानें ) काय काय प्राण-नाथ आपण काय ह्मटलंत ? मी निराधार झाले अँ ! ( डो-ळ्यांस पाणी आणून) हर हर देवा! काय हें मी ऐकतें आहे! फुटक्या नशीबा अरे काय मजवर प्रसंग आला ! देवा आज-पर्यंत मला पूर्ण आधार होता कीं, कांहीं जरी झालं तरी माझ्या प्राणेश्वराशीं जें माझं वचन झालं आहे, तें जीवांत जीव आहे तोंवर खाचित मोडणार नाहीं ! पण हर हर आतां तेंही व्यर्थ झालंन ! ( रडूं लागते. )

**चंद्रसेन**– ( तिचे डोळे पुसून हनुवटीस हात लावून) नको नको सखे रडूं नको! उगाच शोक करून आपल्या जि-

वाला क्लेश कां देतेस ! मी आपलं वचन प्राणांतींही मोडणार नाहीं; जरी माझे मनोरथ पूर्ण न होतां, मी संसारसुखांला अंतरलों, तरी अन्य स्त्री मी कधींही वरणार नाहीं. सारा जन्म मी दुःखांत असा घालवीन आणि त्याविषयीं मला कांहीं वाटत नाहीं; पण प्रिये तुझं दुःख पाहून जो मला ताप होईल त्याचं निवारण होणं कठीण आहे ! ( कांहीं वेळ स्तब्ध राहतो तों पूर्वीचें स्मरण होऊन ) पण अरेरे ! **चंद्रसेना** धिग् धिग् तुझं जिणं ! कुलांगारा ! अधमा ! अरे तूं आपल्या कर्तव्याला विसरून, आनंदांत संसारसुखाची आशा करीत बसलास काय ? तुला लाज नाहीं वाटत ? ( रागानें ) दुष्टा अरे हेंच काय तुझं पितृप्रेम ! हाच काय तुझा अभिमान ! हेंच काय तुझं शौर्य ! मूर्खा काय दृढनिश्चय केला आहेस त्याचं स्मरण कर ! ( आकाशाकडे पाहून हात जोडून ) हाय हाय ! तात ! मी अपराधी आहें. क्षमा करा. मी आपल्या कर्तव्याला कधीं विसरणार नाहीं ! ( रागानें शस्त्र हातांत घेऊन दांत ओठ खात ) अरे कृतघ्ना चांडाळा **सारंगदेवा** माझ्या पित्याचा घात तूंच केलासन ? दुष्टा तूं खूप समजून ऐस कीं, मी तुझा सूड घेणार ! चला आतां विलंब न करतां कृतसंकल्पाप्रमाणं कार्य तडीस नेलं पाहिजे ! ( आवेशानें निघतो. )

**कमला**—( त्यास अडवून ) हाय हाय ! प्रिय अद्यापी नाहीं कां तें मेलं भलतं आपल्या मनांतून गेलं ! ( आश्चर्यचकित ) अग बाई ! इतक्याच्या इतक्यांत किती तरी चर्येंत फेर झाला ! शिव शिव देवा काय अनर्थ हा ! हाय हाय आतां मी काय करूं ! प्राणनाथ कुणी मेल्यानं आपल्याला हें

भलभलतं सांगितलं सांगा तरी बाई त्याचं नांव ! असं खोटं नाटं उठविणार आहे तरी कोण मेलं ?

**चंद्रसेन**–प्रिये मी ऐकलेली सर्व हकीगत खरी आहे आणि ती इतकी विश्वसनीय मला समजली आहे कीं, तिच्या सत्यतेविषयीं आतां शंकाच नको ! माझ्या बाबांचा प्राण त्याच दुष्टानं घेतला यांत संशय नाहीं ! हायरे निर्दया !

**कमला**–प्राणनाथ पण कृपा करून सांगाना हें कसं आपल्याला कळलं तें !

**चंद्रसेन**–( दुःखित होऊन ) हर हर ! प्रिये तुला काय सांगू ! त्या घोर कर्माचा साक्षीदार, कीं ज्यानं आपल्या डोळ्यानं तें निंद्य कर्म पाहिलं त्या **हरपाळानं** आतांच माझ्या बाबांच्या वधाची भयंकर हकीगत माईसाहेबांना सांगितली; ती प्रत्यक्ष मी या कानांनीं ऐकली ! अरे अरे काय घोर कर्म हें ! सखे तें ऐकल्यापासून माझ्या सर्वांगाची आग होऊन गेली आहे ! काय करूं ! मला भान नाहींसं झालं आहे; फार तर काय या जीवावरही मी उदार झालों आहें ! हाय हाय ! प्रिये सोड सोड जाऊं दे मला. केंव्हां त्या चांडाळाच्या नरडीचा घोट घेईन असं झालं आहें ! ( दांत ओठ खाऊन ) अरे नीचा घोरकर्म्या !

**कमला**–( दुःखानें ) हाय हाय प्रियकरा ! तुह्मी माझ्या बाबांचा प्राण घेणार अं ! अग आईग आतां मी काय करूं ! प्राणनाथ हा आपला विचार ऐकून माझ्या काळजांत धस्स होऊन गेलं ! शिव शिव परमेश्वरा काय अनर्थ हा ! प्रिया किती तरी आपली मुद्रा मला भयंकर दिसत आहे ? मला तिकडं पहावत सुद्धां नाहीं ! अग बाई संतापानं सर्वांग किती

लाल झालं आहे! डोळे इंगळासारखे आरक्त झाले आहेत, सर्व शरीर थरथर कांपत आहे! यावरून माझा आज खचित घात होणार हें मी समजलें; पण प्रियकरा नका हो नका असं करूं! मी आपल्याला हात जोडतें, पदर पसरतें, आपण मनांत आणलेला विचार सोडून द्या. तुह्मांला माझ्या गळयाची शपथ आहे. माझ्या बाबांकरितां मी पदर पसरून आपल्याजवळ क्षमा मागतें. त्यांच्यावर दया करा! टाका तें भयंकर शस्त्र. ( शस्त्र काढून घेऊन ) प्रिया, आपण माझ्या बाबांचा प्राण घेतलात, तर आईला किती तरी दुःख होईल? हें सारं आपल्याला समजत असून, काय बरं हें असं करितां?

**चंद्रसेन**—(खिन्न होऊन) अरे अरे! काय करूं? इतका वेळ हा विचार माझ्या मनांत बिलकुल आला नव्हता; प्रिये योग्य वेळीं सुचविलंस. अहारे **चंद्रसेना** कृतघ्ना! अरे ज्या माउलीनं तुझा लहानपणापासून ममतेनं प्रतिपाल केला! जिचं प्रेम प्रत्यक्ष पोटच्या मुलापेक्षां तुजवर जास्त! अशा साध्वीला दुःसह दुःख उत्पन्न करणारं कृत्य करण्यास निर्दया चांडाळा तूं सिद्ध झालास अँ! धिग् धिग् तुझं जिणं! हर हर! माईसाहेब आपल्या उपकाराची फेड मी अशी करूं काय? शिव शिव! **चंद्रसेना** तुला हें योग्य नव्हे! ( कांहीं वेळ स्तब्ध राहून ) हाय हाय! तात आतां मी काय करूं! माझं मन घोटाळून गेलं! आतां मला कांहीं सुचत नाहीं! ( **कमलेस** ) प्रियसखे **कमले**, आतां तूंच कांहीं सुविचार सांग या **चंद्रसेनाला**!

**कमला**—( आपणाशीं ) हर हर! काय संकट हें मजवर आलं! देवा आतां मी यांना काय सांगूं! प्रियकरा, जितके

तुह्मी मला प्रिय आहांत, तितकेच माझे बाबाही मला प्रिय आहेत! त्यांनीं जें घोरकर्म केलं, त्याजबद्दल आपण [illegible] णाल त्या शिक्षेस ते पात्र आहेत! परंतु महाराज मी आप-ल्याला पदर पसरून विनंति करितें! कृपा करून मजकरितां आणि माझ्या आईकरितां, त्यांना त्या अपराधाची क्षमा करा.

**चंद्रसेन**–( खिन्न मनानें ) हं: काय? त्या दुःष्टानं कपटा-नं माझ्या बाबांचा घात केला असून, म्यां स्वस्थ बसावं अं! नाहीं नाहीं; हा क्रोधाग्नी कधीं शांत होणार नाहीं! प्रिये सांग सांग तुला तरी हें योग्य दिसतं काय? अरे काय करावं मोठा विचार आहे. ( कांहीं वेळ स्तब्ध राहून ) याला आतां दुसरी तोडच नाहीं. एक आपण आपल्या प्राणाची आशा सोडली ह्मणजे झालं! सखे मी तुला आतां सांगतों तसं कर. "आपल्या पित्याचा घात तुह्मी केला, हें चंद्रसेनाला समजून, त्याबद्दल सूड घ्यावा ह्मणून आपणास ठार मार-ण्याचा विचार मी केला आहे" असं आपल्या बाबांना सां-ग; ह्मणजे तो चौकशी करील व मीही आपला अपराध कबूल करीन; नंतर तो मला खास देहांत प्रायःश्चित देईल, आणि एकदांचा मी या दुःखांतून मुक्त होईन. आतां तुझ्या संबं-धानं मी निराश झालों आहे आणि मला जगण्याची आशाही नाहीं; तर एवढी माझी विनंति मान्य कर.

**कमला**– ( दुःखानें ) हर हर जिवलगा! मी आपला घात करवूं? आणि मला तरी जगून काय करावयाचं आहे! शिव शिव जगंनिवास! ( मुर्छित होऊन पडते. )

**चंद्रसेन**– ( दुःखित होऊन ) अरे अरे देवा! काय हें झालं! ( **कमले**स सांवरून धरून ) माझी प्रिया अगदींच

किंहो बेशुद्ध झाली ! ( डोळ्यांस पाणी आणून ) हाय हाय प्रियसखे **कमले** सावध हो, सावध हो ! देवा किती तरी मी निर्दय ? काय मी भलभलतं बोललों ! प्रिये सावध हो आणि मजकडे पहा ! तुझ्या गळ्याची शपथ घेऊन सांगतों कीं, याउपर मी सूड घेण्याचा विचार अगदीं सोडून दिला. ( तिच्या गालावरून हात फिरवून ) माझ्या प्राणा ऊठ ऊठ !

**कमला**– ( शुद्धीवर येऊन शोकाकुल होऊन ) हर हर प्राणनाथ ! असं घोर कृत्य करावयास आपण मला कसं हो सांगतां ! देवा मी इतकी निष्टुर आहें अँ ! मला अजूनी आपण ओळखिली नाहीं काय ? ( रडूं लागते. ) आपल्याला मारवून प्रिया मला तरी मागं जगून काय करायचं आहे !

**चंद्रसेन**– ( तिचे डोळे पुसून ) नको नको आतां ते शब्दसुद्धां पुन्हां उच्चारूं नको. मी तुझ्या गळ्याची शपथ घेऊन सांगतों कीं, मनांत आणलेलं कृत्य करायचं सोडून दिलं !

**कमला**–( **चंद्रसेना**स आलिंगून आनंदानें ) देवा ! किती उदार अंतःकरण हें ? आतां माझा जीव स्वस्थ झाला ! प्राणनाथ हें सारं वर्तमान माझ्या आईला समजलं, ह्मणजे किती तरी तिला आनंद होईल ? चला तर आपण तिला भेटून हें सर्व सांगू. मी पुढं जातें, तों आपण यावं, ( जावयास निघते तों स्मरण होऊन ) पण प्रिया सर्वच मेलं एकीकड राहिलं; आज सकाळपासून जेवणखाणं नसेल ? ( **आनंदीस** ) **अने** जाग खालीं लवकर तयारी करीव.

**आनंदी**– रावसाहेब आल्याची बातमी ताईसाहेब मघांशींच समजली आहे; मुत्पाकाकडं तयारी झालीच असेल; मी आतां जाऊन शोध घेऊन येतें ( जाते. )

**कमला**– ( **चंद्रसेनास** ) चलायचंन तर मग.

**चंद्रसेन**–( खिन्न मनानें आपल्याशीं ) देवा! माईसाहेबांकडे ऐकलेल्या हकीगतीवरून माझे मनोरथ पूर्ण होतीलसं दिसत नाहीं. असो ईशेच्छा ! ( **कमलेस** ) प्रिये चल तर.

( दोघें निघून जातात. )

**द्वितीय अंक समाप्त.**

# अंक ३.

**प्रवेश १ विलासपुरास जाण्याचा रस्ता.**

( पुरुषवेष घेतलेली व श्रमित झालेली **चंपकमाला** प्रवेश करते. )

**चंपकमाला**–( आपल्याशीं दुःखानें ) हुःश ! **जयनगराहून** निघून वीस दिवस झाले; अजून मेलं तें **विलासपूर** किती दूर आहे कोण जाणें ! हंः, देवा, कायरे हे माझे हाल मांडले आहेस ! हरहर ! हतभागी **चंपकमाले** अशी तूं दुर्दैवी जन्माला तरी कशाला आलीस ! अरे अरे काय दशा आली ही! ज्या माझ्या सेवेस हजारों दासी तत्पर असावयाच्या, जी सुग्रास अन्नं खाऊन, आवडतील ते सुंदर दागिने व वस्त्रें लेवून आनंदांत असावयाची, जिला कुठंही चार पावलं जाणं झालं, तरी मेणा, पालखी-यांवांचून माहीत नाहीं, तिची स्थिति परमेश्वरा कायरे ही केलीस ! वेळेला अन्न नाहीं, पाणी नाहीं, चालून चालून पायांला फोड आले, श्रमानं आणि चिंतेनं शरीराचा अस्थिपंजर मात्र राहिला आहे ! शिव शिव जगंनिवास, सोडीव मला या यमयातनेंतून ! हंः, पण असं कुठून होणार ! एकंदरींत हा मेला कालचक्राचा फेरा कठीण आहे ! असो, नशीबीं जें आहे तें कशानं चुकणार ? ( कांहीं वेळ थांबून रागानें ) हाय हाय काय करूं ? या **चंपकमाले**ची अशी स्थिति करण्याला, मेल्या निर्दया **चंद्रसेना** तूंच रे तूंच कारण! त्याची आठवण

झाली कीं अंगाचा तीळपापड होऊन जातो. ( बोटें मोडून दांत खात ) रे चांडाळा पाषाणहृदया ! जेव्हां मजप्रमाणं तुझा मनोभंग झालेला पाहीन, तेव्हांच हे डोळे निवतील. हर तेन्हेनं मी तुझा सूड घेतल्यावांचून कधीं राहाणार नाहीं. ( कांहीं वेळ स्तब्ध राहून ) हंः, काय चमत्कार आहे पहा ! वेळ आली कीं कोणतंही होणं अशक्य नाहीं, नाहीं तर त्या मेल्याच्या मामाच्या घरून कां माझी सुटका होणार होती! पण संधी साधून, तेथून सुटून पुरुषवेशानं येथपर्यंत तर आलें. असो, चला आतां हळूं हळूं मुक्काम गांठला पाहिजेः ( चिंताग्रस्त होऊन ) पण आतां पुढील रस्त्याची माहिती कुठं वरं लागेल ? ( इकडे तिकडे पाहून) या मळ्यांत माणस काम करीत आहेत तिथं सारा शोध लागेल. आतां तिकडच जाऊन शोध करावा.)

( निघून जाते. )

---

## प्रवेश २.

**स्थळ**–विलासपूरच्या राजवाड्यांतील दरबारची जागा.

( **मणिपाळ** आणि **नारायणप्रसाद** प्रवेश करतात. )

**मणिपाळ**–या **नानासाहेब**, असे या.

( दोघे बसतात. )

**नारायणप्रसाद**–काय हो **मणिपाळजी**, आज दरबारचंसं बोलावणं झालं ?

**मणिपाळ**–मला पक्कीशी बातमी नाहीं, पण काल कारभारीसाहेब ताईसाहेबांच्या लग्नाचा कांहीं विचार होणार

आहे ह्मणत होते. त्यांनीं पाहिलेल्या सर्व स्थळांमध्य **सुवर्णपूरचं** स्थळ पसंत होऊन, आमच्या महाराजांनीं त्या राजास पत्र लिहिलं होतं, त्यावरून लग्ननिश्चय करण्याकारितां तिकडून वकील आले आहेत; तेव्हां बहुतकरून हेंच कारण असावं.

( इतक्यांत **विद्याधर**दीक्षित काठी टेंकीत येतात. )

**उभयतां**–( त्यांस पाहून उठून ) यावं गुरुवर्य यावं; नमोनमः नमोनमः. आज फार दिवसांनीं दर्शनाचा लाभ झाला. ( हातानें जागा दाखऊन ) या असे या.

( सर्व बसतात. )

**नारायणप्रसाद**– अलीकड स्वारी फार दिवसांत कुठं दिसली नांहीं !

**विद्याधरदीक्षित**– जेहेत्ते चंडभैरवीचं अनुष्ठान होतं, त्यामुळं जेहेत्ते बाहेर पडायला झालं नाहीं. कसं काय जेहेत्ते स्वस्ति क्षेम ना ?

**उभयतां**– हो आपल्या आशीर्वादानं कुशल आहोंत.

**विद्याधरदीक्षित**– काय ह्मटलं न्यायमूर्ते, जेहेत्ते ताईसाहेबांच्या विवाहाचं निश्चयांत आलं काय ?

**नारायणप्रसाद**– नाहीं अद्यापि तसं कांहीं नाहीं; पण **सुवर्णपूरचं** स्थळ पसंत पडून, इकडून सुचना झाल्यावरून, तिकडून वकील आले आहेत, आज कायतो विचार होणार आहे असं ऐकलं.

(इतक्यांत **सारंगदेव** राजा व **रणदेव** कारभारी येतात व खडी ताजीम होऊन, सर्वांचे मुजरे होऊन वसतात. )

**सारंगदेव**– **रणदेवजी,** अहो यांची मनुष्यांत कां गणना

आहे ! हीं शुद्ध गाढवं आहेत. एकदां नाहीं, दोनदां नाहीं, हजार वेळ मी तिला सांगितलं असेल कीं, त्या भिकारड्या **चंद्रसेनाला कमला** साफ देणार नाहीं ह्मणून; पण पुन्हां आपलं तिचं तें आहेच ! हंः, काय ह्मणावं याला ? मनुष्यानं आपलं कुल, योग्यता ह्यांजकड कांहीं पहावं कीं नाहीं !

**रणदेव**— काय विचारावं सरकार, तें तर अवश्य पाहिलं पाहिजे. लग्न ह्मणजे कां पोरखेळ आहेत ? पण मला तिथं बिलकुल बोलतां येईना.

**सारंगदेव**— त्या पोराचे आईबाप वारले, मागं त्याला संभाळणार कोणी नाहीं, ह्मणून ह्मटलं, असेनाका थोर होई-तों आमच्याजवळ ! तों आपला हिचा बेत त्याला घरजांवई करण्याचा ! वारे अक्कल ! बायकांना कांहीं विचार आहे कां? एकाच्या भरीं भरल्या कीं भरल्या. तुह्मांला सांगतों हे सारे त्या पोरट्याचे आणि आमच्या पोरीचे खेळ आहेत, आणि त्यांत हिला तर अक्कलच नाहीं.

**रणदेव**— सरकार देखत ऐकत त्या बायका ! त्यांना तो विचार किती असणार ! बाईसाहेबांचा स्वभाव पडला आधींच भोळसट, त्यांत त्या पोराचा लडिवाळपणा आणि आर्जवीवृत्ति, मग काय पहायचं ? सहजच त्या भाळल्या.

**सारंगदेव**— हंः, बोलण्याची शंकाच नाहीं. पांचट नाहीं तर ! तसाच तो थेरडा **हरपाळ.** वयाला साट वर्षं झालीं, पण कांहीं तरी अक्कल ! बोलतां बोलतां परवां त्यानंही हेंच बोलणं काढलं !

**रणदेव**—हंः, वय झालं ह्मणून अक्कल कां येते ? ह्मातारी गाढवं कां थोडीं असतात ?

**नारायणप्रसाद**—सरकार, आपल्याला जें करायचं आहे तें करावं; आपण कशाला तिकडे लक्ष्य द्यावं?

**सारंगदेव**—तसंच परवां देशोदेशच्या राजपुत्रांच्या तसबिरी पहावयाला पाठविल्या आणि त्यांत तुमच्या मनास कोणता वर येतो ह्मणून विचारलं; तों 'आपल्याला वाटेल तें करावं' हें उत्तर! हं:, कारटी एक नाचते, त्याबरोबर लागली हीही नाचावयाला! अक्कलशून्य!

**मणिपाळ**—चाललंच आहे! आपण आपल्या मनाप्रमाणं केलं, ह्मणजे झालं.

**सारंगदेव**—काय हो **मणिपाळजी**, तुह्माला हुकुम केल्याप्रमाणं, हाकलून दिलात कीं नाहीं त्या कारट्याला वाड्यांतून?

**मणिपाळ**—जी सरकार, त्याला बरेच दिवस झाले. कारभारीसाहेबांनीं खावंदाचा हुकूम सांगतांच, तेच दिवशीं संध्याकाळीं **चंद्रसेनरावाला** मी सरकारचा हुकूम सांगितला व तेही लागलेंच तेथून निघून **रतिपालरावाकडे** जाऊन राहिले; व फिरून वाड्यांत किंवा त्याच्या आसपास येऊं नये अशी सक्त ताकीद दिली आहे. अलीकडे ते एथें कोठें दिसत नाहींत; बहुतकरून एथून कोणीकडे निघून गेले वाटतं.

**रणदेव**— तें तर महाराज त्याच दिवशीं करून टाकलं; कारण, ताईसाहेबांचा त्यांच्याशीं विवाह होण्याच्या संबंधानं बाईसाहेब व ताईसाहेब यांची निराशाच झाली; तेव्हां ह्मटलं आतां त्यांच्या नजरेसमोर तो राहतां उपयोगीं नाहीं. वरचेवर त्यांच्या मनांत तें येऊन फार दुःख व्हावयाचं; शिवाय सरकार याला त्यावेळीं दूर केला, तेंही ठीकच झालं; नाहीं तर लोकांत कांहींतरी भलतंच व्हावयाचं.

**मणिपाळ**– त्या दिवशीं कोण अनर्थ ! बाईसाहेबांनीं आणि ताईसाहेबांनीं रडून कल्होळ केला ! मला असं झालं, कीं आरंभलेलं कृत्य एकदांच शेंवटास जातं कसं !

**सारंगदेव**– ठीक झालं पीडा गेली. पुन्हां त्याचं नांव नको !

**विद्याधर दीक्षित**–जेहत्ते लहानपणापासून **चंद्रसेनरा-वांचा** त्यांनीं प्रतिपाल केला, तेंव्हां जेहेत्ते वाईट वाटायचंच ! माईसाहेबांचा जेहेत्ते फार हेतू होता, ताईसाहेबांना त्यांस देण्याचा; कारण मुलगा जेहेत्ते सुगुणी, विद्वान, शूर, ताईसा-हेबांस वर अप्रातिम; तसंच जेहेत्ते माईसाहेबांच्या सांगण्याव-रून उभयतांच्या पत्रिका जेहेत्ते अवलोकन केल्या आहेत. छत्तीस गूण जेहेत्ते जमले. तेंव्हां माझंही मत जेहेत्ते हा संबंध व्हावा असं होतं.

**सारंगदेव**–वाहवा उपाध्येबुवा वाहवा ठीक ! किती अविचाराचं हें आपलं बोलणं ! अहो विद्या, कला, शौर्य इत्यादिकांत शेंकडों उत्तम वर मिळतील, पण ते माझ्या कन्येला योग्य कीं काय ? आह्मांला कुल, शील, योग्यता सर्व कांहीं पाहिलं पाहिजे; फक्त मुलगाच उत्तम घेऊन करायचं काय ?

**विद्याधर दीक्षित**–हो, जेहेत्ते तेंही उक्तच आहे.

( इतक्यांत चोपदार मुजरा करून )

**चोपदार**–सरकार **सुवर्णपुरच** वकीलसाब आल्यात.

**सारंगदेव**–जा **रणदेवजी** त्यांना घेऊन या.

(**रणदेव** जाऊन त्यास घेऊन येतो, तो राजास मुजरा करतो सर्व त्यास ताजीम देतात. )

**नारायणप्रसाद**—या वकीलसाहेब असे या.

( सर्व बसतात. )

**रणदेव**—कसं काय कांहीं सुवार्ता ?

**गोपालसिंग**—आतांच **सुवर्णपुरा**हून सरकारचं आज्ञापत्र आलं कीं, खावंदांचं बहुतेक ह्मणणं मान्य ह्मणून; बहुतकरून सर्व जमलंच ह्मणायचं. कारण हुंडापांडा, मानपान, सर्व ठरलेच आहेत; फक्त **नवरंगड** परगणा आंदण द्यावयाचा, तो सरकारचं ह्मणणं मुलीच्या हयातीपर्यंत चालायचा आणि आमच्या महाराजाचं ह्मणणं वंशपरंपरेनं चालावा, एवढीच काय ती लडथड आहे.

**रणदेव**—वाहवा ! ह्मणजे मुख्य तर हेंच प्रकरण आहे. कारण सालीना दोन लाख उत्पन्नाचा मुलूख अगदीं देणं अवघडच आहे ! पण सरकारचं अनुमोदन असल्यास माझं कांहीं बोलणं नाहीं.

**विद्याधर दीक्षित**—जेहेत्ते वकीलसाहेब कारभारीसाहेबाचं ह्मणणं जेहेत्ते रास्तच आहे.

**सारंगदेव**—कसं काय गुरुजी, शास्त्राज्ञा काय आहे ?

**विद्याधर दीक्षित**—शास्त्राप्रमाणं जेहेत्ते असं आहे कीं, "राजा हा राष्ट्राचा पालक आहे, त्यांस प्रजानुमतावांचून स्वकार्यार्थ जेहेत्ते भूमिदान करतां येत नाहीं."

**नारायणप्रसाद**—( हात जोडून ) माझं ह्मणणं असं आहे कीं, सदर परगणा ताईसाहेबांच्या औरस पुरुषसंततीकडे मात्र पुढें चालावा. कां कारभारीसाहेब आपलं मत काय आहे ?

**रणदेव**—वाहवा ! ही तोड पसंत निघाली. तेव्हां हेंच

आमचं ह्मणणं, असं सुदर्णपुरास लिहून कळवावं ह्मणजे झालं; कां वकीलसाहेब ?

**गोपालसिंग**– भलतंच ! सरकार आतां अवकाश कुठे राहिला आहे पत्र जाऊन उत्तर येण्याला ? मूहुर्ताचे दिवस जवळ आले ! ( राजास ) मी सरकारांना विनंति करतों कीं, आमच्या महाराजानीं हें सर्व मजवर सोपविलं आहे; आपला विचार काय तो कळूंदे ह्मणजे झालं.

**रणदेव**–विचार काय, न्यायाधीशसाहेब ह्मणतात तसंच कबूल करा ह्मणजे झालं.

**गोपालसिंग**–बरं असो, आपली मर्जी असेल तर तसं कां होईना. एकदाचं ठरून जाऊंदे ह्मणजे झालं.

**सारंगदेव**–मग आतां अवकाश नको. तिथिनिश्चय करून तिकडील सर्व मंडळीस इकडे आणण्याकारितां पत्र देऊन आपल्या वकीलाना धाडाच यांजबरोबर. कां गुरुजी ?

**विद्याधर दीक्षित**–हो जेहेत्ते आतां लांबणीवर नको. 'शुभस्य शीघ्रं' जेहेत्ते घ्या जगदंबेचं नांव आणि द्या वकीलसाहेबांना विडा; ह्मणा 'वक्रतुंड महाकायः–'

**सारंगदेव**–बरं पण मुहूर्त कोणता धरावा ? तिकडून वऱ्हाड येण्याला पंचवीस सव्वीस दिवस तरी लागतील, तेव्हां त्या बेतानं धरला पाहिजे.

**विद्याधरदीक्षित**– कालच जेहेत्ते मी ग्रंथावलोकन करून मुहूर्त जेहेत्ते काढून ठेवला आहे. वैशाख कृष्ण अष्टमीचा मुहूर्त जेहेत्ते उभयतांना लाभतो; ह्मणजे जेहेत्ते मुलाची वृश्चिक राशी, तेव्हां चंद्रमा नवमस्थानीं असून, रवी त्रितीय स्थानीं आहे, आणि जेहेत्ते तो पाप ग्रह आहे उक्तच आहे; आणि

जेहेत्ते मुलीची राश मकर तेव्हां जेहेत्ते चंद्रमा सप्तमस्थानीं आहेच आणि गुरुबळ पाहिजे, तर तो जेहेत्ते एकादशस्थानीं पडला आहे; तेव्हां जेहेत्ते तोच मुहूर्त उक्त आहे.

**रणदेव**– ह्मणजे किती ? ( बोटानें मोजून ) आज पासून एक महिना वीस दिवसांचा अवकाश आहे ना ? ठीक आहे. देतों तर सरकार या मजकुराची थैली इकडील वकीलाजवळ आणि करतों रवानगी त्याची.

**सारंगदेव** ठीक आहे. **गोपाळसिंगजी** आतां आपण निघणार केव्हां ?

**गोपाळसिंग**– आतां काय उदईक प्रातःकाळींच निघतों.

**सारंगदेव**– बरं आहे; कसंही करून हे आरंभलेलं कार्य चांगलेंपणीं एकदांच शेवटास न्या ह्मणजे झालं.

( **रणदेव** सर्वांस पानसुपारी अत्तरगुलाब व वकीलास पोषाख देतो )

**गोपाळसिंग**–( उठून ) येतों तर आतां आज्ञा.

**सारंगदेव**– ठीक आहे या.

[ **गोपाळसिंग** मुजरा करून निघून जातो. ]

**सारंगदेव**–आतां माझं मन स्वस्थ झालं. नाहीं तर पोरीच्या लग्नाची मोठी काळजी पडली होती.

यचं **गोपाळ**– ( हंसून ) श्रीमंतांसारख्यांना अशी काळजी, पाहि(ल्ली) काय करावं ?

चोरी **सारंगदेव**– तसं नव्हे, अहो आमचं झालं ह्मणून काय ते जमून एकदाचं शेवटास जाईपर्यंत पंचाईतच कीं

अली बरं **रणदेवजी** ह्याप्रमाणं तिकडं कळवा आणि आतां ला लागा.

**रणदेव**— तयारी तयारी ती काय? हांहां ह्मणता होईल. त्याची काळजी नको; पण उद्यां भोजनोत्तर स्वारी **चतुरंगडास** निघायची ना?

**सारंगदेव**— हो आतां काय काम आहे इथं? सर्व तयारी ठेवा. ( उठतो. )

**रणदेव**— बरं तर आतां सर्वांना आज्ञा देतों.

**सारंगदेव**— ठीक आहे.

( सर्व राजास मुजरे करून जातात. )

---

## प्रवेश ३

**स्थळ—विलासपुरांतील हरेश्वराच्या** देवालया-पुढील चौथरा.

( **हरपाळ** चौथऱ्यावर बसला आहे तों **यदुवीर** येतो. )

**यदुवीर**— ( मुजरा करून ) राम राम भाऊसाहेब राम राम. लई दिसांनीं गांठ पडली.

**हरपाळ**— राम राम **यदुवीरजी**, या बसा. कसं काय ठीक आहेना?

**यदुवीर**— आमच काय साहेब बेस हाय. अलीकड लई दिसांत कुठं वाड्याकडं फिरकली नाहीं सवारी!

**हरपाळ**— हं! झाले खरे फार दिवस; आजमासें द हिना होत आला असेल. नाहीं आलों झालं! परवां बारा दिवसांमागं बागेंत मात्र त्या मुलीला कुठं तरी न वर जोडून द्यावी, ह्मणून माईसाहेबांना भेटलों होतों. दर स्थिति दिवसानुदिवस चमत्कारिक होत चालली आहे

णून आपलं काम बरं की घर बरं, कुठंच जात नाहीं. फक्त संध्याकाळीं एथें देवदर्शनास येतों. बरं असो, माईसाहेबांची व ताईसाहेबांची तब्येत बरी आहे ना?

**यदुवीर**— हंः! कसल्या पुसता राव तब्येती न काय? रावसाबांस्नी वाड्यांतन घालऊन दिल्यालं आपनास्नी ठाव हायच. तवापसन माईसाबांची अन ताईसाबांची रडून रडूनशानी हाड निघाल्यात. यळला आन न्हाई, रातची नीज न्हाई, रातदिस सारखा त्येंचा जप करीत बसल्यात. त्यामंदी आनकी परवां परदानसाब सांगूनशानी गेलं कीं, ताईसाबास्नीं **सुवर्नपूर**च्या राजाच्या मुलाला देन्याचं ठरलं ह्मणून; अन तयारीबी चाललीया. तवांपासन तर राव कांई बोलायची सोय न्हाई! अर देवा! आतां आपल्याच्यानं त्ये दुक्ख पाहवना बा! •

**हरपाळ**— अरे अरे काय करावं! मी ते दिवशीं पुष्कळ तऱ्हेनं सांगितलं पण उपयोग काय? महाराज तिकडे लक्ष देत नाहींत ना अगदीं?

**यदुवीर**— हंः! काय पुसता राव जनूं तुमास्नी ठाव नसल्यावानी! तेसनी त्येंच्या कामाह्मोर कुट सुचतया! तुमास्नी सांगतों भाऊसाब मला काय होर आतां नीट गत दिसत न्हाई!

**हरपाळ**—त्याला काय उपाय आहे बाबा! दैव समजायचं आलं दुसरं काय? बरं पण **चंद्रसेन**रावांना अलीकडे कुठं पाहिलेस कां? काय करावं पहा आह्मांला त्यांना भेटायची चोरी झाली आहे.

**यदुवीर**—यक दोन यळा पाहिलं व्हतं बा. तवापासन अलीकडं कुठं न्हाई दिसलं काय साहेब त्येंचीबी यवस्था तीच

झालीया ह्मन! त्यासनी ह्मन अक्षी येड लागल्यावानी झाल्या! आकासाव सांगत व्हत्या बा परवा माईसावांस्नी. कसला राव हिऱ्यावानी मानूस पन काय दशा होऊनशानी गेली बगा! काय सांगावं तकड त्येंची यवस्ता तशी अन हकड ह्येंची अशी; कुनालाबी सुक न्हाई न काय?

**हरपाळ**—हं! चाललच आहे! माझ्या मनांत फार होतं कीं, रावसाहेबांशीं ताईसाहेबांचा संबंध व्हावा; ह्मणजे सर्व ठीक झालं असतं. एक तर ताईसाहेबांना मनासारखा उत्तम वर मिळाला असता; दुसरं माईसाहेबांचा हेतू पूर्ण होता. आणि तसं झालं असतं ह्मणजे मागं पुढं या राज्याला तेच अधिकारी होते. तेणेंकरून सर्व प्रजेलाही सौख्य झालं असतं; पण बोलून उपयोग काय? कुणाचं चालणार आहे महाराजापुढं?

**यदुवीर**—बाईसावांनीं तर लई खटपट केली, पन राव एकदा न्हाई ते न्हाईच!

**हरपाळ**—अहो एक त्यांनींच्रशी काय? मी, दीक्षित सर्व खटपटी करून करून दमलों; पण कांहीं उपयोग झाला नाहीं; फार काय सांगूं? त्या कामांत मजवर राग सुद्धां झाला! काय करावं मला त्या बापड्या **चंद्रसेना**बद्दल फार वाईट वाटतं!

**यदुवीर**—काय ह्मणता! इकत करूनशानीबी यश? नशीब ह्मनायचंन ह्मोर काय?

**हरपाळ**—(कांहीं वेळ स्तब्ध राहून) काय हो **यदुवीर**जी परवा ती **सुंदरा** नांवाची एक नवीन मुलगी ताईसाहेबाकडं नोकरीवर जोडून दिली आहे; कशी काय आहे तिची

चाल चालणूक? माईसाहेबांच्या मनाला आली कां?

**यदुवीर**—छे राव ती काय इचारतां! लई हुशार! काय सांगूं? माईसावांचा अन ताईसावांचा ती जीव कीं परान होऊन बसलीया. माईसाव तर लई लई वाखानती करत्यात. काय बगा एक एक मानूसबी असतय! रूपानं तर दिसन्या ताईसावच, शानी तशीच, आन गुनानं तर लई आश्राप! वर कायव भाऊसाब ती कोन, कंच्या गांवची, व्हय न्हव हें आपनास्नी समद ठाव असल? आमीं, माईसावांनीं, ताईसावांनीं इचारून इचारूनशानी झात झात तोडली, पन हानकी बिगार. कांई पत्ताच लागून देत न्हाई. फकत नशिबानं असं दिस आलं ह्मनतीया आन घळा घळा रडतीया; का हाय देवाला ठाव बा. मला तर वाटतं राव ती कुना थोरा मोठ्याची असावी.

**हरपाळ**—मला तरी कांहीं विशेष माहिती नाहीं. थोडे दिवसांमागं नित्याप्रमाणं मी एथें देवदर्शनाला आलों होतों तेव्हां एक सुंदर तरुण मुलगा, वयानं विशीचे आंतच, साधारण पोषाख केलेला व श्रमित झालेला, असा या पारावर बसलेला पाहिला. मी त्यास कोण, कुठले, कुणिकडं जाणार, वगैरे विचारलं, तों तो ह्मणाला, "आह्मी असेच फिरस्ते आहोंत. दुर्दैवानं कालचक्राच्या फेऱ्यांत येऊन, कोठें कांहीं तरी पाटाची सोय पहावी ह्मणून हिंडत आहें; आज वरीच मजल झाल्यानं थकून गेलों आहें; शहरांत जावं तर कोणाची ओळख नाहीं, यामुळं एथेंच रात्रीचे रात्र राहवं आणि उद्यां कोठें सोय पहावी असा विचार आहे." हें त्याचं बोलणं ऐकून व थकलेली दीन अशी त्याची मुद्रा पाहून मी त्यास ह्मटलें एथें कशाला नदीतीरीं उघड्यांत पडतां? चला मज बरोबर

माझे घरीं. रात्रीचेरात्र तिथ रहा आणि उद्यां कोठें सोय पाहून चला. हें माझं बोलणं ऐकून तो मज बरोबर आमच्या घरीं आला. कांहीं वेळानें मी त्यास जेवायास उठा म्हटलं; तों तो म्हणाला मला बिलकूल क्षुधा नाहीं, मी आतां स्वस्थ पडतों; पण माझा अत्याग्रह पाहून तो थोडसं जेवला. नंतर मी त्यास हंतरायपांघरायास देऊन म्हटलं, फार दमलां आहां, आतां स्वस्थ पडा. वाटेचे श्रम फार झाले होते त्यामुळें त्यास पडतां पडतां झोंप लागली. मी जवळ देवाचं नांव घेत बसलों होतों; कांहीं वेळानं तो झोपेंत कांहींसं बरळूं लागला. त्यावरून मला असा संशय आला कीं, तो पुरुष नसून कोणी विरहदुःखानं पोळून निराश झालेली स्त्री असावी. पुढं कांहीं वेळानं मला वाटतं कीं, त्याला कांहीं भयंकर स्वप्न पडलं, तेणेंकरून भिऊन तो किंचाळून धडपडत उठला.

**यदुवीर**—अर इच्या भन काय हिकमत बगा. जे जे म्हनून ऐकावं, त्ये नवालच ! वर म्होर ?

**हरपाळ**— नंतर मी त्यास कशानं भ्यालां, काय संकट तुम्हांवर आलं आहे मवांशींच्या तुमच्या झोपेंतील भाषणावरून तुम्ही पुरुष नसून वेषांतर केलं असावं व त्याचं कारण काय वगैरे हकीगत विचारली. प्रथम त्यानं बरेच आढेवेढे घेतले. शेवटीं माझा आग्रह पाहून डोळ्यांस पाणी आणून तो म्हणाला; आपण म्हणतां त्याप्रमाणं मी अविवाहित स्त्री आहें. माझं नांव **सुंदरा.** माझा जन्म एका कुलीन घराण्यांत झाला आहे. कांहीं प्रसंगानं निराश्रित होऊन हा पुरुषवेष घेऊन मी येथें आलें आहें. यावांचून जास्त हकीगत माझ्यानं सांगवत नाहीं, तर कृपा करून ती मला विचारूं न

का. आतां एथें कोठें नोकरीस राहून कसे तरी काळाचे दिवस काढावे असं मनांत आहे; तर मेहेरबानीकरून मला कुठें सोय लावून द्याल, तर मजवर मोठे उपकार होतील. नंतर मी तिला जास्त न विचारतां ठीक आहे म्हणून सांगितलं.

**यदुवीर**–वगा इच्यामारी कसं कोलव्याड हाय ले.

**हरपाळ**–दुसरे दिवशीं मी तिला लुगडीं चोळ्या वगैरे घेऊन दिल्या आणि सांगितलं आतां व्यर्थ दुःख करूं नको; स्वस्थ मजपाशीं रहा, तूं माझ्या मुलीप्रमाणं आहेस. थोडे दिवसांत एकादं चागलं स्थळ पाहून मी तुझं लग्न करून देईन, परंतु माझं ह्मणणं तिला मानवलं नाहीं. ती ह्मणाली एकवार मी हे पंचप्राण एकाला आर्पण केले होते, पण दैव-योगानं तो संबंध घडून आला नाहीं आणि मनाला अति खेद होऊन जिवंत आहें, तोंवर अविवाहित राहण्याची मी शपथ घेतली आहें. आतां एवढंच कीं, जीव आहे तोंवर कसे तरी काळाचे दिवस काढावयाचे, तर कोठेंतरी श्रीमंताजवळ मला चांगली सोय लाऊन द्या नंतर निरुपाय होऊन तेच दिवशीं मी माईसाहेबास भेटऊन तिला ताईसाहेबांकडे जोडून दिली; आणखी तिला असंही सांगितलं आहे कीं, जे दिवशीं तुला त्या नोकरीचा कंटाळा येईल त्या दिवशीं मजकडे येऊन खुशाल रहा. दोन चार दिवसांनीं सवड पाहून मला भेटत जा. त्याप्रमाणं एक दोन दिवसांनीं ती येऊन मला भेटून जाते.

**यदुवीर**–छे राव आतां कुठल्या ताईसाव तिला सोडायला? असलं मानूस मिळतया कुट? लई गुनी वगा.

**हरपाळ**–झटलं मी तिची शिफारस केली होती; तिच

तिथं कसं काय जमतं या काळजींत होतों. असो, एकून त्यांच्या मनास आली तर ह्मणा !

**यदुवीर**—छे साहेब त्येची काळजी नग. आन त्ये मानूस कुनाच्या पारखच ?

**हरपाळ**—बरं तर चला आतां घरीं जाऊं; तिन्हीसांज झाली. ( उठतो )

( दोघे निघून जातात. )

## प्रवेश ४.

**स्थळ**—राजवाड्यांतील **रणदेवाची** बसण्याची जागा.

( **रणदेव** बसला आहे व **शंकरजी** जवळ उभा आहे. )

**रणदेव**—कायरे शंकरजी महाराजांकडून कोणी आलं होतं कां ?

**शंकरजी**—न्हाई सरकार. सकाळच्यापारी योक सवार येऊनशानी गेला, त्यच्यावर कुनीबी न्हाई.

**रणदेव**—( मिशांवर ताव देऊन आपणांशीं ) वाहवा ! हल्लीं आपला काल तर खूब चैनींत जात आहे. लोकांचं ह्मणणं आहे कीं लग्न करा, जगांत घरदार बायकापोरं असल्यावांचून मनुष्यास खरं सुख नाहीं; पण कुणी वेटी ती याता यात करावी ! आतां आहे हें ठीक आहे. "आगे लंड पीछे लंड" त्रास नाहीं कसला. बरं हल्लीं कमी काय आहे सुग्रास अन्न आहे, मौल्यवान वस्त्रं, दागदागीने आहेत, चाकर माणसं सेवेस हजर आहेतच, लोकांत मान पान व चहा आहेच ह्मणा, विषयवासना तर तृप्त होतच आहे; नाहीं नाहीं

काय? फक्त एक महाराजांच तंत्र संभाळलं ह्मणजे कांहीं कमी नाहीं. आणि ते तर असे मुठींत आहेत; जणो कळसूत्री बाहुलेंच, नाचवीन तसं नाचतं आहे. (मिशा साऱ्न) पंचीची पक्कडच तशी आहे. खरोखर एक व्यसनाधीन मनुष्य झालं ह्मणजे शुद्ध दरवेशाचें अस्वलाप्रमाणं तें होतं! (थोडावेळ थांबून; उघड) एक तो काटा थेरडा **संग्रामसिंह** काढून टाकल्यापासून आमचीं एकंदर कृत्यं यथास्थित चाललीं आहेत, नाहींतर तो होता तोंवर कोणतीही गोष्ट काढा; तो आपल्हे आमच्या उलट आहेच. आमच्या या चैनीला पाहिजे पैसक खजीन्यांत :नाहीं शिल्लक, ह्मणून मालावर, माणसांवर असेर नाना तऱ्हेचे कर आह्मी बसविले; तों आपला लोकांना नाना तऱ्हा सांगून चिथऊन देऊन आहेच आमच्या विरुद्ध; काय करावं?

**शंकरजी**—काय साहेब त्ये कां मानूस व्हत का काय? छी! कारबारीपनाच काई तरी तेज!

**रणदेव**—तशीच त्या दयारामाची सून, हाय हाय! कसलं मापुक पाखरूं हातांत आलं होतं, पण त्या नीच थेरड्याच्या कृतीनं किहो हातचं सुटून गेलं! ते दिवशीं केवढा वादविवाद मजशी केला, शेवटीं हात बाईवर येऊन भरसभेंत अशा तोंडांत मारली! हंः पण गांठ कोणाशीं समजला नाहीं; गेला कीं नाहीं माती खात! (आपल्या गालावर हात फिरऊन) या गालावरचा वण तेव्हांच जिरला पण या हृदयावरचा कसा जिरेल? कारण ह्मण आहे कीं व्रण बरा झाला तरी खूण राहतेच. (दांतओंठ खाऊन) ठीक आहे त्याला ... ल्लिंच प्रायश्चित्त! पण एवढ्यानं काय होतं? जेव्हां

त्याची पाळंमुळं हा **रणदेव** खणून काढील, तेव्हांच स्व- स्थ होणार आहे. त्या कारट्याला तर वाड्यांतून हांकाललाच आहे; पाहून घेतों आतां! ( थोडा वेळ स्तब्ध राहून)-- बरं कायरे **शंकरजी** त्या पोरट्याला वाड्यांतून हांकालल्याबद्दल लोक मला नांवं ठेवीत असतील, नाहीं?

**शंकरजी**– व्हय आपनास्नी अन म्हाराजास्नी लई नांवं ठेवल्यान साहेब.

**रणदेव**– अं:, जाऊंदे कीं त्यांत काय अर्थ आहे! कुत्रीं थोडीं भुंकतात? ( विस्मयानें ) हंः काय या पाजी लोकांचा चमत्कार आहे, त्या भिकारड्या **संग्रामसिंहा**च्या संबंधाची कांहीं गोष्ट असो, तिचं वर्णन करायला जसे बेटे भाट बनतात. कायरे त्या कारट्याचं जे जिकडं तिकडं फार माजलं आहे, त्यानं असा पराक्रम केला, त्यानं तसा जय मिळविला, त्याला मोठी जहागीर मिळाली! आहेकारे यांत कांहीं तथ्य? मला तर त्याच्यांत कांहीं पाणी दिसत नाहीं. हंः असं असतं तर त्या **रतिपाल**रावाकड कशाला पडला असता तुकडे मोडीत! तुला सांगतों त्या निवळ गप्पा! पोर तें काय आणि करणार काय?

**शंकरजी**–न्हाई साहेब. त्ये समद खर हाय; कारन त्येंच्यासंग गेलेल्या **गनुजीनं** यक यक हकीगत सांगितली, तीं ऐकूनशानी आपला तर जीव वगा दडपून गेला! वयानं न्हान पन लई परतापी! त्यो सांगत व्हता, जे दिशीं **रतनपुरा**वर मोठी हुल्लड उडाली, त्ये दिशीं त्येंच्या मामावर लई बेतली व्हती; तवा रावसाहेबांनीं समद्या देखत अपला घोडा गर्दींत काडला, अन झटनं मदी जाऊनशानी तुकड्याचा

परदान अन सेनापती हत्तीवर बसल व्हत; त्या हत्तीच्या दांतांवर दिल घोड्याच म्होरल पाय, अन हांहां म्हनतां एका झटक्यासरसी तलवारीनं दोगांचीबी गर्दान उतरली न काय?

**रणदेव**– काय ह्मणतोस! हं: काय साहस हें! आश्चर्य आहे बुवा! बेटं बीजच्च कडवं अँ! ( आपल्याशीं ) नाहीं तर आह्मी पहा! तरवार, बंदूक, शिकार, लढाई ह्मटलं म्हणजे बेटी पांचावर धारण बसते. या भित्रेपणाला काय करावं? इलाज नाहीं; यानंच माझं अगदीं अवसान कमी झालं आहे. आपल्याकडून मी पुष्कळ धारिष्ट दाखवितों, पण व्यर्थ. वेळ आली म्हणजे कांहीं नाहीं! ( मिशांवर ताव देऊन ) बरं असो, या बनसीशीं गांठ आहे! दाखवीन कधीं नाहीं कधीं हात.

**शंकरजी**– आतां काय साहेब ते जित असल काय अन नसल काय! केरावानी होऊन गेल. त्येंच्या मनामंदी व्हत त्यापरमानं न व्हतां, समदी वडीच इसकटून गेलीन काय? जात्याल आतां आपल्या मामाकड कशाला राहत्याल हत? त्येंची ताईसाबाशीं आपल लगीन व्हईल अशी लई विछा व्हती.

**रणदेव**–अरे तें कसचं जमणार! हा बसला आहे ना वस्ताद. बरं तें असो; कायरे **शंकरजी** अलीकड पांच चार दिवसांत **सुंदरी** कुंठ दिसली नाहीं?

**शंकरजी**–हाय कीं हतच साहेब कुट जातीया? आतां तिचा तोरा काय? ताईसाबांच्या लई मर्जीत हाय, अन माईसाबबी अशी जीव कीं परान करत्यात. अलीकड दागीनं काय? लुगडी काय? चोळ्या काय: किती दिल्यात ह्मणून सांगूं? सदा थाटूनशानी गवळिणीवानी मिरवतिया.

— — — — — — — — — — — — — — —

**रणदेव**—काय सांगू ! ती इथ आल्यापासून मला कांहीं सुचेनासं झालं आहे. ध्यानीं, मनीं, स्वप्नीं सदा मला ती दिसत आहे. हायरे स्वरूप, तो नखरा, ती डोळ्याची चमक, चालण्याची लचक. सर्व कांहीं अनुपम्य आहे. मला वाटतं कीं, जगांतील वस्तुमात्राचें सौंदर्य एकवटून ही पुतळी या विलासी प्राण्याकरितांच बनली आहे. आजपर्यंत मी पुष्कळ स्त्रिया पाहिल्या, पण ही सर कुठ नाहीं.

**शंकरजी**—व्हय साहेब अलीकड वाईच सूक लागून चार दागिनं अन उंची कांबरुनं मिळाल्यापासन, अक्षी आत्ताळा-तल्या इजवांनी चमकतीया.

**रणदेव**—हं: मूर्खा, अरे जी मूळची सुंदर तिला ते अलंकार म्हणजे ओझं आहे; त्या दागीन्यांनीं आणि वस्त्रांनीं कां तिला शोभा आणली आहे ? उलटी डागीन्यांनाच शोभा आली म्हण ! मला तर खचित वाटतं कीं ती चांगल्या थोरा मोठ्याची असावी; फक्त प्रसंगानं अशा स्थितींत काल कंठीत आहे.

**शंकरजी**—व्हय मलावी असंच वाटतयी. आपून तिच्या म्होर ते दिशी किती दागीनं टाकलं, न्हाई न्हाई ते सांगितलं, तुझ्यासंग लगीनवी करतो म्हटलं, पन न्हाईच वळली; लई हट्टी.

**रणदेव**—पाहतों असा हट्ट किती दिवस चालतो तो; गांठ कुणाशीं आहे समजला नाहींस हं ! ( कांहीं वेळ स्तब्ध राहून) पण एकपक्षीं मला ती लवकर साध्य होणं कठीण दिसतं, कारण चार पांच दिवसाखालीं मागच्या चौकांत संध्याकाळी तिला एकटी गांठली होती; तेव्हां **शंकरजी** काय तुला सांगू ? अरे देवाची देखील इतकी कोणी स्तुती करणार नाहीं; तितकी

स्तुति तिची मी केली, नाना तऱ्हा सांगितल्या, शेवटीं साष्टांग नमस्कारही घातला, पण तिचं अंतःकारण काडीमात्रही द्रवलं नाहीं. काय करावं कांहीं उपाय सुचत नाहीं. हंः अहारे मूर्खा विधात्या, अरे जिची काया इतकी सुंदर आणि नाजुक निर्माण केलीस, तिचं अंतःकरण पाषाण बनविलंसना? तेव्हां तुला काय ह्मणावं?

**शंकरजी**—ती अशानं कुटली वटनीला यायला साहेब? दिसरी एकादी असती, तर आपनासारक्यानं वाईच कुर्र केल्यावरोवर पाटी लागली असती; पन हे लई ख्याल. आपनाला सांगतों वाईच दमानं घ्या, अशी घेवेमारी नग.

**रणदेव**—तूं ह्मणतोस, पण मला तर ती चांगल्या रीतीनं वळेलशी दिसत नाहीं; कारण, इतकें दिवसांत कांहीं तरी प्रीतीचं लक्षण दिसून यावं कीं नाहीं. तुला सांगतों भोगावी तर असलीच स्त्री आणि तरच आह्मीं मनुष्यजन्म घेतल्याचं सार्थक. नाहीं तर रोज उत्पन्न होऊन मरणारे कीटक कां थोडे आहेत?

**शंकरजी**— खरं हाय साहेब; पन बायकांची जात लई पाताळयंतरी, आपला अंत झट कुठला लागूं द्यायाला? नव्या नव्यांदा असच बुजल्यावानी करायच्या. त्या दावत्याल थोक अन करत्याल योक. वाइस सोई साईनं घ्या ह्मंजी समद होनार हाय. जरा एकली गाठूनशानी लगट करा ह्मंजी झालंच काम फत्या.

**रणदेवजी**—छी! काय भ्रांती आहे तुला! अरे बळजो-रीचाही उपाय ते दिवशीं करून चुकलों; पण व्यर्थ! तुला काय सांगूं **शंकरजी** तो प्रसंग? तिच्या अंगाला मी हात मात्र

लावला, तों वाघिणीसारखी चवताळून जवळ पडलेलं एक भांडं ताडदिशी माझ्या अंगावर तिनं फेकलनं, थोडं चुकलं; नाहीं तर ते दिवशीं आमचा मोक्षच व्हावयाचा ! तोंडानं तर शिव्यांचा आणि शापांचा भडिमार चालला होता. अहाहा ! शंकरजी सुंदर वस्तू कोणत्याही स्थितींत असली तरी ती मनोहर खरी ! तिची त्या वेळची रागीट मुद्रा किती मजेदार दिसत होती तुला सांगूं ! इतक्यांत माईसाहेबांची स्वारी तिकडून येत आहेसं पाहून, मी तेथून निसटलों.

**शंकरजी**—ऑ ! इकतबी करूनशानी यरथ ? आतां असं नग; महाराजांच्या मनामंदी ही गोष्ट भरऊनशानी देवी; हंजी गुमान आपलबी काम साधनार हाय त्यांत.

**रणदेव**—वाहवा ! काय अकलेचे तारे तुटत आहेत ! मूर्खा काय भलभलतं बोलतोस ? त्या सुंदर नवविकसित गुलाबकळीला भोक्ता हा **रणदेव**च योग्य ! हंः कुणिकडं ती लोकोत्तर सुंदरी आणि कोणीकडं तो जरठ ! [ आलं न्हाई.

**शंकरजी**—व्हय व्हय खरं हाय साहेब! ल्ये माज्या धेनांतच

**रणदेव**—तुला सांगतों आतां कांहीं तरी युक्ती काढून, मी हा आपली इच्छा परिपूर्ण करणार. कायरे केव्हांशी वरं ती मला एकटी भेटेल ? तूं त्या शोधांत ऐस आणि तशी संधी आली कीं मला कळीव; कीं झालंच काम फत्त्या.

**शंकरजी**—जी साहेब.

**रणदेव**—किती वेळ बघत नाहीं पाहतों. आतां कांहीं होवो मी आपली इच्छा ही तृप्त करणार. बरं आहे चल तर.

( दोघे निघून जातात. )

## प्रवेश ५.

**स्थळ**–शहराबाहेरील **कुसुमचाप** बागेचा रस्ता आणि बाग.

( हातांत फुलांची परडी घेऊन **सुंदरी** प्रवेश करते. )

**सुंदरी**–( आपणाशीं ) हर हर देवा, आतां काय प्रसंग मजवर येणार कांहीं समजत नाहीं! माझ्या मनांतील हेतु सिद्धीस नेण्याकरितां माझा प्रवेश जिथं व्हायला पाहिजे होता, तिथं सहजी झाला; पण मध्येंच हा **रणदेव** पहा कसा मेला काळासारखा माझ्यापाठीं लागला आहे. आतां हेंच मागच्या दिवाणखान्यांत मला एकटी गांठून मजवर जुलूम करण्याचा बेत त्या मेल्या शंकऱ्याजवळ तो सांगत असतां मी स्वतः ऐकला! माईसाहेबांना किंवा ताईसाहेबांना सांगून ह्या संकटाचं निवारण करीन म्हटलं तर त्यांचं काय चालतं आहे? काय करावं असं मेलं मोठं संकट आलं आहे. ( रागानें ) खरोखर माझ्या या सर्व दुःखाचं कारण तूंचरे तूंच मेल्या **चंद्रसेना**! अभाग्या अरे पंचपक्वान्नानं भरलेलं पुढं आलेलं ताट टाकून तुला भिकेचे डोहाळे झाले अँ? मूर्खा अरे अमृतानं भरलेलं नळं सोडून मृगजळाची आशा धरून इथं आलास? घे आतां **कमला**! इथं राजवाड्यांतून छोथू होऊन धिंड काढून घेण्याचं तुझ्या नशीबीं होतं तें कसं चुकणार! ( कांहीं वेळ स्तब्ध राहून ) असो पण यांत एक माझं काम झालं; कारण त्याला एथून हकलून दिल्यानं आणि **कमला**ताईचं लग्न दुसरीकडं ठरल्यानं, त्याची आशा तर निर्फळ झालीच! पण मेला अजूनी **वासंतिके**च्या घरीं एथेंच राहिला आहे, हें चांगलं नाहीं, कारण त्या बयासाहेब मोठ्या उलाढाल्या आहेत, केव्हां

कार्य करतील त्याचा नेम नाहीं. आतांशा ताईसाहेबांशीं फार एकांत होत असतात. तेव्हां उभयतांच्या गुप्त विवाहाचं तर घाटत नसेलन! (थोडा वेळ थांबून.) असेल ही कदाचित! आतां असं नाहीं; कांहीं तरी करून त्या मेल्याला ह्या गावांतूनच हांकलला पाहिजे. याला काय बरं युक्ती करावी? (आठवल्या सारखें करून) हो असंच. या कामीं त्या मेल्या **रणदेवाला** वश केला पाहिजे. एथें आल्यापासून तो मजवर आसक्त झाला आहे, तेव्हां कपटानं गोड गोड बोलून कांहीं तरी थाप देऊन त्याजकडून हें काम केलं पाहिजे! कारण, "नाहीं मला, नाहीं तुला, घाल कुत्र्याला." असंच आतां करणं भाग आहे. (कांहीं वेळ स्तब्ध राहून आकाशाकडे पाहून चपापून) अगबाई पण दिवस अगदीं थोडा राहिला. आपलं काम लवकर आटपलं पाहिजे. (हार तुरे गडबडीनें गुंफूं लागते.)

(इतक्यांत बागेच्या दरवाजाशीं **रणदेव** आणि **शंकरजी** प्रवेश करितात.)

**शंकरजी**–(बोटानें दाखऊन) ती ती बगा साहेब एकलीच तत बसलीया; आतां घ्या सादुन न काय?

**रणदेव**– (भिऊन) कसं काय करावं! आतां जाऊंच ह्मणतोस? पण तूं मात्र गड्या इथं कुठं तरी जवळच ऐस; कारण प्रसंग आहे. (आपणाशीं) हं:! काय करावं बेटं मघांशीं जें अवसान होतं तें आतां नाहीं. हात पाय कसे लटलट कांपत आहेत. काय होईल कोण जाणे! ते दिवशींच्या तिच्या विश्वरूपाची आठवण झाली कीं मन चरकन् भितं; मोठं कठीण आहे. काय करावं? 'धरावं तर चावतं सोडावं तर पळतं;' अशी स्थिति आहे.

**शंकरजी**–काय राव मानसाला इकत भ्याया कशाला होव ! मरदासारख मरद असुनशानीं कल्कीं नग कल्कीं नग करीत बसलाया; ह्हा झोर, अशी खाशी यळ कंदी गावनार न्हाई; यत्थ गमूं नगा, बागेंत बो दिसर कुनी न्हाई; मी दार लाऊनशानी हत उबा हाय.

**रणदेव**–( मिशावर ताव देऊन ) बरं ठीक आहे. करतों तर आतां जिवाचा धडा; कांहीं होवो. ' शेंडी तुटो किंवा पारंबी तुटो' ! ( हळूं हळूं पावलें न वाजावितां सुंदरीच्या मागें जाऊन उभा राहतो. )

**सुंदरी**–( आपणाशीं ) अहाहा ! हे वसंताचे दिवस किती तरी सुखकर आहेत; झाडांना नवी पालवी आली आहे, फुलझाडं पुष्पानं डवरलीं आहेत, कित्येक झाडं फलभारानं लवलीं आहेत. मंद मंद वाऱ्याच्या झुळकीबरोबर पुष्पांचा सुगंध येत आहे, पाटाचं पाणी झुळझुळ वहात आहे. या दिवसांत आनंदानं लोक बागेंत क्रीडा करावयास येतात, पण इथं आल्यानं उलटं माझ्या मनाला दुःख मात्र होतं! (शोकाकुल होऊन ) हरहर देवा! आतां ही **चंपकमाला** या जन्मीं सर्व सुखाला अंतरली नं? काय करावं, हे ऐन तारुण्याच्या बहराचे दिवस मेले अशा दुःखांत कंठण्याचें कपाळीं आलं आहे ! अरे अरे जशी एकादी मोगरीची वेल मनुष्य नाहीं अशा स्थळीं सुंदर फुलाच्या भरानं गजबजून जाते, पण तिला उपभोक्ता कुणी तिथं नसल्यानं तिचीं फुलं जागच्याजागीं कोमेजून गळून पडतात त्याप्रमाणं या जन्माची माती होणार ना ! ( मोठ्यानें सुस्कारा टाकून तळहातावर गाल टेकून खिन्न होऊन बसते. )

**रणदेव**– ( आपणाशीं ) वाहवा ! ही संधी पुढं जाण्याला बरी आहे. ( **सुंदरी** जवळ जाऊन ) हे मनोहर सुंदरी, व्यर्थ कां दुःख करीत खिन्न होऊन बसली आहेस ? हे पहा, जरी ती मोगरी निर्जन प्रदेशांत आहे आणि तिला तेथें भोक्ता नाहीं, तरी मधुप तिच्या सुवासास लुब्ध होऊन, तिला हुडकीत यावयाचाच. रत्न जरी उकिरड्यावर पडलं असलं, तरी त्याचा परीक्षक त्याची किंमत समजल्याशिवाय राहील काय ! सखे तुझी परीक्षा जरी इतर कोणाला नसली तरी हा **रणदेव** तुला ओळखतो आहे. ( तिच्या खांद्यावर हात टाकावयास जातो ) तर मनोरमे व्यर्थ शोक करूं नको.

**सुंदरी** —( त्यास झिडकरून रागानें ) हं हं खबरदार मजजवळ याल तर. काय हा चावटपणा ? एकदां सोडून हजारदां मी तुम्हांला सांगितलं असेल कीं तुम्ही व्यर्थ माझ्या नादीं लागूं नका, असं असून निलाजऱ्यासारखे कशाला माझ्या मागं लागला आहां ? ( **रणदेव** चपापून स्तब्ध राहतो तों **सुंदरी** आपणाशीं ) वाहवा ! देव पावला ! ज्याच्या सहायाची मला गरज आहे ते तर राजश्री आयतेच भेटले, आतां एकाएकी अंत न देतां, कपटानं आपलं कार्य साधून, यास फसविलं पाहिजे.

**रणदेव**— हे मृगनयने, तूं मला किती सांगितलंस तरी तें व्यर्थ आहे. काय करूं ? तुझी सुंदर मूर्ती एकदां जी या हृदयांत ठसून गेली आहे, ती मला चैन पडूं देत नाहीं, सदासर्वदां तुझा निदिध्यास लागला आहे; काय सांगूं ? तुझ्या नेत्रकटाक्षबाणानं हें हृदय इतकं विदारण झालं आहे कीं, त्याला तुझ्या प्रीतीवांचून दुसरं औषधच नाहीं. मी काममोहित

होऊन इतका लोंचट झालों आहें कीं, जशी पंचपक्वान्नांनीं भरलेल्या ताटावरून माशी वारंवार वारली तरी हलत नाहीं, तशी माझी वृत्ति झाली आहे; त्याला मी काय करूं ? कांहीं इलाज चालत नाहीं, तर नको नको सुंदरी किती तरी आतां अंत पाहणार ? दे एकदां प्रेमालिंगन. बलात्कारानं मी आपली इच्छा तृप्त करीन, पण तूं स्वतः होऊन वश झाल्यानं जी मजा होईल ती त्यांत नाहीं. ( आलिंगावयास जातो. )

**सुंदरी**– ( एकीकडे सरून ) हं हं हें काय कारभारी-साहेब काय हा वेडेपणा ! अहो आपल्या वयाकड आणि योग्यतेकड कांहीं पहा ! किती झालं तरी मी क्षुल्लक दासी, तिजवर आपल्यासारख्या थोर मनुष्यानं हलकटपणानं मन ठेवणं चांगलं नाहीं. ( उठून ) चला सोडा मला वाट जाऊंदे; ताईसाहेबांची तब्येत आज बरी नाहीं, त्या माझी वाट पहात असतील. ( जाऊं लागते. )

**रणदेव**–– ( तीस अडवून ) छी छी ! सुंदरी मी नाहीं जाऊं देणार; इतके दिवस झालं तें झालं, पण आतां मात्र ह्या रणदेवाची इच्छा पूर्ण झाली नाहीं तर सखे हे प्राण रहात नाहींत. विलासिनी, आतां नको या रणदेवाला आव्हेरूं; प्रिये तुजसारख्या चतुर स्त्रिया असतात त्या पुरुषांचं खरं अंतःकरण पाहिल्यावांचून त्यास आपला अंत देत नाहींत; पण या रणदेवाविषयीं तूं बिल्कुल शंका धरूं नको. खरोखर तुला सांगतों हा दीन तुझ्या त्या सुंदर रूपावर लुब्ध होऊन सर्वस्वी तुझ्या आधीन आहे. खरोखर प्रिये, तुझ्या कृपेवांचून हे प्राण रहाण्यास दुसरा उपाय नाहीं. तूं करशील त्याप्रमाणें

ह्या **रणदेवाची** स्थिति होणार आहे; तर प्राणदयिते एकदां याला आपलासा ह्मण आणि वे पदरांत. ( जवळ जातो. )

**सुंदरी**— ( रागानें ) चल दूर हो चांडाळा; तुला किती ही सांगितलं तरी समजत नाहीं; मूर्खा तुला वाटत असेल कीं आजपर्यंत जशा कित्येक स्त्रिया तुझ्या मोहक भापणावर भुलून कपटफांसांत सांपडल्या तशीच हीही असेल; पण मी मात्र तशांतली नव्हे; तर बऱ्या गोष्टीनं आपल्या मार्गानं चालता हो.

**रणदेव**–( जवळ जाऊन ) सखे पुरे पुरे असा किती वेळ हट्ट धरावा. मी समजलों तुझा हेतु; विलासी स्त्रिया असतात, त्या विपयास जास्त रंग यावा याकरितां पुरुपास झिडकारितात, पण पुरे आतां तो काल राहिला नाहीं. तुला काय सागूं जो जो तूं आतां शृंगाराभिनय करशील तों तों या प्राणाची रांगोळी होत जाणार आहे! खरोखर हे चारुशीले आज जर या **रणदेवाचे** मनोरथ पूर्ण होणार नाहींत तर हा खचित वाचत नाहीं. ( कामविकल होऊन ) अरे अरे! प्रिये ही पहा सर्व गात्रें कशी विकालित झालीं आहेत, तर या गलित झालेल्या वाहूस तुझ्या स्कंधावर आधार दे! तसंच त्या कामविपानं संतप्त होऊन तळमळणाऱ्या या दीनास तुझं अधरामृत पान जर न मिळेल तर हा **रणदेव** खरोखर यमपुरीची वाट धरणार! **सुंदरी** हे कर्ण पहा तुझ्या तोंडचीं 'प्राणनाथ' एवढीं अक्षरं ऐकण्यास किती तरी तृपित झाले आहेत तुला सांगूं! असं एक एक आणि दोन दोनकार तर काय हे सर्वच अवयव आपल्या सर्व सुखाचा भार तुजवर टाकून बसले आहेत; तर हे मृगाक्षी हा समय अंत

पाहण्याचा काय? मजवर कृपा कर, मी मूढ झालों आहें यामुळे आजपर्यंतच्या माझ्या वर्त्तनांत कदाचित् तुझी अमर्यादा होऊन, ला राग आला असेल, तर हा मी तुला साष्टांगनमस्कार घालतों. (नमस्कार घालून) प्रिये सर्व अपराधाची क्षमा कर.

**सुंदरी**–( किंचित् हास्य करून ) हें काय बरं, **रणदेवजी** सोडा वाट मला जाऊंदे. काय हा चावटपणा, पाया काय पडतां बोलतां काय ? तुह्मी समजून असा कीं, मी अशानं वधणारी नव्हे. मुकाट्यानं हा नाद सोडा. व्यर्थ माझा छळ कां कारितां ? मजपेक्षां सुंदर स्त्रिया हजारों तुह्माला मिळतील.

**रणदेव**– ( आपणाशी ) अहाहा ! आज मला किंचित् आशा उत्पन्न झाली, कारण आतांचं तें स्मितहास्ययुक्त भाषणच पुढील भविष्य सांगत आहे ! ( उघड ) प्रियसखे दुसऱ्या किती जरी सुंदर स्त्रिया जगांत असल्या तरी काय उपयोग ? या **रणदेवाच्या** कामरोगाला खचित तूंच एक औषध आहेस. सुंदरी, एकाद्या ज्वरित मनुष्याला अन्य रोगावरील औषध दिलं तर त्यापासून काय फळ बरं ? मनासारख्या रमणीय स्त्रीव्यतिरिक्त भोगांत ती मजा काय आहे ? हे आनंददायिनी हा तुझ्या चरणीचा दास करद्वय जोडून विनंति करतो तर दे एकदां प्रेमालिंगन ! खरोखर तूं मला वश होऊन माझे मनोरथ पूर्ण होतील तर **रणदेवाचा** आनंद गगनास ही ठेंगणा मानणार आहे.

**सुंदरी**–( आश्चर्यानें ) हंः ! काय नवल आहे ! एकंदरांना मेलं आपल्या दुःखाचं गाऱ्हाणं गाऊन कसं तरी आ-

पलं काम साधावं हें चांगलं ठाऊक असतं ! पण दुसऱ्याचा विचार कोणी करतो कां ? ज्याची त्याची इच्छा ही कीं, लोकांनीं आपल्या जिवाला जाळावं आणि त्या उजेडांत आपण मौजा माराव्या.

**रणदेव**–(हात जोडून कान धरून) सखे क्षमा कर आणि असं कोणचं दुःसह दुःख तुझ्या मनाला झालं आहे तें सांग.

**सुंदरी**–हंः उगीच सांगून काय फळ ? त्याचं निवारण कां कोणाच्या हातून होणार आहे ?

**रणदेव**–सखे मी तुला खचित सांगतों कीं, असं कोणचं-दुःख आहे तें मला सांग? तात्काल मी त्याचं निवारण करितों. जरी त्या कामीं हे प्राण खर्च झाले तरी बेहेत्तर आहे.

**सुंदरी**–हो, करीन ह्मणून तोंडानं सांगितलं आणि केलं नाहीं, ह्मणजे काम न होतां व्यर्थ सांगितल्यानं बाहेर मात्र फुटावयाचं !

**रणदेव**–सखे माझ्या हातून होण्यासारखं असल्यास मी तें खचित करीन आणि तुला शपथ देऊन सांगतों कीं तें प्राणांतींही बाहेर फुटणार नाहीं.

**सुंदरी**–हे पहा, आपण करीन ह्मटलं ह्मणजे मेलं कांहीं अवघड नाहीं !

**रणदेव**–सांग सांग तर **सुंदरी** असं काय आहे तें.

**सुंदरी**–या गांवांत **चंद्रसेनराव** ह्मणून माईसाहेबांनीं लहानपणापासून बाळगलेले गृहस्थ आहेत ते आपल्याला माहीत असतीलच.

**रणदेव**—हो ! तो तर माझा हाडवैरी आहे; मग त्याचं काय ?

**सुंदरी**—माझ्या साऱ्या जन्माचं वाटोळं करून या स्थितीला मला आणण्यास तोच दुःष्ट मेला कारण आहे. काय सांगूं त्याला पाहिलं कीं, माझ्या अंगाचा तिळपापड होतो. थोड्या दिवसामागं त्याला वाड्यांतून बाहेर घालविलें, तेव्हां मी मोठ्या आनंदांत होतें कीं, आतां मेला वरचेवर नजरेसमोर येणार नाहीं, पण पाहतें तों अजूनी इथंच आहे; तर आतां कोणत्याही उपायानं त्याला माझ्या दृष्टीआड करा; दुसरं कांहीं नाहीं.

**रणदेव**—( तिरस्कारयुक्त मुद्रेनें ) अं: एवढंच ना? माझ्या हातचं काम आहे. उद्यां करून टाकतों; पण एवढंच मला पाहिजे कीं, दृष्टीआड ह्मणजे जगांतून नाहींसा करूं कां इथून हद्दपार करूं ?

**सुंदरी**—( विचारांत आपल्याशीं ) काय सांगावं बरं ? ( थोडावेळ थांबून ) हो असंच; मनुष्य मेल्यावर मग काय आहे ! जशी चांडाळानं माझी अशी अवस्था करून साराजन्म दुखानें हाय हाय करावयास मला लावलं आहे तसंच त्या दुःष्टाचं झालं पाहिजे. ह्मणजे **कमला**ताईचं लग्न दुसन्याशीं होऊन त्या निर्दयाचा मनोभंग झाला पाहिजे. बस्स, आतां असंच सांगावं. ( उघड ) जगांतून नको पार करायला फक्त या गांवांतून घालविलात ह्मणजे झालं.

**रणदेव**—( आपणाशीं ) हं:, याचं कारण काय बरं असावं ? असो कांहीं कां असेना. आपल्याला आपल्या कामाशीं गाठ. ( उघड ) ठीक आहे. पण मग तर या **रणदेवाचा**

हेतु पूर्ण होईल ना? (पुढे होऊन) बरं तर पुढील सौख्याची खात्री देणारा एक साखरेचा + +:-

**सुंदरी**-( मागे सरून ) छीः तें आतां कांहीं नाहीं.

**रणदेव**-बरं तर उद्यां आपल्याला समजेल मी काय केलं तें. येतों तर.

**सुंदरी**-या पण सांगितलेलं लक्षांत राहील ना? नाहीं तर काय तुह्मी हजार कामाची माणसं!

**रणदेव**-वाहवा! कांही असलं तरी हें कां विसरेन? येतों.

(**सुंदरी** मानेनं खूण करिते व तो निघून जातो.)

**सुंदरी**-(आपल्याशीं) ही एक व्यवस्था तर बरीच लागली, पण या मेल्या चंगीभंगी दारूबाजावरच सारा विश्वास टाकून उपयोग नाहीं. याचा काय नेम! झोकलीन मेल्यानं दारू कमजास्त आणि पडला लोळत ह्मणजे संपलं! तर असं न करितां आपणही सावधगिरीनं संधी साधून आपला हात दाखविला पाहिजे. ( हार तुरे गजरे परडींत घालून ) चला आतां उशीर झाला. ताईसाहेब वाट पहात असतील.

(उठून निघून जाते.)

## तृतीय अंक समाप्त.



# अंक ४.

## प्रवेश १.

### स्थळ:–वसंतविलास बागेंतील कुंज.

( **आनंदी** पलंगावरील अंथरूण साफ करून बिछायतीवर बसते. )

**आनंदी**–( आपणाशीं ) ह: लोक ह्मणतात कीं, जन्म घ्यावा तर थोरा मोठ्याच्याच पोटीं, ह्मणजे काडीमात्र दुःख नाहीं ! पण इथं पहा कशी स्थिति आहे ती ! नशिबीं नसलं ह्मणजे श्रीमंत काय आणि गरीब काय, कुठं ह्मणून सुख मिळा-यचं नाहीं ! मला ताईसाहेबांच्या संबंधानं मेली मोठी काळजी लागली आहे! काय त्यांची अवस्था झाली आहे? माझ्यानं त्यांचं तें दुःख अगदीं पहावत नाहीं. अक्कासाहेब वरचेवर धीर देत आहेत, पण काय उपयोग ! तें सारं व्यर्थ आहे. **सुवर्णपुरा**-हून एक दोन दिवसांत वऱ्हाड येईल; ठरलेल्या मुहूर्ताला चार दिवसांचा अवकाश राहिला आहे. आतां काय होणार आहे अक्कासाहेबांच्या हातून ! ताईसाहेबावर मात्र कठीण प्रसंग आला. असो, काय करायचं ? उपाय नाहीं.

( इतक्यांत **सुंदरी** प्रवेश करिते. )

**सुंदरी**–कां **अनूबाई** काय चाललं आहे ? ताईसाहेबांची स्वारी आज फारवेळशी अक्कासाहेबांबरोबर एकांतांत आहे; कांहीं आहे कां त्याच्या मनाप्रमाणं जमण्याचं संधान ?

**आनंदी**–मला कांहीं बाई समजलं नाहीं; कारण बंगल्यांत दोघींचा एकांत चालला होता, म्हणून मी बाहेरच बसलें होतें, तों मला हांक मारून "**मुरारी**कडून इथं तयारी करीव थोड्या वेळानं मी तिकडे येतें" असं ताईसाहेबांनीं सांगितलं; त्याप्रमाणं सारी तयारी करून त्यांची वाट पहात बसलें आहें.

**सुंदरी**–चला बाई, सांज होत आली; मला वैद्यबुवाकडून ताईसाहेबांचं औषध आणायचं आहे.

**आनंदी**–जा, पण लवकर येहो. ताईसाहेबांचा आजही इकडच राहण्याचा बेत आहे.

**सुंदरी**–ही मी आलें म्हणून समज. ( गडबडीनें जाते ) इतक्यांत म्लानमुख झालेली **कमला** येऊन पलंगावर बसते. )

**आनंदी**--अक्कासाहेबांची स्वारी आज उन्हाचीशीं आली होती ?

**कमला**–( दुःखाचा सुस्कारा टाकून ) बाई सर्व मला उपदेश करायला येतात; म्हणतात धीर सोडूं नको; पण ज्याचं दुःख त्याला माहीत ! मेलं गळ्याशीं येऊन ठेपलं तरी धीर तो किती आतां धरावयाचा ! ( डोळ्यांस पाणी आणून ) हर हर देवा! आतां या **कमले**ची कांहीं धडगत नाहीं ! हं: आई म्हणाली तुला करमत नसेल तर जा दोन दिवस बागेंत रहा; पण मनाला मेला हृद्रोग लागला आहेना ? कुठं ही गेलं तरी चैन कुठलं पडायला ! हाय देवा आतां मी काय करूं ? ( मोठ्यानें सुस्कारा टाकून पलंगावर पडते.)

**आनंदी**–( तिला सांवरून पदरानें घाम पुसून ) ताईसाहेब आतां असं किती बरं दुःख करणार ! रडून रडून काय ही आपली अवस्था तरी झाली ! लिंबाप्रमाणं ज्या अं-

गाची कांती होती, ती आतां पांढरी फटफटीत झाली, तोंड किती सुकलं, गाल काय बसले, डोळे किती खोल गेले? उगी, रडूं नका बाई, कांहीं तरी विचार करा.

**कमला**–बाई आतां कसला विचार करायचा! झालं माझ्या जन्माचं मातेरं झालं! ( रडूं लागते. )

**आनंदी**–उगी ताईसाहेब; आतां ती मागची आठवण सुद्धां काढूं नका. आपल्याकरितां प्रयत्न थोडे कां झाले? माईसाहेब, अक्कासाहेब, दीक्षित, **हरपाळजी** सर्व प्रयत्न करून करून थकले, पण महाराज कुणाचंच ऐकत नाहींत, तिथं काय करायचं? आतां जें व्हायच नाहीं त्याची कशाला बरं आपण आशा धरितां? कांहीं विवेक करा. मनुष्यानं काळाला पाठ देऊन वागलं पाहिजे, करायचं काय?

**कमला**–काय सांगूं सखे पुष्कळ विचार करतें, पण काय करूं? एकदां जी ती मनोहर मूर्ती मनांत भरली आहे ती या डोळ्यापुढून हलत नाहीं. आसनीं, शयनीं, भोजनीं मला ते असे दिसत असतात. हर हर देवा ते वाड्यांत असत त्यावेळीं ती मनमोहन मूर्ती डोळेभरून पाहून तरी मनाला समाधान वाटत होतं, पण आज किती दिवसांत दर्शन नाहीं. बाबा असा काय बरं त्यांनीं आपला अपराध केला होता? किती हो तुम्ही निष्ठूर! अग आईग मध्यरात्रीं अंधारांत कींहो आपण त्यांना बाहेर घालविलंत! ( डोळ्यांत अश्रू आणून ) अग आईग आतां मी काय करूं? कोणाकड पाहून समाधान मानूं? कोणत्या आशेवर दिवस कंठूं? नको नको सखे आतां हा जन्म नको! हर हर! आई धरित्री, तुला तरी आतां आपल्या या दीन कन्येचा कळवळा येऊन ठाव दे!

**आनंदी**—ताईसाहेब हें काय? संध्याकाळच्या वेळीं मेलं नका बाई असं भलतंसलतं बोलूं! ( तिचे डोळे पुसून ) उगी आतां असं किती दुःख करणार? रडून रडून डोळे पहा किती सुजले. ( तिच्या केंसावरून हात फिरवून ) किती दिवसांत नहाणं माखणं नाहीं, यामुळं केंस किती घाण झाले आहेत. कोण आहे बाहेर, **मुरारी**, बगल्यांतून फणगराची पेटी तरी आण, वेणी घालूंदे.

**कमला**—नको नको आतां वेणी नको फणी नको कांहीं नको! बाई आतां ते सोहळे कोणाला दाखवावयाचे आहेत! ( कांहीं वेळ स्तब्ध राहून ) हाय हाय देवा, तिकडची स्थिति काय बरं झाली असेल! **अने** तुला काय सांगूं? अक्का सांगत होती कीं, त्यांची अवस्था फार कठीण आहे! वेळेला खाणं नाहीं, पिणं नाहीं, कांहीं नाहीं; मजवांचून त्यांना दुसरं कांहीं सुचत नाहीं. सारखा माझा ध्यास लागून ते असे वाळून गेले आहेत; आणि एकाद्या वेड्यासारखी त्यांची वृत्ति झाली आहे! सखे खरोखर त्यांची अशी दशा करण्याला हीच चांडाळीण कारण आहे! हाय हाय प्रियकरा काय हो मी आपल्याला दुःख दिलं! हतभागी **कमले** व्यर्थ तुझं जिणं! अशी दुर्दैवी तूं जन्माला तरी कशाला आलीस? प्रिया मजसाठीं आपण आपल्या सौख्यावरही पाणी सोडलं अं? वाहवा किती आपलं अंतःकरण दयाळू! सखे तुला काय सांगूं? ज्या दिवशीं त्यांनीं आपल्या पित्याच्या वधाची हकीकत ऐकली आणि माझ्या बाबांचा प्राण घेण्याची भयंकर प्रतिज्ञा केली होती त्या दिवशीं नाहीं कां तूं पाहिलंस, एक मजकारितां आणि माझ्या आईकारितां त्यांनीं ती भलती गोष्ट करणार

नाहीं अशी शपथ वाहिली. केवढं थोर अंतःकरण ! किती मजवर प्रेम! खरोखर सखे हे देह मात्र दोन, पण आत्म्यामध्यें भेद नाहीं ! नाहीं तर मजपेक्षां उत्तम स्त्रिया जगांत कमी कां आहेत, पण नाहीं जें एकदां वचन झालं तें झालं. त्यांनीं त्या **रत्नपुर**च्या राजकन्येची हकीकत सांगितलेली नाहीं कां तुला आठवत ? खरोखर एक एक गुण असे कीं, त्यावरून हे पंचप्राण ओवाळून टाकावे ! ( थोडी स्तब्ध राहून ) हं: प्रिया कशाला बरं तुह्मी या चांडाळणीचे नादीं लागून आपला सर्वस्वीं नाश करून घेतला? जर तुह्मी त्या **चंपकमाले**शीं लग्न केलं असतत तर कशाला आपली अशी स्थिति झाली असती ? पण नाहीं, तुह्मी एक वचनाला जागलांत ! हरहर प्रिया आतां तें आपलं वचन कसं हो पार पडणार ? परमेश्वरा आता मी काय करूं ? ( डोळयांत आश्रू आणून ) सखे माझ्या पुढील सर्व सौख्याचा अंत कींग झाला ! (कपाळावर हात मारून ) हायरे फुटक्या नशीबा ! काय हा प्रसंग मजवर आणलास !

**आनंदी**—ताईसाहेब पुरे आतां किती दुःख करणार ? आपलं हें दुःख पाहून माईसाहेबांची काय अवस्था झाली आहे? म्हातारपणीं आपण त्यांना सुख द्यावयाचं तें राहिलं, आणि हें काय बरं आपण चालविलं आहे ? कांहीं विचार पहा.

**कमला**—बाई तूं पुष्कळ सांगतेस पण मी कायग करूं ? हरहर देवा काय हें संकट मजवर आणलेंस ? आई जगदंबे, तुजवांचून या अभागिणीची दया कोणाला येणार आहे ! आतां माझा सर्व भार तुजवर आहे. (पलंगावर **आनंदी**च्या मांडीवर टेकून पडते तों किंचित् डोळा लागतो. )

**आनंदी**-( **कमलेच्या** तोंडाकडे पाहून ) किंचित डोळा लागला वाटतं. बरं झालं बाई आज किती दिवसांत झोंप ह्मणून कसली ती माहीत नाहीं ! ( हळूं हळूं पंख्यानें वारा घालते. )

( इतक्यांत बागेच्या दाराशीं **चंद्रसेन** व
त्याचा चाकर **गणोजी** प्रवेश करितात. )

**चंद्रसेन**-( आपणाशीं ) एकंदरींत माझ्या जन्माचं वाटोळं करावयाला कारण तो दुःष्ट **सारंगदेव** आहे ? हाय हाय काय करूं ? त्याची आठवण झाली कीं, अंगाचा संताप होऊन असं वाटतं कीं जाऊन त्या चांडाळाच्या नरडीचा घोट घ्यावा ! पण एक प्रियेच्या वचनांत गुंतून गेलों त्यानं उपाय नाहीं. अरे अरे दुष्टा, जर कां तूं माझ्या पित्याचा घात केला नसतास तर, मी कशाला पडलों असतों तुझं अन्न खाऊन तुझ्या घरीं; आणि प्रिय सखी **कमलेच्या** प्रेमपाशांत तरी बद्ध होऊन ही दुःखकारक स्थिति अनुभवावी लागली असती ! पण काय हे माझे भलते विचार ? असं जरी न सतं तरी परमेश्वराची इच्छा झाली असती तर आह्मा उभयतांचं प्रेम जडलं नसतं कीं काय ? कारण सुंदर वस्तू कोणाला नकोशी कां असते ? असो, प्राक्तनाधीन आहे तें कशानं चुकणार ? ( कांहीं वेळ स्तब्ध राहून ) हंः प्रियसखे **कमले** आतां तूं या **चंद्रसेनाची** नव्हेसन ? अक्का वारंवार मला धीर देत आहे; पण ते सारं व्यर्थ आहे ! देवा काय करूं मला कांहीं सुचत नाहीं. मी वेडा झालों आहें. प्राणप्रिये **कमले** तुजवांचून मला हे सारं जग शून्य दिसत आहे ! ( कांहीं वेळ स्तब्ध राहून) हंः आतां कितीही दुःख

केलं तरी व्यर्थ आहे ! असो, होणारापुढं काय उपाय आहे ? (दुःखाचा सुस्कारा टाकून ) आतां इथं राहण्यांत अर्थ नाहीं; कारण, **कमले**चं लग्न दुसऱ्याशीं होणार तें पाहून आगींत तेल ओतल्याप्रमाणं जास्तच त्रास होणार आहे; आणि आतां हें काळं तोंड एथें दाखविण्यांत काय अर्थ आहे ? मनांत आतां एवढीच इच्छा आहे कीं, एकवार प्रियसखीची भेट घेऊन जों-पर्यंत या कुडींत प्राण आहे तोंवर वैराग्य घेऊन तीर्थ यात्रा करीत हिंडावं; दुसरं काय ? ( सुस्कारा टाकून स्तब्ध राहतो.) अहाहा ! खरोखर जगांत ' वैराग्यासारखं सुख आणि अनुरागासारखं दुःख नाहीं.' जर मनुष्य पूर्वीपासून वस्तुमात्रा-वर विरागदृष्टी ठेवील तर दुःख ह्मणजे काय, हें त्याला समज-णारही नाहीं. असो, आतां काय उपयोग ?

**गणोजी**—रावसाब, सांज होत आली आतां घराकड न्हाईकां येत ?

**चंद्रसेन**—( दुखानें सुस्कारा टाकून ) थांब जाऊं आतां ! आपल्याला घरीं काय आणि इथं काय सारखंच आहे. (आप-ल्याशीं ) नित्य यावेळीं **आनंदी** या बागेंत फुलं न्यावयास येत असते; तिला गांठून प्रियेला एकवार तुझ्या दर्शनाची फार इच्छा आहे ह्मणून सांगून पाठवावं आणि एकदां तिला भेटून एथून चालतं व्हावं. ( उघड ) **गणोजी**, **आनंदी** बागेंत आली आहे कां पहा आणि असेल तर मी बोलावतों ह्मणून सांग. मी तोंवर इथं बाहेर बसतों; जा लवकर.

**गणोजी**—जी साहेब. ( बागेंत येतो आणि कमलेस व **आनंदीस** पाहून) वाः! आज ताईसाबांचीबी सवारि हतच हाय ! पन आतां **अनूला** हटिकन्याची सोय न्हाई, कारन ताईसाब

तिच्या मांडीवर पडल्यात. ( मागें फिरून ) चला रावसा-बाली हें सांगाव, मग झोर काय म्हनत्यात बगाव. (निघून जातो.)

( झोपेंत दचकून **कमला** ओरडते. )

**कमला**—( घाबऱ्या घाबऱ्या उठून ) आई आई ! धांवा धांवा! प्रियकरा बुडालें हो बुडालें! अग सोडग चांडाळणी कां मला ओढतेस? आईग! सोडवा मला !

**आनंदी**—( **कमलेस** कवटाळून ) ताईसाहेब ताईसाहेब, सावध व्हा! सावध व्हा! भिऊं नका. मी आपल्याजवळच आहें ! काय बाई झालं एकाएकी किंचळत उठायाला !

**कमला**—(**आनंदी**च्या गळ्यास मिठी मारून ) **अगे** बाई तूं आहेसन मजजवळ; मला सोडून जाऊं नको. (पुन्हां दचकून) अग ही पहा ! ही पहा मेली दुःष्ट चांडाळीण मला धरून पाण्यात ओढीत आहे! आई! ( डोळे झांकून **आनंदी**च्या गळ्यास घट्ट मिठी मारते )

**आनंदी**—ताईसाहेब भिऊं नका ! इथं दुसरं कोणी नाहीं; मी आपल्या जवळच आहें. ताईसाहेब स्वप्नांत भ्याला कीं काय ? ( तिचा घाम पुसून ) हा पहा घाम किती आला आहे आणि अंग किती कांपत आहे ! कशानं बाई भ्याला इतक्या ?

**कमला**—मला किनई आतां एक भयंकर स्वप्न पडलं त्यानं मी भ्यालें. ( **आनंदी**चा हात आपल्या उरास लावून ) हा पहा अजूनी कसा माझा ऊर धडधड उडत आहे !

**आनंदी**—असं बाई स्वप्न तरी काय पडलं मेलं ?

**कमला**—हें पहा मी असं पाहिलं कीं, आमच्या बाबांची जी आज्ञा उभयतांच्या लग्नाला आड होती, ती नाहींशी

होऊन, मोठ्या थाटमाटानं आमचं लग्न झालं. नंतर एके दिवशीं पुर्णिमेचं पिठासारखं चांदणं पडलं असतां, आनंदानं आह्मीं उभयतां या बागेंत आलों आहों.

**आनंदी**—वाहवा! फार चांगलं; यानं तर पुढचं होईक सुचविलं! बरं मग?

**कमला**—नंतर या लतामंडपांत उभयतां पलंगावर आनंदानं बोलत पडलों असतां, तिकडचा किंचित् डोळा लागला. झोंप येईना ह्मणून मी तेथून उठून त्या सरोवराच्या काठीं एका चौथऱ्यावर एकटीच जाऊन बसलें होतें; तों एक तरुण सुंदर स्त्री, रागानं लाल झालेली, जिनं आपले केंस मोकळे सोडले आहेत आणि कपाळास कुंकवाचं मळवट भरून, पांढरं पातळ नेसली आहे, अशी धांवत धांवत मजजवळ आली. (पुनः भिऊन आनंदीच्या गळयाला मिठी घालून) अग बाई अजूनी पहा ती माझ्या डोळ्यापुढं दिसत आहे.

**आनंदी**—भिऊं नका! मग पुढं?

**कमला**—तिनं एकाएकी डोळे वटारून करकर दांत खाऊन माझं मनगट धरलं आणि ह्मणाली "अग दुष्ट चांडाळणी, माझ्या सर्व सौख्याचं भांडार मला नाहींसं करून तूं घेऊन बसणार अँ? पहातें दम धर. असं ह्मणून मला दर दर ओढीत सरोवराकड घेऊन चालली आणि पाण्याजवळ पोंचतांच मजसह तिनं धाडकर आंत उडी घेतली. तेणेंकरून फार भय वाटून मी ओरडत उठलें: (दुःखाचा सुस्कारा टाकून) सखे! पुढं काय संकट येणार आहे कळत नाहीं!

खरंच गडे काय बरं याचा अर्थ असेल? स्वप्नं हीं पुढील होणारासारखी पडतात असं ह्मणतात.

**अनंदी**—अं: त्यांत काय आहे! मनाला स्वस्थता नसली ह्मणजे मेली हवीं तीं भलतींसलतीं स्वप्नं पडतात; ह्मणून तीं खरीं कां समजावायचीं!

**कमला**—खरोखर गडे जसं स्वप्न पडलं, त्याप्रमाणं झालं असतं, तर मी मोठ्या दैवाची झालें असतें, पण तसं मेलं कुठलं व्हायला!

(इतक्यांत एक जासूद येऊन मुजरा करून.)

**जासूद**—सरकार अक्कासाबांनीं हे पतार दिलया. ( **अनंदी** पत्र घेऊन **कमले**जवळ देते. ) येतों तर सरकार.

**कमला**—बरं ये. (पत्राकडे पाहून ) बाई आतां ही गेली नाहीं तोंच, पत्र कां बरं धाडलं आहे इतक्या गडबडीनं! (पत्र वांचून) हं: मोठं कठीण आहे! ( आनंदित होऊन. ) **अने** समजलं कां अक्कानं काय लिहिलं आहे तें?

**आनंदी**—काय बरं लिहिलं आहे? किंचित कळी उमल्यासारखी दिसते कांहींतरी आनंदाची बातमी आहे वाटतं?

**कमला**—ऐक काय लिहिलं आहे तें. ( पत्र वाचते. ) "अनेक अशिर्वाद. तुला भेटून घरीं आल्यावर तुझा व भाऊरायाचा हेतु कोणत्या तऱ्हेनं सिद्धीस न्यावा या विचारांत मीं बसलें असतां, बाहेरून येऊन सांगणं झालं कीं, पांच चार दिवसांत **सुवर्णपुराहून** वऱ्हाड इथं येणार. त्यास सामोरे जाऊन आणण्याकरितां व त्यांची बरदास्त ठेवण्याकरितां, तेरवाचे दिवशीं महाराज शहरांत येणार. तेव्हां आह्मां उभयतांच्या विचारानं असं ठरलं कीं, आतां विलंब न करितां उद्यां रात्रीं

उत्तम मुहूर्त आहे, त्यावर तूं भाऊरायाशीं गुप्त रीतीनें विवाह करावास आणि लागलीच एथून **जयनगरास** उभयतांनीं चालतं व्हावं. याशिवाय दुसरा उपाय नाहीं. जास्त विचार करण्याला वेळ नाहीं, तर सांगतें त्याप्रमाणं करण्यास अनमान करूं नको; सर्व तरतूद करून, वेळेला मी भाऊरायाला धाडून देतें. मला फावलं तर मी येईन; कारण, माईसाबांकडून आतांच मला बोलावणं आलं आहे. त्यांनीं आग्रह केला तर कदाचित् तिकडे राहण्याचाही प्रसंग मला येईल. यासंबंधानें माईसाबांची भीती धरूं नको मी कशीही त्यांची समजूत करीन. जरी लग्नाला मला यावयास फावलं नाहीं, तरी तुह्माला जातेवेळीं मी खास येऊन भेटेन. कळावें:—

**आनंदी**—हाजी हा, अक्कासाहेबांनीं खाशी युक्ती काढली!

**कमला**—( चिंतातुर होऊन शंकित मुद्रेनें ) हं: काय करावं! माझं मन मोठं घोटाळ्यांत पडलं आहे! हे विचार माझ्या मनांत फार दिवस घोळत आहेत, पण बाई एकाएकी आपल्या मत्तानं आईला आणि बावांना समजाविल्यावांचून असं करावं कसं? आणि असं केलं तर लोक काय बरं ह्मणतील? ( थोडा वेळ स्तब्ध राहून ) पण एकपक्षीं अक्काचंही मत खरं आहे; कारण, दुसऱ्या कोणत्याही उपायानं हं जमेलसं दिसत नाहीं. आणखी या वेळीं तसं न करावं तर मेला सारा जन्म दुःखांत काढावा लागणार आहे!

**आनंदी**—खरं जर पुसाल तर मला बाई वाटतं कीं अक्कासाहेबांनीं लिहिलं आहे त्याप्रमाणं करावं हें बरं. एकदां आपला उभयतांचा संबंध झाला, ह्मणजे मग महाराज तरी काय करणार? जरी रावसाहेबांविषयीं त्यांच्या मनांत राग

असला, तरी आपल्याकरितां झाल्या गोष्टीस उपाय नाहीं असं समजून त्यांनं स्वस्थ बसावं लागेल ! तर मी सांगतें. आपण ही संधी दवडूं नये.

**कमला**– ( आपल्याशीं ) हिचंही ह्मणणं खरं आहे, कारण; आतां असं केल्यावांचून दुसरा उपाय नाहीं ! हो असंच. प्राणावर बेतली तरी आतां विचार तो कसला ! वरं तर **अने** सर्व तयारी असूं दे. (आनंदित होऊन आपणाशीं ) अहाहा ! प्रिया आपल्याला हें समजलं ह्मणजे किती आनंद होईल ! ( उघड ) **अने** बाई आतां त्यांची गांठ पडेल तर फार चांगलं होईल ! जाऊन आणतीस कां बोलऊन ? आणि तशीच माझी प्रकृती बरी आहे, ह्मणून कोणाकडून तरी आईलाही कळीव; जा लवकर.

**आनंदी**–ताईसाहेब, पण बाई आपल्याला एकटी सोडून, मी कशी जाऊं ? **सुंदरा** आली ह्मणजे जाईन.

**कमला**–काय करावयाचं आहे; मजजवळ कोणी नको; जा तूं आपली, पण लवकर येहो.

**आनंदी**–बरं जातें तर. ( कुंजाच्या बाहेर येतें तों **चंद्रसेनास** पाहून ) वाहवा. एक काम झालं. बाई यांना पुष्कळ आयुष्य आहे हो. मी आपल्याकडच निघालें होतें. तों ऐतीच इथं गांठ पडली. ताईसाहेब आपल्या भेटीकरितां वाट पहात बसल्या आहेत; चला लवकर.

**कमला**–( आपल्याशीं ) हें अर्धीच ठरलं असतं तर किती चागलं झालं असतं ! पण भोक्तृत्व आहे तें संपल्यावांचून, हें कसं सुचणार !

**आनंदी**–( आपणाशीं ) मुख्य काम तर झालं; आतां को

णाबरोबर तरी माईसाहेबांकडे ताईसाहेबांची प्रकृती बरी आहे ह्मणून सांगून पाठवावं. ( जाते )

**चंद्रसेन**–(कुंजाजवळ येऊन, डोकाऊन पाहून, आपणाशीं) अहाहा! प्रियसखीचं दर्शन होतांच, किती तरी मनाला आनंद झाला; परंतु हा आनंद फार अल्प आहे! पण आज कां बरं मला बोलावलं असाव ? कांहीं समजत नाहीं ! असो, काय आहे तें कळेल. आतां प्रियेला आपलं दुःख अगदीं दाखवितां कामा नये; कारण आधींच पहा तिची काय अवस्था झाली आहे ! ( जवळ येतो, तों कमला आपल्याशीं कांहीं बोलत आहेसें पाहून, थबकून उभा राहतो.)

**कमला**–( आपणाशीं ) किती तरी वेळ झाला मेला **अनी**ला जाऊन ! अजून कसं बरं येणं झालं नाहीं ? पक्षां-प्रमाणं जर मनुष्याला पंखं असतीं, तर किती बरं झालं असतं ? मनांत आलं कीं पुरे ! लागलीच जाऊन गळ्याला मिठी घातली असती; त्यांची **रतिपाळ**रावांच्या घरीं आतां गांठ पडते कीं नाहीं कोण जाणे !

**चंद्रसेन**–वाहवा! प्रिया मला भेटण्याकारितां किती उत्सुक झाली आहे! हीच संधी आतां पुढं जाण्याला बरी आहे. ( हळूच मागून जाऊन तिचे डोळे झांकतो. )

**कमला**–( चपापून ) अग बाई कोण ते ? अक्का (डोळ्यावरील हात चाचपून) अक्का नव्हे, कोण आहे तें ?

**चंद्रसेन**–( डोळ्यावरील हात काढून) सखे मी अक्का नव्हे; तुझ्या प्रेमपाशांत बद्ध झालेला अक्काचा भाऊ आहे.

(इतक्यांत **आनंदी** येते. )

**कमला**– ( उठून उभी राहून) बाई मी किती भ्यालें पण!

(आनंदीस) **अने** अगोदर मला कसं कळिवलं नाहींस? वर. आईकडं निरोप धाडलासना?

**आनंदी**—होय ताईसाहेब. वरं पण बाई इतक्यांत कशी कळी उमलली ती! किती पण फेर पडला.

**कमला**—(हंसून)अग तुला माहीत नाहीं कां चंद्रदर्शन झालं कीं प्रफुल्लित होणं, हा कमलिनीचा धर्मच आहे. (**चंद्रसेनाम**) पण बाई एकाएकीच कसं यायचं तें? **अनी** भेटलीहोती कां!

**चंद्रसेन**—(तिच्या हनवटीस हात लावून) प्रियसखे, तूं माझी आठवण करीत आहेस असं समजतांच धांवत आलों.

**कमला**—काय तरी बाई चमत्कार! मी इकडच्या भेटीची इच्छा करीत आहें, हें घरीं समजायचना? **अने** बाई ऐकलसना हें बोलणं.

**चंद्रसेन**—प्रिये ह्यांत काय आश्चर्य? प्रेमबंधनानं जर उभयतांची मनं एक झालीं आहेत, तर हें समजणं काय अशक्य आहे? ज्या मनांत माझ्या भेटीची इच्छा झाली, त्यानंच मला हीं इकड धाडलं!

**आनंदी**—(हंसून) खरंच आहे ताईसाहेब हें पहा धांवा केल्याबरोबर पावत नाहींत ते देव कसले?

**चंद्रसेन**—(हंसून) वाहवा! आपण आहांत कां पाठीराख्या! हटलं कुठं शब्द खालीं पडेल.

**कमला**—वरं पण आतां बसायचं नाहीं कां? शंका नको; इथं भीती नाहीं कुणाची!

**चंद्रसेन**—हा मी बसलों; पण आपण उभ्याच कां राहणार? या अशा या. (जवळ जागा दाखवितो, तों **कमला** दूर बसते.) हें काय? प्रिये अशी ये. (तिला जवळ घेतो.)

**कमला**–हें काय बाई ! अगदीं जवळच कशाला बसाव-याला पाहिजे ? ( **चंद्रसेना**च्या खांद्यावर हात टाकून ) बरं आतां तरी झालं ना ?

**आनंदी**–( आपणाशीं ) अहाहा ! किती तरी जोडा शोभिवंत दिसत आहे ! जणूं लक्ष्मीनारायणच ! देवा, या उभयतांना जन्मभर सुखी राख.

**कमला**–बरीच पण फार दिवसांनीं आज माझी आठवण व्हायची ! वाड्यांत असतांना नेहमीं ह्मणायचं मात्र, माझी तुजवर प्रीति आहे, घटकाभरही तुजवांचून मला करमत नाहीं, आणि इतके दिवस मला भेटल्यावांचून, राहववलं तरी कसं कोण जाणे! पुरुषांचं मेलं तोंडापुरतं बोलायचं मात्र.

**चंद्रसेन**–( तिच्या हनुवटीस हात लाऊन ) वाहवा ! एकून हीच कां माझी परीक्षा केलीस? सखे, निरुपायामुळं तुला मी भेटलों नाहीं, तरी प्रेमांत अंतर होईल काय ? जरी मी तुजपासून दूर होतों, तरी हें अंतःकरण तुजपाशींच होतं ! कारण, कांहीं जरी व्यवहारिक अडचणी असल्या, तरी प्रीतीला कुणाचा प्रतिबंध आहे कीं काय ? प्रिये तुला खचित सांगतों, जगांतील सर्व बंधनं तुटतील, पण हें प्रेमबंधन कधींही तुटावयाचं नाहीं !

**आनंदी**–खरं आहे ताईसाहेब ! बाळपणापासून अति परिचयानं, एकमेकांचे गुणावगुण पाहून, जी मैत्री झाली असते, ती एकमेक एकमेकापासून कितीही दूर असलीं, तरी त्यांत अंतर यायचं नाहीं.

**कमला**–( हंसून ) तर मग माझ्या प्रत्यक्ष भेटीची गरज

नाहींच ह्मणायची ! कारण मानसिक व्यवहारानं सर्व कांहीं चाललंच होतं ?

**चंद्रसेन**—वाहवा ! चांगली कल्पना ! ( तिच्या हनुवटीस हात लाऊन ) प्रिये, तुला भेटल्यावांचून कां मी राहिलों असतों? पण तूंच पहा वरं, त्याला किती अडचणी होत्या त्या. आज तरी मोठ्या दैवानंच हा अकल्पित योग आला. सखे तुला काय सांगू? तुझ्या विरहानं माझा एक एक दिवस गेला, तो खरोखर एक परमेश्वराला ठाऊक ! तुझा वियोग झाल्या दिवसापासून मला अन्न नाहीं, पाणी नाहीं, कांहीं सुचत नाहीं ! साऱ्या रात्रींत डोळ्यास डोळा लागत नाहीं ! एक तुजवांचून या जगांत मला दुसरा विषय नाहीं !

**आनंदी**—रावसाहेव, जशी तिकड आपली, त्यापेक्षांही कांकणभर जास्तच इकडे ताईसाहेबांची स्थिति झाली होती. सारखा आपला ध्यास त्यानं लागला आहे ! डोळ्यांचं पाणी तर आपण गेल्यापासून खळलेलं आह्मी कांहीं पाहिलंच नाहीं ! अवस्था पहा कशी झाली आहे ती ! खरंच आहे मूर्ती ऊर उन्हांत तर सावलीला तरी सुख कुठून मिळणार ?

**कमला**—कोणी झालं तरी बाई आपलं तेवढं पुढं काढतात; दुसऱ्याचा विचार कोण करणार ?

**चंद्रसेन**—( कमला आपल्याला मिळणें अशक्य, या गोष्टीचें स्मरण होऊन आपल्याशीं ) अरे अरे ! काय मी मूर्ख पहा ! माझी सारी इच्छा निष्फळ झाली असतां व्यर्थ मी या मोहजालांत पुन्हां पुन्हां गुंतून पडत आहें ! ( उघड ) प्रियसखे **कमले**, काय करावं ! तुझं दर्शन झालं कीं मनाला [illegible] पुन्हां पुन्हां तुझ्या [illegible]प्तीची आशा उत्पन्न होते !

मी आलों कशाला आणि करीत आहे काय, याचं भान रहात नाहीं ! माझी आतां पूर्ण निराशा झाली ! ही माझी आतां शेवटचीच भेट असं समज. प्रिये मी तर आतां आपल्या वचनाप्रमाणं वागणार. सर्वसंगपरित्याग करून, जोंवर या कुडींत प्राण आहे, तोंवर वैराग्य घेऊन तीर्थयात्रा करीत मी आपल्या आयुष्याचे दिवस काढणार ! मी कधींच एथून जाणार होतों परंतु एकवार तुझ्या आणि माईसाहेबांच्या दर्शनाची फार इच्छा होती; दैवयोगानं तुझी भेट तर झाली, पण आतां माईसाहेबांचं दर्शन होणं कठीण आहे, असो, उपाय नाहीं ! मी आतां असाच चालता होणार; कारण रतिपालाला अक्काला हें समजलं, तर तीं मला जाऊं देणार नाहींत. कृपा करून कांहीं दिवस हें वर्त्तमान त्यांना कळऊं नको ! माईसाहेबांच्या चरणीं माझा साष्टांग नमस्कार सांग, आणि आजपर्यंत जशी या बालकावर त्यांची कृपा होती, तशीच निरंतर ठेवण्याबद्दल त्यांजपाशीं विनंति कर ! दुसरं कांहीं माझं सांगणं नाहीं ! येतों मी आतां ! ( उठतो. )

**कमला**–(त्यास आलिंगून ) छे गडे ! मी नाहीं जाऊं द्यायची. प्रिया, आपण एक सर्व सोडून निघालात, पण या दीन दासीचं मागं कस होईल ! मी सारा जन्म कसा कंठूं ?

**चंद्रसेन**–( तिची हनुवटी धरून ) प्रिये, मी तुला काय सांगूं ! दुःखानं हें काळीज करपून जाऊन माझं देहभान नाहींसं झालं आहे ! मला कांहीं सुचत नाहीं !

**आनंदी**–ताईसाहेब पुरे बाई, आतां किती तरी माणसाचा अंत पहावयाचा ?

**चंद्रसेन**–(साश्चर्य आपणाशीं) हं: यांत काय बरं गूढ आहे!

( उघड ) अने सांग सांग कांहीं सुवार्ता आहे कीं काय ?

**आनंदी**—बरं रावसाहेब आपल्याला जर कांहीं आनंदाची बातमी मी सांगितली, तर मला काय बक्षीस द्याल ?

**चंद्रसेन**—वाहवा ! विचारतेस काय जें मागशील तें देईन.

**कमला**—बरं पण मी सांगितली, तर मला काय द्यायचं होईल ? पण नको गडे मला लाज वाटते.

**चंद्रसेन**—( तिला प्रेमानें आलिंगून ) सखे, हा सर्व देहच जर तुला अर्पण केला आहे, तर आणखी काय पाहिजे ? सांग सांग पाहूं आनंदकारक वर्तमान काय आहे तें !

**आनंदी**—हें पहा, परवाचे दिवशीं रात्रीं गुप्त रीतीनं आपला ताईसाहेबांशीं गांधर्वविवाह व्हावयाचा आहे.

**चंद्रसेन**—वाहवा ! देवा, मी हें स्वप्नांत तर ऐकत नाहींना ? प्रिये खरंच कां हें ?

**कमला**—( हंसून ) प्रिया अजूनी संशय आहेचना ?

**चंद्रसेन**—प्रिये धन्य झालों मी ! परमेश्वरा इतके दिवस जें दुःख भोगलं, त्याचं फल प्राप्त होणार तर मग ! सखे पूर्वीच जर हें ठरलं असतं, तर किती उत्तम होतं ?

**आनंदी**—सारं खरं, पण वेळ आली पाहिजेना ?

**कमला**—( विनोदानें हंसून ) अने आतां बाई कोणी तरी इथं येईल, चला बंगल्यांत जाऊं ! ( **चंद्रसेनास** ) जायचं आहेना देश हिंडत तीर्थयात्रेला? संध्याकाळ होत आली !

**चंद्रसेन**—( प्रेमानें तीस आलिंगून व हनुवटीस हात लाऊन ) हंः सखे सर्व पूण्यतीर्थं ज्यांत आहेत, असं स्वर्गसुखासही तुःच्छ करणारं स्थान सोडून, आणखी कुणीकड जावयाचं आहे ? ( तिचें चुंबन घेतो. )

**कमला**–( लाजून ) जा गडे; हें काय बरं लोकां देखत ?

**चंद्रसेन**–सखे इथं परकी कोण आहे ? अनी आपणच आहे !

**आनंदी**–ताईसाहेब रात्र पडत चालली; आतां बंगल्यांत यायचं ना? जेवणाची तयारी झाली असेल. ( **चंद्रसेनास** ) आपणही आजच्या गोड बातमीवर गोडसे दोन घास इथच खाल्ले तर बरं होईल. अक्कासाहेबाकडे मी निरोप पाठवितें.

**कमला**–हो, अग परक्यासारखं विचारतेस काय ? ( **चंद्रसेनास** ) चलायचं ना ?

**चंद्रसेन**–हो चला. पण आतां पायीं कां जाणार इतकं लांब?

**कमला**–हो! इथून बंगल्यापर्यंत कां मला जाववत नाहीं ? ( हंसून ) आणि कोणी नेणार असेल, तर मी कशाला नाहीं ह्मणूं ? पण नको बाई मला लाज वाटते, मी आपली पायींच येतें

**चंद्रसेन**–बरं तर मर्जी !

( तिघें निघून जातात. )

---

## प्रवेश २ रा.

**स्थळ–वसंतविलास** बागेंतून बाजारांत येणारा रस्ता.

( क्रोधानें संतप्त झालेली **सुंदरी** प्रवेश करते. )

**सुंदरी**–( आपल्याशीं ) हं: शाबास ग **वासंतिकाबाई** ! शेवटीं कांहीं जमत नाहीं असं पाहून, गुप्त रीतीनं उभयतांचा विवाह करून, एथून पळवून लावण्याचा घाट घातलास? संध्या-

काळीं **कमलेशीं** त्या मेल्याचं प्रेमाचं तें गोंडा घोळणारं भाषण, मी सारं लतामंडपाच्या आड उभी राहून ऐकलं. तेव्हांपासून माझ्या पायाची आग मस्तकाला गेली आहे! अरे निर्दया, या **चंपकमालेशीं** मात्र तुझा एवढा निष्ठुरपणा अँ? चांडाळा अरे कांहीं तरी तुला माझी दया यावयाची होती! माझी अशी दशा करून तूं मात्र सौख्य भोगणार काय? (बोटं मोडून) मेल्या जसं माझ्या जन्माचं वाटोळं केलंस, तसं तुझं करीन तरच ही नांवची **चंपकमाला**! (कांहीं वेळ विचार करून) असो, व्यर्थ बोलून काय फळ? त्याचा सूड घेईन तेव्हां खरं! मेल्या **रणदेवाला** मधाशीं हें सर्व कळिवलं आहे, पण त्याला कसली याची काळजी? त्याला त्या दारूपुढं सुचतं आहे कुठं! 'स्वत: मेल्यावांचून स्वर्ग दिसत नाहीं' ह्मणतात तें खरं आहे. (कांहीं वेळ विचार करून) आतां कोणावर विश्वास ठेऊन उपयोगीं नाहीं. आपलं ठरलं आहे त्याप्रमाणंच केलं पाहिजे.

---

## प्रवेश ३ रा.

**स्थळ**—बाजारांतील एका वाण्याचें दुकान.

(**रणछोडदास** शेटजी व त्याचा गुमस्ता **वल्लभ** दुकानांत बसले आहेत.)

**रणछोड**–(डोळ्यास चाळशी लाऊन) मेहेता ते उधारनी चोपडी अहीं लावो जोऊं.

**वल्लभ**–(वही पुढें नेऊन) आ ल्यो शेट.

**रणछोड**–(रागाऊन, खातेवही चाळीत) जुम्मले उधार केटलूं थयूं तेनो सरवाळो लिधो छे के?

**वल्लभ**–हां शेठ. बद्धा उधारनो तो सरवाळो लिधो छे; घणा रूपियां लोकोपासें गुथाया छे ! आ जुओ जुम्मले लेहणूं. ( वहीवरचा हिशेब दाखवितो. )

**रणछोड**– ( हिशेब पाहून उरावर हात मारून ) हाय बापरे ! आ ते शूं मुरखपण थयूं ! ( चकित होऊन ) लेणूं साडा सोळसो रुपियां ? हंः ठीक ! अरे भाई एवी रीते जो उधार रह्यो छे, तो पछी आपणे शूं खाईये ? केम कांई उघराणी आवती नथी ? ओ भगवान ! ( स्तब्ध बसतो. )

**वल्लभ**– शेठ मोटी मोटी रकमो जेनापासे अटकेली छे, ते तो कांई लगारे आपता नथी; कांई पण बानू बतावे छे. नही तो आ जुओ. ( वही चाळून खाती दाखवितो. ) बद्धा लोकमां **रणदेवजी** शेठ घणा वस्ताद छे ! शूं कहूं ? बारणाआगळ माणसने उभो रहेवा देतो नथी ! शूं करूं फेरा खाई खाईने थाकी गयो.

**रणछोड**–वाहवा ! ठीक बहू सारूं ! ( रागानें ) मारो माल तो जेवो एओना बापनाच घेरनो ! लुच्च्या साला ! हंः, एवी रीते थशे, तो बद्धी मुंडी जईने दुकान बेशी जशे ! छीः छीः मेहता, आवती काले सवारे ऊठतावातज **रणदेव**-पासे पेहेला जजे, अने बाकी लिधावना ऊठीश नही. ( रागानें त्याच्या तोंडापुढें हात करून ) अरे गधेडा, अमो नाना पाडीछताते तमे बद्धो माल उधार आपी आपीने मने खाडामां नाखी दिधो ! (इतक्यांत पडद्यांतून शेटजीची बायको ह्मणते )

अरे आ करमनी कथा क्यां सुदी चालवानी छे ! केटली वार थई ! अडधी रात तो गई छे; आज जमवा ऊठवूं छे के नही ?

**रणछोड**–( रागावून पडद्याकडे पाहून ) अरे हां हां, वार थई! एने तो साळूं खावाविना बीजूं कांई सूजतूज नथी! ऊठीके चाली खाखा! एवूं करीने के दाडे ये अमोने खाई जशे ते जणातूं नथी! अरे गधेडी, आ काम अमो आजे नहीं करीशूं, तो काले कोण तारो बाप आवीने करशे?

( पडद्यांतून शेटजीची वायको ) हां हां मालम छे एऊं करी करीने, केटलो पैशो भेगो करशो ते? जोईशूं!

**रणछोड**–( रागानें ) अरे जा जा. मोडूं काळूं करी वरमा जईने बेस! गांडी! केटली बकबक करीश! अमो आजे जमना नथी जा. ( पुन्हा वहीकडे पाहून चिंतेनें ) मेहता, आज **रतनजी नानावटी**नी चारसों रुपियानीं हूंडीनी देखाड थयेली छे, तो काले ते रकम पूरी शी रीते थशे, तेनो मोटो विचार पडयो छे! ( दुःखानें ) ओ भगवान! आवा धीरवाथी बद्धी गांसडी डूबवानी वखत आवेली छे! वहू खोटूं! अवे काले गमे तेम करी, बीजा तरफथी रक्कम लावी, तेनी हूंडी पूरी करवी जोइये! (सुस्कारा टाकून ) हंः, वहू सारूं! केमछे भाई आजनो हिसाब पूरो कर्यो छे के नहीं?

**वल्लभ**–हां शेट पूरो कर्यो छे. ( वह्या दाखवितो. )

( शेटजी हिशेब तपासतो, तों **चंपकमाला** प्रवेश करिते. )

**चंपकमाला**–( इकडे तिकडे पाहून आपणाशीं ) किराण्या जिनसांचा बाजार तर हाच दिसत आहे रात्र वरीच झाल्यानं बहुतेक दुकानं बंद झालीं आहेत. हें इथं एक दुकान उघडं आहे. मला हवा तो जिन्नस इथं मिळतो कीं नाहीं कोण जाणे! ( थोडा वेळ विचार करून ) हंः न मिळावयाला काय झालं! कांहींतरी अंगावरील मोठासा दागिना

द्यावा ह्मणजे झालं! मेलं द्रव्यानं कोण वश होत नाहीं! असो; आतां तेथें जाऊन शोध करावा!

**रणछोड**–( हिशेब पाहून ) छीः छीः बहू खोटूं! आ गाममां वेपार करवानो तो कांईएक इलाज नथी! लोक घणा नठारा थया छे! ( सुस्कारा टाकतो. ) हू चालचाल भाई दुकान बंद कर.

**चंपकमाला**–( दुकानाजवळ येऊन वांकून पाहून आपणाशीं ) दुकानांत दोघंच आहेत, आतां शेटजीला एकीकडे बोलाऊन हळूच पुसावं! ( उघड ) शेटजी, अहो शेटजी, आहां कां कोणी दुकानांत?

**रणछोड**–( त्रासून ) हायरे भगवान! भीखारी लोकोये तो साळो गजब कर्यो छे! अदु रात गई तोपण आ त्रूवो तरास छेज! अरे जाजा!

**वल्लभ**–( रागानें ) अरे जाजा! आ वखते कांई एक मळवानुं नथी जा.

**चंपकमाला**–( आपणाशीं ) पहा मेले मुडदार कसे उद्धट आहेत ते! परवा आहे कां कुणाची? ( उघड ) अहो मी भीक मागायला नाहीं आलें, मला कांहीं जिन्नस विकत पाहिजे.

**रणछोड**–( उठून हात जोडून ) या या बाईशाब दुकानउपर यावा. ( डोळ्यावरून हात फिरवून ) ये अंधारूं रातमां दिशला नाहीं! भलता बोलवानी महाराज क्षमा करी जुवे! जणस देवाचा तो आमचा काम छे. काय पाजे?

**चंपकमाला**–( आपणाशीं ) हंः पहा मेले कसे मघांशी कुत्र्यासारखे चवताळून उठले होते आणि आतां किती मऊ

आले ते ! (उघड) हे पहा इकडे या थोडे; मला कांहीं जिन्नस विकत पाहिजे, पण तो गुप्तपणें देतों ह्मणून वचन द्याल तर सांगतें. त्याच्या किंमतीबद्दल ही सरी मी तुह्मांला देईन.

**रणछोड**–(सानंदित) शांगा शांगा बाईशाब (गळ्यावरून हात फिरऊन) या गळ्याशपत तमाला जणस देल; बोला.

**चंपकमाला**–पहा बरं, विचार करा ! मग नाहीं ह्मणाल.

**रणछोड**–अरे बाईशाब ते मंदी विचार तो कशला; बोला, ख्वास देल.

**चंपकमाला**–(इकडे तिकडे पाहून हळूंच) हे पहा, मला थोडासा सोमल पाहिजे.

**रणछोड**–(चकित होऊन आपणाशीं) हं: जे द्वारकानाथ ! विचार छे ! शूं करूं वारूं ?

**वल्लभ**–(जवळ येऊन) शूं छे सेटजी ?

**रणछोड**–(त्याच्या कानाशीं लागून) मेहेता, आ मोटो विचार छे ! आ बाई तो मोटा घेरनी छे; एने आ वीख जणस शी रीते अपाय ? (चंपकमालेस) बाईशाब, तमी कुणाच्या ? आ वीख जणस घेऊन तमाला शूं करवी छें ?

**चंपकमाला**–हें पहा जास्त पंचाईत नको (सरीस हात लाऊन) हा जिन्नस पाहिजे असेल तर द्या; नाहीं तर काय मिळेल मेला दुसरीकड !

**रणछोड**–हां हां बाईशाब जरा थांबा ! (चिंतातुर होऊन) केम भाई शी रीते करवूं ? ना जो कहीशूं तो आपणा हातमा आवेली गांसडी जायछे ! (चंपकमालेस) बाईशाब,

जरा जणस देवा. ( ती दागिना देते ) आ जों मेहता वजण तो दोडसेर उपर छे ! वाहवा भाई एवी शाट तो आखा मारा बद्दा जनममां हातमां लागी नोती ! ( चंपकमालेस ) बाईशाब जरा शबूर करो ! ( विचारांत पडतो )

**चंपकमाला**–( आपणाशीं ) हं: या दुन्यासारखी भूल मेली कशांत नसेल ! सांगतात कीं, गुजर, वाणी लोकांत भूतदया फार, हिंसा ते कधीं करायचे नाहींत ! पण पहा मी बायको मनुष्य, विश कांहीं तरी वाईट कामाला नेत आहे, हें यानां समजलं असून, पहा कसे घोंटाळ्यांत पडले आहेत ! मेला तो सोन्याच्या सरीचा फासा हृदयाला झोंबला आहेना ? मग कसला विचार दगडाचा ! ( उघड ) आटपा ! आटपा! विचार कसला करितां ? मला जाऊंदे, उशीर झाला !

**रणछोड**–हां ! हां ! झाला ! शूं मेहता, कठण छे भाई !

**वल्लभ**–शेट आपणें तो वेचवावाळा; गऱ्हाक मागते जणस आपवाने आपणने शूं हरकत छे ? वेपारी छीये ! पण बाईशाब तमचा नाम लिखऊन देवा पडेल. ( वही हातांत घेऊन लेखणीचा टाक पाहून ) तमचा नाम काय ?

**चंपकमाला**–काय मेल्यांनीं पांचटपणा लावला आहे पहा! मला नांव नाहीं गांव नाहीं कांहींएक सांगायचं नाहीं. तुम्हाला जिन्नस द्यायचा आहे कीं नाहीं बोला.

**रणछोड**–( मोठ्यानें हंसून ) हा ! हा ! हा ! बाईशाब रागावशो ! जरा शबूर करो ! ( मेहतास ) भाई आवती काले **नाणावटी**नी हुंडीनी रकम पुरी करवानी फकर हती, पण केवो चमत्कार छे ? हं: परमेसरने चिंता ! आवी कीं नई

लाट ! आप आप भाई जेम थवानुं हशे तेम थशे ! ( चंपक-मालेस हात जोडून ) पण बाईशाव कुणाला शांगावा नई ! एटलूं किरपा जुवे !

**चंपकमाला**—नाहीं बरं मी कुणाला सांगत नाहीं. तुम्ही काळजी करूं नका.

**रणछोड**—हां एटलूं ! एटलूं ! मेहता आप आप ! ( मेह-ता सोमलाची पुडी देतो व ती तेथून निघते )

**चंपकमाला**—( आपणाशीं ) चला आपलं निम्मं काम तर झालं ? आतां पुढच्या उद्योगास लागावं ! ( जाते. )

**वल्लभ**—( आनंदानें ) भाई गरेणुं तो केऊं सारुं छे ! आ वजण चाळीस भारना उप्पर छे ! लाट लागी !

**रणछोड**—(मोठ्यानें हंसून) हः हः हः ! पेहेले दुकान बंद करी होत, तो आ लाट जनीथीना ? ( उठून ) चाल चाल भाई दुकान वाश.

( दुकान आटपून निघून जातात. )

## चतुर्थ अंक समाप्त.



# अंक ५.

## प्रवेश १ ला.

### स्थळ—रतिपालाचे घरांतील दिवाणखाना.

( रात्रीचें जेवणखाण होऊन **चंद्रसेन** आणि **रतिपाल** पानसुपारी खात बसले आहेत. )

**रतिपाल**—गड्या तुजविषयीं मला फार काळजी होती, पण ती झाली एकदांची निवारण ! आतां आरंभलेलं काम एकदां नीटपणें शेवटास गेलं ह्मणजे मिळवली.

**चंद्रसेन**—अं: आतां त्याची काळजी नको; पण आतां तुझा वियोग होणार, त्याचं मला वाईट वाटतं आहे. उद्यां किंवा परवाचे दिवशीं एथून आह्मांला निघून गेलं पाहिजे. मागं तूं मात्र एकटा रहातोस.

**रतिपाल**—हें पहा मज विषयीं तूं कांहीं काळजी करूं नको. मी आतां एथें कशाला रहातों ? तूं पुढं जाऊन पोंचतोस, तों मागून मी आलोंच ह्मणून समज; कारण आ-तां एथें राहणं आपल्याला ठीक नाहीं. त्यांतून आमचं इथं काय आहे ? येऊन जाऊनघर आणि थोडासा व्यापार ! इ-थलं सारं आपले **विश्वासराव** पहात आहेतच; आपल्याला त्या मिळालेल्या जाहगिरीची व्यवस्था केली पाहिजे.

**चंद्रसेन**–(साश्चर्य) काय रे गड्या, कालपासून मी मोठ्या बुचकळ्यांत पडलों आहें ! कारण मध्यंतरी कांहीं एक वार्ता नसतां, एका एकी या लग्नाचा घाट कोणी जमवून आणला? मला वाटतं, ही सारी मसलत **अक्काची** आहे! हो, हें कृत्य तिज वाचून दुसऱ्याचं नव्हेच!

**रतिपाल**–(हंसून) कोण जाणे बुवा ! तुझा बहिणभावांचे काय खेळ आहेत ते? आपल्याला यापैकीं कांहीं ठाऊक नाहीं.

**चंद्रसेन**–अरे उगीच कशाला आतां चोरून ठेवतोस? कालपासून माझी तिची गाठ नाहीं, आतां भेटली ह्मणजे मी तिलाच विचारीन ह्मणजे ती सारं सांगेल! बरं असो महाराजाची स्वारी कधीं येणार शहरांत?

**रतिपाल**–उद्यांच येणार होती, पण तो बेत रहित होऊन, आणखी दोन दिवसांनीं **सुवर्णपूरचं** वऱ्हाड इथं येणार, तेंव्हां परभारे त्यास आणण्याकारितां महाराज तिकडूनच सामोरे जाणार आहेत.

**चंद्रसेन**–बरं आह्मी एथून जायचं खरं, पण ह्याची व्यवस्था काय केली आहेस ?

**रतिपाल**–अं: त्याची काळजी नको. आपल्या पागेंत दोन उत्तम घोडे आहेत. ते तुला माहीतच आहेत, ते घेऊन उद्यां रात्रीं इथून निघा, कीं उजाडायला जाल चाळीस कोस! पण काय रे **कमलाताईला** बसतां येतं ना नीट घोड्यावर ?

**चंद्रसेन**–अरे हो! वाः! तिजपुढं स्वार काय बसेल !

**रतिपाल**–तुह्मांबरोबर एक आपला **गणोजी** आहेच आणि दुसरा **संभाजी. आनंदी** तुझा बरोबर यावयाला पाहिजे होती, पण काय करावं? तिला घोड्यावर बसतां येत नाहीं.

तिला ही तुह्मा बरोबरच निघालं पाहिजे, पण मागाहून ती **जयनगरीं** तुह्माला भेटेल. **सुंदरी**ला नेण्याची जरूर नाहीं.

**चंद्रसेन**—खरंच **रतिपाला** तुला मी सांगायाला विसरलों. त्या **सुंदरीला** लक्ष्य लावून तूं कधीं पाहिली आहेस कां? आजपर्यंत चांगलीशी ती माझ्या नजरेस पडली नव्हती, पण काल मी तिला पाहिली; मला वाटतं कीं, आपण आणलेली ती **रत्नपूरच्या** राजाची कन्या **चंपकमाला** असावी! थोड्या दिवसांपूर्वी **मामा साहेबांनीं** आपल्याला लिहिलं होतं कीं, ती कुणाला न विचारतां पळून गेली ह्मणून! हल्लीं कामाकाजा-च्या संबंधानं थोडीशी खराब झाली आहे; पण मला तर वाटतं खास ती **चंपकमालाच** असावी!

**रतिपाल**—भलतंच कांहीं तरी! अरे किती केलं तरी ती राजकन्या; तिचं स्वरूप कोणीकडे आणि हिचं कोणीकडे! आणि ती इथं येऊन, दासी होऊन कशाला राहील! अं: यांत कांहींच अर्थ नाहीं.

**चंद्रसेन**—तूं थोडं लक्ष्य देऊन पहा. मला तर कालपा-सून वाटत आहे कीं, ती खास **चंपकमाला** असावी! तें स्वरूप, तो वर्ण, तो बांधा, अगदीं हुबेहूब तीच!

**रतिपाल**—अं? उगीच तुला भ्रांती आहे. त्यांतून एका सारखं कांहींसं साम्य, दुसऱ्या एकाद्यांत मिळतं! बरं तें असो. ती कोणी कां असेना. लागा आतां तुह्मी आपल्या तयारीला; मामासाहेबांना इकडील सर्व मजकुराचं पत्र आतांच लिहून दे रवाना करून.

**चंद्रसेन**—ठीक आहे! कोण आहे रे बाहेर? दौत ले-खणी घे पाहूं.

**गणोजी**—जी रावसाब. ( लिहिण्याचं साहित्य आणून देतो व **चंद्रसेन** पत्र ल्याहावयास लागतो. इतक्यांत महालाच्या बाहेर **आनंदी** प्रवेश करिते. )

**आनंदी**—( आपल्याशीं ) हर हर देवा ! काय रे संकट आणलंस ! जगंनिवास यांतून पार पाडणारा आतां तूं आहेस ! कोणी मेल्या दुष्टांनीं दावा साधून ही कांहीं करणी केली, किंवा नकळत एकाद्या विषारी जनावरानं दंश केला, कांहीं समजत नाहीं ! आतां तिथं झालेली स्थिति जर मी यांना सांगेन, तर उभयतां फार घाबरतील ! तर माईसाहेब आणि अक्कासाहेब ताईसाहेबांच्या भेटीस आल्या आहेत, त्यांनीं आपल्याला लवकर बोलावलं आहे, एवढंच सागावं ! ( महालांत येते. )

**रतिपाल**—( तिजकडे पाहून ) कोण **आनंदी**, आज रात्रीची कुणिकडं ?

**आनंदी**—माईसाहेब आणि अक्कासाहेब बागेंत आल्या आहेत, त्यांनीं आपल्याला आणि रावसाहेबांना जसे असाल तसे लवकर बोलावून आणायला सांगितल्यावरून आलें आहे. चला चला लवकर !

**चंद्रसेन**—अं ! कां बरं इतक्या जरूरीनं बोलावलं असावं ! कांहीं नवीन अरिष्ट तर उत्पन्न झालं नाहीं ना ?

**आनंदी**-तें कांहीं नाहीं. पण चला चला रावसाहेब, आतां बोलत बसण्यांत वेळ घालवूं नका. निघाच लवकर !

**चंद्रसेन**—ठीक आहे. राहूंदे आतां हें पत्र ! ( **रतिपालास** ) कां चलायचं ना ? ( पोषाख घालतो. ) तिकडून आल्यावर मग पत्र लिहीन.

**रतिपाल**—चला जाऊं. पण गड्या कारण काय आहे इतक्या जरूरीनं बोलावण्याचं कांहीं समजत नाहीं! (पोषाख करतो.)

**चंद्रसेन**—तेथें गेल्यावर काय आहे तें समजेल. (तरवार घेऊन) पण कायरे रात्रीची वेळ आहे, हत्यार असावेंच जवळ नाहीं?

**रतिपाल**—हो वेळ आहे, प्रसंग आहे, मी ही घेतोंच. (तरवार घेतो.) मशालजी नकोच बरोबर, कारण उगीच गावांत बभ्रा नको.

**आनंदी**—चला चला लवकर उशीर झाला.

**रतिपाल**—हे निघालोंच. आतां वेळ नाहीं.

(तिघे निघून जातात.)

---

## प्रवेश २.

**स्थळः—वसंत विलास** बागेकडे जाणारा रस्ता.

(दारू पिऊन झिंगलेले व वेडेवाकडे पोशाख केलेले, हातांत दारूच्या बाटल्या घेऊन गात व वेडेवांकडे नाचत-बागडत राजा **सारंगदेव** आणि **रणदेव** प्रवेश करितात.)

**सारंगदेव व रणदेव**—(गातात.)

**पद.**

अरे दोस्त मुजे दारू चढीरे ॥ ध्रु० ॥
क्या मजा आई देखो तनमो ॥ दिलखुष हुवे हम मनमो ॥
गाओ नाचो आनंदसें गान दिनमो ॥
दोस्त दारू चढीरे दारू चढी ॥ १ ॥

(मोठ्यानें हसून ) हः, हः, हः, क्या मजा है ! हः हः हः !

**रणदेव**-( बोबडे बोलत ) हे केलेले पोशाख आपले नव्हत सरकार ! मला वाटतं, अं हे शिपा-शिपायाचे ! हः खास त्यांचेच !

**सारंगदेव**-असे-असेनात हें पहा ( वेडे वाकडे हात क-रून ) कसं ही असलं, तरी मी-मी राजा आहें ! मला कोणाची भीती आहे ?

**रणदेव**-( मिशावर ताव देऊन ) मीहि मीहि प्रधान आहे ! आणि मला लोक भितात ! ( हंसतो ) हः हः हः स-रकार खाविंद पायऱ्या लागल्या, जपून पाय टाका ! ( पाय उचलून टाकतो. )

**सारंगदेव**-अरे कोण रे गाढव! मूर्ख! अशा अशा वाटेंत पायऱ्या बांधणार ? आं बांधणार ? काय पुसतों ?

**रणदेव**-हे पहा, हे पहा; कोणी आपणा आपणा सारखेच अगदीं संशय नाहीं ! चिंता नाहीं. खास, खास, तेच तेच गाढव बचा ! ( दोघे अडखळून पडतात. )

**सारंगदेव**-( धडपडून उठून ) या साऱ्या, साऱ्या जगांत एक दारू आणि स्त्री या सारखी वस्तूच नाहीं ! ( हसून ) हः हः हः ! काय काय मजा आली आहे अं ? हे हे सौख्य कशा-कशांत नाहीं ! हं बरं कां ?

**रणदेव**-एवढं एवढं मात्र खरं ! हे पहा दारू ती दारूच दारू ! ( हसून ) हः हः हः ! पण गाढव लोक तिची निंदा निंदा करतात अं !

**सारंगदेव**-ते ते पाजी आहेत मू-मूर्ख आहेत !

**रणदेव**-सरकार सरकार मी एक तिच्यावर गा-गाणं केलं

आहे; ह्मणूं कां ? पण तबला, तंबोरा, वीणा, मृदंग सगळं पाहिजे हं !

**सारंगदेव**—ह्मण ह्मण नको तें रौं रौं आणि सौं सौं, आणि धित्रिड धिविड ! ह्मण, ह्मण, मी ऐकतों डोळे लावून.

**रणदेव**—वरं ठीक पण आधी अवा—अवाज साफ करतों ( हातांतील बाटलींतली दारू पिऊन ) हं ! आतां गा-गातों ! ( स्वर धरतो. ) आपण ऐका मात्र हं ! आ—आ—ई—ई—!

**सारंगदेव**—मीही मीही व—वसा बोलावतो. ( हातांतील बाटलींतली दारू पिऊन ) आहा ! आतां गा.

**रणदेव**—( गळा चोळून ) गा-गातों तर. आ—( गाणं गाऊं लागतो. )

**पद**—राग वहिरवी, ताल त्रिवट.

अग सखे दारु नच प्याला । तो नर जन्मा व्यर्थचि आला ॥ ध्रु० ॥ सागरमथनीं जन्मा आली । सुरा सुरामाधें माजवीत कली ॥ प्रिय बहु जी कालीला ॥ १ ॥ चरचर कापित उतरे उदरीं । सकल दुःख चिंता पळवी दुरी ॥ सुगंध देई मुखकमलाला ॥२॥ करवी नाना शिशुच्या लीला । बोलवि बोबडे गाळित लाला ॥ पाडि लोळ धरणीला ॥ ३ ॥ वीट जियेचा कधिं न येई । वरिवरि सेवन इच्छा देई ॥ लागे मधुर पानाला ॥ ४ ॥

( कांहीं वेळपर्यंत थांबून ) हं ! सरकार आतां आ कवीचं बोलणं वरं कां ? आ ऐका !

रणदेवकवन माधुर्यानें । मोहित होउनि ही त्रीभुवनें ॥ लागुनि भजनीं गाती लीला ॥ ५ ॥

( हसत ) हं ! हं ! कसं कसं गायलं या या फाकड्यानं ?

**सारंगदेव**–( त्याला मोठ्यानें शाबासकी देऊन ) खाशी खाशी ! क्या बात है खूप बहार बहार केलीस ! आतां आतां हें पुरे ! चल त्या फाक–फाकडीला हुडकूंया ! ( उठावयास पहातो तों उठवत नाहीं असें पाहून, (दोन्ही हात वर करून) उठवा! उठवा ! कोणी तरी !

**रणदेव**–(त्याचा हात धरून ) उठावं महाराज, आस्ते आस्ते ! ( दोघे धडपडत उठतात. )

**सारंगदेव**–पण कारे ती ती **हि–याचंदाची** सून ! अंहः कोण बरं ? मु-मुलगी ! कां बायको ती रांड **ता-तारी** कुठं पळालीरे ?

**रणदेव**–मीही मीही त्याच का-काळजींत गुंग आहें ! (हसून) हः हः हः! मोठा मोठा चमत्कार आहे! **च-चतरंग**-गडावरून एवढ्या बंदींतून ती–ती पळाली कशी ? कशी ? ते ते शिपाई होते कां ह–हजाम अं ? ( गाण्याच्या चालीवर ) अग सखे माझ्या तारे कुठं गेलीस स–स–स!

**सारंगदेव**–अंः ! मूर्खा मूर्खा ती तुझी कां माझी कां–कां माझी कां तुझी ?

**रणदेव**–( छातीस हात लाऊन ) हं ! या या पट्ठयाची ! वनसीची ! आपण आपण पुढं पळून कसं–सं गुलामीनं आ-म्हांला कु कुत्र्यासारखं मागं पळायला लावलं आहे ! ( हसून ) हः हः हः **तारे** अग **तारे** कुठं आहेस ? माझ्या आई ओ तरी देग !

**सारंगदेव**–( रागाचा आवेश आणून ) माझी **तारा** ती माझी पा-पाजी नाहीं तर ! चो-चोरा तूं कोणरे घेणार ? हं!

माझी नी माझी सखी ! ( अडखळून पडतो ) अरे अरे अरे पडलों ! किती रे हे हे रस्त्यावर खळगे ! ( **रणदेव** त्यास उठवितो. )

**रणदेव**—महाराज आतां एक गम्मत मला आठवली हं ! ही पहा का-काय मजा व्हायला लागली ! आं अरेच्यामारी ! ही जमीन पहा कशी पळाय-पळायला लागली आहे । आपण आतां एक जागीं उभे राहूंया आणि अशी पळतां पळतां, ती दिसली कीं प-पकडूया ! (हंसतो) हः हः काय शान युक्ती.

**सारंगदेव**—( हंसून ) हाः हाः हाः ! खाशी; युक्ती पण पण युक्ती ! वाहवा ! दे दे ! टाळी ! ( टाळी मारून ) पण आ-आतां तुला सांगतों सां-सांपडली कीं हं ! चा- चार महिने झाले फार फार गमजा करती ! हं ठीक आहे ! ( मिशावर ताव देतो. )

**रणदेव**—पण पण माझी खटपट व्यर्थच कां ? अं ! तर मग मी कशाला दमूं ? ( ताठून उभा राहतो. )

**सारंगदेव**— मू-मू-र्खा, अरे ती ती माझी झाली कीं, तुला आई—आई प्रमाणं माझ्या ! मग तुझं काय ?

**रणदेव**—तर मग, तर मग उगीचच खटपट करूं कां ? जो जो तळं चाखीऊ, तो पाणी रा-राखील ! हं बन्सी ! फांकडा (मिशावर ताव देतो.) हः हः हः! तें कसं चुकणार ? बरं बरं तें असो असो ! मी एक गुप्त बा-बातमी आपल्याला सांगतों. त्या त्या **चंद्रसेनाला** ताईसाहेब पळवीन आपल्याकडं. अंह पळविणार ! तसं नव्हे, **चंद्रसेन** तिला तिला पळविणार; असं हं ! त्या त्या सुंदरीला सुंदरीनं सा—सा—सांगितलं !

**सारंगदेव**–काय काय ह्मटलंस ? आम–आमची **कमला** **चंद्र-चंद्रसेन्याला** माझ्याकडं पळवीत पळवीत, असं ती **सुंदरी** उंदरी ह्मणाली आणणार! ( हंसून ) हं: ह: ह: तिचा तो अपराधी असेल; करून करून टाकूं तिचं पारपत्य अं! वाहवा! ( गातो ) **सुंदरी** उंदरीरे ह्मणाली! पण पण हें कधीं कधीं होणार ?

**रणदेव**–( संशयानें ) काल कां आज, आज कां काल ? हो हो तेव्हांच!

**सारंगदेव**–( हंसून) ह: ह: ह:! मूर्ख मूर्ख कुठला! दारू दारू पिऊन भलतं बोलतो! हें बघ का–काल करूं त्या त्याचं पारिपत्य.

**रणदेव**–ठीक आहे चला तर.

( वाकडे तिकडे चालत निघतात तों **रतिपाल, चंद्रसेन** व **आनंदी** प्रवेश करीतात )

**चंद्रसेन**–मित्रा, जिकड तिकड काळोख किती पडला आहे! रात्र बरीच झाल्यानं रस्त्यावर माणसांची चाहूल ही बंद झाली आहे! ( समोरून कोणी येत आहेतसें पाहून) पण गड्या इतक्या रात्रीं हे कोणरे दोघे इकडे येत आहेत?

**रतिपाल**–अं: जाऊंदे कीं असतील कोणी भामटे! आतां काय पुसतोस, इथं बेबंद नगरी आणि झोटिंग पादशाही माजली आहे! कोणी कां असेनात; आपल्याला काय करायचं आहे ? ( **आनंदीस** ) **आनंदी** अंधेर पडला आहे. आह्मा बरोबरच ऐस.

**आनंदी**–चला चला लवकर पाय उचला.

**चंद्रसेन**—आज बुवा हिची फारच गडबड दिसते. असं काय कारण आहे, कांहीं समजत नाहीं.

**आनंदी**—तिथं गेल्यावर सारं समजेल. चला बाई लवकर बोलण्यांत गुंतूं नका .

( **सारंगदेव**—आणि **रणदेव आनंदीस** पाहून )

**सारंगदेव**—अरे ही कोणरे चा-चालली आहे? (हंसून) हः हः हः ! अरे हीचरे हीच ती. हं, सा-सांपडलीरे सांपडली ! ( **आनंदीस** कवटाळतो. )

**आनंदी**—(त्यास झिडकारून रागानें) कोणरे तुह्मी लुच्चयानों जळलीं तुमचीं तोंडं ! मेल्यानों लाजा नाहींरे वाटत ? अहो रावसाहेब धांवा हो धांवा; हे पहा कोण मेले दांडगे माझ्या अंगाला झोंबत आहेत ! इश्श रांडेच्यांच्या तोंडाला वस्सकर दारूची घाण येत आहे !

( **चंद्रसेन** व **रतिपाल** गडबडीनें तिजजवळ येऊन **सारंगदेवास** आणि **रणदेवास** गचांड्या मारून. )

**चंद्रसेन**—कोणरे तुह्मी हरामखोर लुच्यानो, दारू पिऊन छाकटे होऊन, निर्लज्जपणें ह्या गरीब स्त्रीच्या अंगास झटतां ? अरे तुह्मी लाजा कुठं ठेवल्यात? मुकाट्यानें आपल्या वाटेनें चालते व्हा; नाहीं तर पहा आपला विचार !

**सारंगदेव**—( रागाचा आवेश आणून ) को-कोणरे तूं गा-गाढवा; म—मला हरामखोर लू—लूच्चा ह्मणतोस? नीचांनो, चो-चोरासारखे रात्रीं कुणीकड हिला प-पळवून नेत आहां ? हिचा मालक ( छातीस हात लाऊन ) मी—मी आहे कधीं-कधीं अ-अ—मी हिला सोडणार नाहीं हं ! ( तिचा हात धरतो. )

**रणदेव**–( तिचा दुसरा हात धरून ) चल चल रा-रांडे बरी सांपडलीस हं ! आतां–आतां कां सुटणार आहेस आ-मच्या हातून ? ( तिला दोघे ओढतात. )

**रतिपाल**– ( त्यांच्या हातास हिसडा देतो व **आनंदी**स सोडवून त्यांची गचांडी धरून वाकवून ) चल जा नीचा कोणाचा हात धरतोस, पाजी नाहीं तर ! गाढवा, मुकाट्यानें जातोस कां, ( तरवार उपसून ) करूं दोन तुकडे इथंच ! पाजी मनुष्य; ( एक लाथ मारून ) शंका नाहींरे परस्त्रीच्या अंगाला झटावयाला वाटत ?

**आनंदी**–( आपल्याशीं ) अग बाई ! हें पहा मेलं काय लचांड आलं तें. चला चला रावसाहेब झालं इतकं पुरे ! क-शाला या मुडदारांच्या नादीं लागतां ?

**रणदेव**– ( खालीं पडून भीतीनें कांपत कांपत ) आई नाहीं. ना–नाहीं मी–मी जा-जातों.

**सारंगदेव**–( तरवार उपसून, क्रोधानें **रतिपाला**च्या अंगावर येऊन ) मुर्खा अरे हें–हें भय तूं–तूं–कोणाला दा-दाखवितोस ? चल ये अवसान असेल तर. ( तरवारीचा वार करतो तो **रतिपाल** चुकवून घेऊन, आपण त्याजवर वार करतो, अशा झटपटींत राजास वर्मी वार लागून तो निचेष्ट पडतो. )

**चंद्रसेन**–( त्यास धरून ) जाऊं दे सोड त्याला, काय आपण या पाजींच्या नादीं लागावं ?

**रतिपाल**–( रागानें ) कुठं आहे तो दुसरा गाढवाचा लेंक, अरे पाहतोस काय ? उडीव उडीव फडशा !

**रणदेव**–( उठून ) तु–तुझी फा–र–फार वाईट कर्म के-

के—केलंत. मोठा—मोठा घात! हाय! मी—सरकारांत कळवितों ( जाऊं लागतो. )

**चंद्रसेन**—( त्याच्या अंगावर जाऊन ) अरे हरामखोरा, सोडला होता ह्मणून या गोष्टी अँ? (एक वार करून ) जा जा आतां सांग जा ! ( पुन्हा तरवार उगारतो. )

**रणदेव**—( खालीं पडून ) आई मेलों म-म-मला मारूं नका, मी गरीब आहें. ( हात जोडून ) तुमच्या पाया पडतों; मी-मी कांहीं केलं नाहीं ! आई ! मला जीवदान द्या! अग बाई, रक्त वहावयाला लागलं! ( खांद्यावरचं रक्त टिपतो. )

**चंद्रसेन**—छी ! दुष्टा, अशा नीचाला सोडूं काय? तुला या दुष्कर्माचं प्रायःश्चित दिलंच पाहिजे!

**रतिपाल**—अरे पहातोस काय? लगाव ! (**चंद्रसेन** पुन्हां वार करतो. )

**चंद्रसेन**—मित्रा चल आतां एथें राहतां उपयोगीं नाहीं !

**आनंदी**—( आपल्याशीं ) अग बाई देवा, काय हें मध्येंच विघ्न आलं! चला महाराज आतां एथें उभे राहूं नका! ( आपल्याला हा मोठाच मेला अपशकुन झाला! पुढं काय होणार आहे कांहीं कळत नाहीं!

( सर्व पुढें चालूं लागतात.)

**चंद्रसेन**—गड्या हा एक मध्यें अपशकूनच झाला ह्मणायचा! काय करावं माझ्या मनाला फार रुख रुख लागली!

**रतिपाल**—अंः त्यांत काय आहे! अशा बल बलपुरी राज्यांत जर आपण आहों तर असले प्रसंग यावयाचेच! बरं चला जलदी; उशीर झाला! ( तिघे निघून जातात. )

---

## प्रवेश ३.

### स्थळ–वसंतविलास बागेंतील बंगला.

( सर्वांगाचा दाह होत असल्यामुळें **कमला** अंथरुणावर तळमळत पडली आहे व **इंदुमती, वासंतिका** वगैरे जवळ बसल्या आहेत. )

**कमला**–( व्याकुळ होऊन कण्हत ) अं! अं! आई मरते! हाय! अहो कोणी गार पाणी तरी ओता हो माझ्या अंगावर! हुःश! आई! ( तळमळते )

**इंदुमती**–( तिला कुरवाळून ) हर हर ! देवा आतां मी काय करूं? बये तुला काय होत आहे? वैद्यबुवानं बोलावणं धाडलं आहे, ते आतां येतील ! उगी! ( गजरीस ) **गजरे** आले कां वैद्यबुवा ?

( इतक्यांत **रमाकांत** वैद्यबुवा येऊन. )

**वैद्यबुवा**–( हात जोडून ) हा मी इथं हजर आहें. काय आज्ञा ?

**इंदुमती**–वैद्यबुवा ! पहा हो माझ्या बाळीला काय झालं आहे ! संध्याकाळ पासून हिच्या सर्वांगाचा दाह होऊन पहा कशी माशासारखी तळमळती आहे !

**वैद्यबुवा**–( आपणाशीं ) हंः समजलों; हें सर्व काम रोगाचं लक्षण ! ( उघड ) ताईसाहेब हात द्या पाहूं.

**कमला**–( हात पुढें करून ) **वैद्यबुवा**, माझ्या सर्वांगाला विस्तव लागला आहे ! आणि आतां मला कससंच होऊं लागलं आहे ! हाय मरते !

**इंदुमति**–( डोळ्यास पाणी आणून ) नकोग नको बये

असं बोलूं ! अरे देवा आतां कायरे करूं ! सांगाहो वैद्यबुवा कांहीं उपाय !

**वैद्यबुवा**–( नाडी पाहून ) सकाळीं मी आलों होतों, त्यावेळीं तब्येत ठीक होती आणि एकाएकीं असं होण्याचं कारण काय ? केंव्हां पासून बरं हें असं होत आहे ?

**वासंतिका**–आज तिसरा प्रहरीं आह्मी दोघी बागेंत लतामंडपांत बोलत बसलों होतों; तों हिला लागली तहान, तेंव्हां **सुंदरा**नं कुठं थोडसं साखरपाणी ह्मणून प्यायला दिलं, नंतर कांहीं वेळानं हिच्या पोटांत कलवलून सर्व अंगाचा दाह होऊं लागला आणि तेंव्हां पासून अशी बाई तळमळत आहे !

**वैद्यबुवा**–( आपणाशीं ) हं: जुळलंच; लतामंडपांत, वसंत ऋतूंत, समवयस्क मैत्रिणीशीं, एकांतीं बोलत असतां एकाएकीं असं होणं ह्मणजे हीं सारीं खास कामज्वर लक्षणं दिसत आहेत ! माधवाचार्यांनीं ह्मटलेंच आहे.

कामजेचित्तविभ्रंश स्तंद्रालस्यमभोजनम् ॥
हृदयेवेदनाचास्य गात्रंच परिशुष्यति ॥ १ ॥

त्याप्रमाणें हीं सर्व लक्षणें जुळतात. असो. ( उघड **इंदुमतीस** ) सरकार विशेष भिण्यासारखं कांहीं नाहीं किंचित् पितांश झाला आहे, आतां औषध देतों ह्मणजे बरं वाटेल. कोण आहे बाहेर वाटींतून थोडा मोरावळा घ्या बरं.

**गजरा**–जी महाराज. ( जाऊन मोरावळयाची वाटी आणून देते.

**वैद्यबुवा**–( बटव्यांतून औषधाची पुडी काढून वाटींत

घालून ) हं ताईसाहेब हें घ्या औषध म्हणजे आतां बरं वाटेल. हं उठा; म्हणा " आच्युतानंत गोविंद– "

( **कमला** उठून औषध घेते व पुन्हां पडते. )

**इंदुमति–वैद्यबुवा** तुह्माला मी पदर पसरतें ! माझ्या चिमणीला एवढी बरी करा ! मी तुमचे उपकार जन्मांतरीं विसरणार नाहीं !

**वैद्यबुवा**–(हात जोडून) वाहवा ! हें काय महाराज ! मी पायाचा नोकर आणि मला हे शब्द ! आपण अगदी काळजी करूं नये ! हे पहा, पुसा डोळे ! हें काय ? स्वस्थ असा, मी मनुष्य पाठविला आहे माझी मोठी औषधाची पेटी आणण्याकरितां, बहुतकरून तो आला असेल, आतां मी पाहून येतों. ( उठून बाहेर जातो. )

**कमला**–( शोकाकुल होऊन ) हाय ! देवा हुश्श ! अगं अग **आनंदी**, बाई तिकडचं येणं झालं कां ? प्राणनाथ अहो प्राणनाथ, धांवा हो धांवा ! प्रिया आतां ही आपली **कमला** खास वाचत नाहीं ! हाय हाय ! उद्या किंहो आपल्याशीं माझं गुप्तपणें लग्न व्हायचं होतं; आणि मध्येंच हें काय विघ्न आलं ! असो, आतां एकवार आपलं शेवटचं दर्शन या लाडकीला द्या एवढंच आपल्यापाशीं मागणं आहे ! अक्का कुठं आहेस, जवळ ये आणि मला शेवटचं प्रेमालिगन दे! तूं आपल्याकडून होता तितका प्रयत्न माझा हेतू सफल होण्याकरितां केलास; पण तें सौख्य भोगायचं माझ्या दैवीं कुठं आहे ? हाय ! आई ! ( तळमळते. )

**वासंतिका**–( तिला आलिंगून ) ताई, आहे मी जवळच आहे ! उगी रडूं नको ! हें पहा तूं सुखी असलीस, म्हणजे

माझ्या साऱ्या करण्याचं सार्थक झालं ! उगी माझी बया ! ( तिचे डोळे पुसते. )

इंदुमति–बाळे ! मला वासंतिकेकडून सर्व समजलं आहे. एक तूं सुखी असून, बाळ चंद्रसेनापाशीं कुठंही असलीस तरी चिंता नाहीं. असं झाल्यानं तिकडचा राग झाला असता, पण तो कांहीं दिवसांनीं शांतही होता, त्याची काळजी नाहीं; परंतु तुझ्या प्रकृतीची चिंता आह्मांला लागली आहे !

कमला–देवा ! केवढं माझं दैव कीं, अशा मातेच्या उदरीं मी जन्मलें ! ( शोकाकुल होऊन ) आतां तुह्मां दोघींनां माझं पदर पसरून एवढंच सांगणं आहे कीं, आमच्या लग्नाचा बेत बाबांना समजला, ह्मणजे ते प्राणनाथांचं काय करतील याचा नियम नाहीं; तेव्हां कसंही करून तिकडच्या प्राणाला धक्का न लागे अशी तजवीज करा ! तशीच त्यांची मजवर अत्यंत प्रीति असल्यामुळें, मी परलोकीं गेल्यावर अति दुःखानं भान न राहून, ते आपल्या जिवाला कांहीं भलतं सलतं करून घेतील, अथवा या सर्व संसाराचा त्याग करून कुणीकडं तरी भटकून जातील, त्यांना सांभाळा ! ( दुःखाचा सुस्कारा टाकून स्वस्थ पडते. )

इंदुमति–नकोग नको माझ्या लाडके, असं बोलूं नको ! हे शब्द ऐकून माझ्या काळजाचं पाणी होऊन गेलं ! नको असं वाईट बोलूं !

कमला–हर हर देवा ! किती मी दुर्दैवी ! इतके दिवस दुःख सोसून, शेवटीं कुठं सुखाची किंचित आशा उत्पन्न होती तों मेलं असं विपरीत व्हावं ना ? देवा स्वप्नवत किरे

हें सारं झालं ! प्राणनाथ ! आतां आपला आणि माझा अक्षयी किंहो वियोग होण्याचा प्रसंग आला ! फुटक्या नशीबा तुझ्यानें तें आमचं अकृत्रिम प्रेम पाहववलं नाहीं अं? (दुःखानें) हाय हाय देवा मी आतां कायरे करूं ! ( थोडा वेळ थांबून ) असो, होणारा पुढं उपाय नाहीं ! प्राणनाथ आतां माझी आपल्याला एवढी विनंति आहे कीं, एकदां या मंदभागिनीला सुखकर घट्ट प्रेमालिंगन द्या.! ( आलिंगावयास हात पुढें करते व कांहीं वेळ थांबून ) काय नाहीं कां आपल्या छबेलीचा हेतू परिपूर्ण करायचा ? नका नका प्रियकरा विलंब करूं नका ! आतां हें आपल्या दासीचं शेवटचं मागणं आहे ! मजकडून कांहीं अपराध झाला असेल तर त्याची क्षमा करून माझी इच्छा पूर्ण केली पाहिजे ! ( उठून हात पुढें करून ) हें काय बरं प्रिया नाहीं न माझं ऐकायचं ! .

**इंदुमति**–बये, कुणाला हाक मारीत आहेस ? अजूनी **आनंदी** आली नाहीं.

**कमला**–( निराशेनें धाडकर अथरुणावर अंग टाकून ) अग बाई नाहींच कोणी इथं ! मग मी काय हें व्यर्थ बोललें ! ( तळमळत ) हुःश ! आई, सर्वांगाचा दाह होत आहे ! घसा अगदीं कोरडा पडला ! अं पाणी, पाणी ! ( रडूं लागते. )

**वासंतिका**–( तिला पाणी देऊन वारा घालते. ) ताई उगी माझी बया. वैद्यबुवांनीं आतां औषध दिलं आहे थोड्या वेळानं बरं वाटेल ! उगी असा काय घाबरेपणा करावा ! ( तिला कुरवाळते. )

**कमला**–हंः अक्का, आतां त्या औषधानं काय होणार ?

माझ्या सर्वांगाला आग लागली आहे ! आतां हा प्राण केवळ माझ्या प्रियाच्या भेटीकरितां राहिला आहे ! हु:श ! आई ! ( किंचित डोळे झांकून पडते. )

**वासंतिका**–( **कमले**च्या तोंडाकडे पाहून ) बाई किंचित डोळा लागला बरं !

**इंदुमति**–( हळूच ) होय बोलूं नका आतां ! गजरे जा बाहेरची गडबड बंद करीव. ( गजरा जाते ) बरं झालं बाई ! आतां तिला बरं वाटेल ! हं: काय बरं झालं असावं असं हिला? कांहीं झपाटा बिपाटा तरी झाला नसेलनं? कांहीं असो; आई जगदंबे ! माझ्या बाळीला बरं वाटलं ह्मणजे मी तुझी सोन्याची प्रतिमा करून बसवीन. ( स्तब्ध बसते. )

( इतक्यांत **चंद्रसेन**, **रतिपाल** आणि **आनंदी** बागेंत प्रवेश करितात. तों सरोवराच्या बाजूनें पुढील बोलणें त्यांच्या कानीं पडतें. )

( पडद्यांत ) हाय हाय ! निर्दय **चंपकमाले** काय हें तूं केलंस! काय अविचार? अरे अरे ज्याचे केवळ देहमात्र भिन्न, पण प्राण एक! असं उभयतांचं अत्यंत प्रेम असतां, आपला सूड उगवावा ह्मणून तिला कपटानं तूं सोमल दिलासना? काय हा निर्दयपणा ! हर हर पापिणी मागचे जन्मीं काय तूं पातक केलं होतंस त्याची फळं हीं भोगीत आहेस आणि याही जन्मीं संचय करीत आहेस ! शिव शिव, कुलकलंकिणी अशी तूं जन्माला तरी कशाला आलीस! छी छी! देवा काय हा मी अनर्थ केला? देवा अशा रीतीनें सूड घेऊन त्यांत माझा तरी काय फायदा झाला? दुष्टे अग एक **चंद्रसेन** तुझा वैरी, पण **कमलेनं** तुझं काय बरं केलं होतं? नारायणा, आतां हें काळं

तोंड जगाला मी काय दाखवूं ! हे सरोवरा, ह्या पश्चात्ताप पावलेल्या कृतघ्न पापिणीला आपल्या पोटांत ठाव दे! आजपर्यंत आत्महत्त्या करूं नये असा मनाचा निर्धार होता पण आतां उपाय नाहीं! राम! (धाडकर उडी टाकल्याचा आवाज होतो.)

**चंद्रसेन**–( वरील भाषण ऐकून दुःखित अंतःकरणानें ) मित्रा घात झालारे घात झाला! हर हर ! कृतघ्न दुष्टे काय हें कर्म केलंस ! ( धाडकर जमिनीवर पडतो. )

**रतिपाल**–( त्यास सांवरून ) अरे अरे ! काय हा घोर प्रसंग ! मित्रा सावध हो सावध हो! चल लवकर तेथें जाऊन कांहीं तरी उपाय करूं! असा धीर सोडूं नको ! हें एक उत्तम झालं कीं विष घातल्याची बातमी समजली ! आतां हवे ते उपाय करितां येतील!

**चंद्रसेन**–( शोकाकुल होऊन उठून) हायग **चंपकमाले!** पापिणी तूं असा दावा साधलास अं ? गड्या तूं मला धीर देतोस, पण आतां परिणाम चांगला दिसत नाहीं ! हर हर ! प्रिये काय प्रसंग तुजवर आला !

**आनंदी**–( दुःखानें ) मेले चांडळणी, कोण्या जन्मीची दावेदारीण तूं उत्पन्न झालीस ! शिव शिव ! पापिणी याचें झाडे कुठंग देशील !

( तिघे महालांत येऊन )

**चंद्रसेन**–(**कमलेस** पाहून ) हाय हाय देवा! काय हिची स्थिति झाली! ( दुःखानें सुस्कारा टाकतो. )

**रतिपाल**–मित्रा थोडा धीर धर ! वैद्यबुवा कुठं आहेत ?

**वैद्यबुवा**–( लगबगीनें पुढें होऊन ) काय हुकूम ?

**रतिपाल**–( एका बाजूस नेऊन त्याच्या कानांत ) हे

पहा, ताईसाहेबांच्या पोटांत सोमल गेला आहे, त्यावर काय तो लवकर उपाय करा.

**वैद्यबुवा**–( विचारांत पडून आपल्याशीं ) हं:, काय करावं ? केवढं संकट हें ! हें पाहिल्यानं समजलं असतं ह्मणजे बरं झालं असतं. ( उघड ) बरं थोडं वाटींतून पाणी घ्या.

**आनंदी**–( वाटींतून पाणी देते.)

**वैद्यबुवा**–( बटव्यांतील एक पुडी वाटींत घालून ) हें द्या बरं आतां औषध.

**इंदुमति**–कायरे बाळा **रतिपाला,** तुह्मी आपापल्यामध्यें काय बोलत आहां ! **वैद्यबुवा** माझी **कमळा** वाचेलना !

**वैद्यबुवा**–हे पहा गडबडूं नका, स्वस्थ असा. लवकर तें औषध द्या अगोदर.

**आनंदी**–( औषध हातीं घेऊन ) ताईसाहेब उठा हें घ्या बरं औषध ! ( सावरून उठवून ) अरे देवा ! कायरे दशा झाली ही ! ( औषधाची वाटी तोंडापुढें नेऊन ) हं, हें घ्या ताईसाहेब.

**इंदुमति**–हं तें घे बये औषध.

**कमला**–( तळमळत ) हाय ! आई आतां कशाचं मला औषध देतां ?

**इंदुमति**–( तिला कुरवाळून ) घे घे बये असं काय बरं ! माझी चिमणी ती !

**कमला**–( औषध घेऊन ) अग आईग ! प्राणप्रिया आला कां तुह्मी ?

**वासंतिका**–ताई, अग डोळे उघडून पहा, हा पहा आला भाऊराया.

**कमला**–( डोळे उघडून ) प्रिया कोठें आहांत? हु:श, नारायणा आतां कायरे करूं! आपल्याला धांवत येऊन कडकडून आलिंगन देईन ह्मटलं, तर माझं सर्व शरीर मेलं जड झालं आहे. माझ्यानं हलवत नाहीं!

**चंद्रसेन**–नको नको प्रिये, तूं स्वस्थ ऐस. हा मी तुजजवळच आहें.

**कमला**–( दु:खित होऊन ) प्रिया कुठं आहांत? जवळ येऊन एकदां मला शेवटचं प्रेमालिंगन द्या. ( हात पुढें करिते ) नका नका अनमान करूं, आतां ही **कमला** घटकेची सोबतीण आहे! मला आतां कुणाची लाज नाहीं भीड नाहीं! प्राणनाथ कुठं आहांत?

**चंद्रसेन**–( तिला आलिंगून ) नकोग नको प्रिये असं बोलूं! हा मी तुजजवळच आहे! डोळे उघडून मजकडे पहा.

**कमला**–( दु:खानें ) हाय! प्राणनाथ आतां ही आपली दासी परलोकीं जाणार! आजपर्यंत मजमुळं आपल्याला नाना प्रकारचीं संकटं भोगावीं लागलीं, त्याबद्दल मला क्षमा करा! आणि माझ्या मागं वारंवार माझी आठवण काढून, व्यर्थ दु:ख करूं नका!

**चंद्रसेन**–हर हर! प्रिये काय हें बोलतेस? तूं मला सोडून गेल्यावर मला तरी मागं जगून काय करावयाचं आहे? शिव शिव चांडाळणी **चंपकमाले** खरी कृष्णसर्पिणी तूं! कालच मला तुजविषयीं संशय आला होता, पण मी मूर्खानं त्याची चौकशी केली नाहीं! त्याचा हा परिणाम झाला! दुष्टे, तुझ्या मनांत जर असा सूड घ्यावयाचा होता तर माझ्या प्रियेबरो-

ैर मलाही विष द्यावयाचं होतंस, ह्मणजे बरं झालं असतं! ेला तरी जिवंत कशाला ठेवलंस!

**इंदुमति**–( शोकाकुल होऊन ) बाळा **चंद्रसेना** कायरे ई ह्मणतोस! माझ्या लाडकीला कोणी विष कां दिलं?

**चंद्रसेन**–अहो माईसाहेब काय सांगूं? मागं ज्या **चंपक-माला** नांवाच्या राजकन्येची हकीकत आपल्याला सांगितली होती; तीच ती दीर्घद्वेषी राक्षशीण, कपटानं **सुंदरी** या नावानं इथं दासी होऊन राहिली होती. तिनं माझा सूड घ्यावा या हेतूनं हें कृत्य केलन! आतां आह्मी इकडे येत असतां तिच्याच तोंडून हें ऐकलं. त्या कृतकर्माबद्दल तिला पश्चात्ताप होऊन सरोवरांत उडी टाकून तिनं प्राण दिला.

**इंदुमति**–हर हर! देवा आतां कसली माझी बया वाचते! कायग मेले कृतघ्न चांडाळणी हें केलंस!

**वासंतिका**–देवा काय हा घोर प्रसंग आणलास! वैद्य-बुवा सांगा हो सांगा माझी ताई वाचेल कीं नाहीं?

**वैद्यबुवा**–दम धरा, घाबरूं नका.

**कमला**–( अंथरुणावर तळमळत ) हाय! अग आई! अहो प्राणनाथ, आतां मला कससं वाटत आहे! हाय! पोटांत दुखूं लागलं! शब्द खोल ऐकूं येऊं लागला! हात पाय जड जडसे वाटूं लागले! आई आतां मी खास वाचत नाहीं. हाय!

**चंद्रसेन**–( तिला कुरवाळून ) प्राणप्रिये नकोग असे शब्द पुन्हां बोलूं! देवा काय हें संकट आलं! प्रिये, मला सोडून कशीग चाललीस! ( मूर्छित पडतो. )

**रतिपाल**–( त्यास सांवरून ) हे पहा मित्रा, असा धीर सोडूं नको. वैद्यबुवा उपाय करीत आहेत; तुह्मी सर्व स्वस्थ असा. ताईसाहेब फार घाबरल्या आहेत, त्याना धीर द्यावयाचा सोडून हें काय भलतं ?

**कमला**–( दुःखानें ) हाय ! आई एकदां बाबांचं दर्शन शेंवटीं मला व्हावं अशी फार इच्छा होती, पण तें आतां कशानं होणार ! पहिल्या सारखं आतां त्यांचं प्रेम मजवर नाहीं, यामुळं मला फार दुःख होत आहे ! त्यांच्या चरणीं माझा साष्टांग नमस्कार सांग ! त्यांच्या मताप्रमाणं मी वागलें नाहीं, ह्मणून त्याना फार राग आला आहे, तर त्याजबद्दल मला क्षमा करा ह्मणून विनंति कर ! आणि यापुढं तरी माझ्या प्राणनाथाशी वैर करूं नका असं सांग मजबरोबर त्या वैराचाही शेवट होऊंदे. अक्का, आई तुह्मी आतां रडूं नका ! माझं कांहीं वाईट होत नाहीं ! तुह्मा दोघींनां आतां माझं सांगणं एवढंच आहे कीं, कोणत्याही उपायानं माझ्या प्रियाच्या जिवाला अपाय न होतां सौख्य होईल असं करा !

**इंदुमति**– बाळे **कमले** ! तूं कशीग आह्माला सोडून चाललीस ! ( रडूं लागते. )

**कमला**–( कण्हत ) अंः ! **अने** कुठं आहेस ?

**आनंदी**–आहे ताईसाहेब मी आपल्या पायांपाशींच बसलें आहें.

**कमला**–( तिचा हात धरून ) तुझे उपकार मजवर फार झाले आहेत, त्याची उतराई होण्याला आतां मार्ग नाहीं ! माझ्या मनांत फार होतं कीं, तुझं चांगलं करावं. असो ! मी

गेलें तरी मागं आई, अक्का, आहेत; त्या तुला कमी पडूं देणार नाहींत ! उगी रडूं नको ! **सुंदरा** कुठं आहे ?

**आनंदी**—तिनंच हो बाई चांडाळणीनं हा सारा अनर्थ केला. आणि आपण तोंड काळं करून गेली !

**कमला**—असो काय करायचं ! हाय ! ( तळमळते. )

**इंदुमति**—( तिला कुरवाळून ) माझ्या लाडके तूं सर्वांची व्यवस्था केलीस, पण तुला सोडून आमचे प्राण कसेग वाचतील ! शिव शिव ! चांडाळणी **सुंदरे** तूं खचित आमची पूर्व जन्मीची दावेदारीण होतीस ह्मणून हें असं दुष्ट कर्म केलंस ! पापिणी, अग कांहीं तरी विचार करावयाचा होतास ! किती आह्मी तुझे चोज आणि काय तुजवर प्रेम करीत होतों ! **कमले**ची तर तूं जीव कीं प्राण होतीस, ह्या सर्वांची फेड त्वां अशी करावीस काय ? हर हर दुष्टे ! तूं याची फळं कुठंग भोगशील ? देवा कसंरे हें एकाएकीं आकाश मजवर कोसळलं ! आई धरित्री तूं तरी आतां दुभंग होऊन मला पोटांत घे ! ( रडूं लागते. )

**कमला**—आई रडूं नको ! प्राणनाथ, अक्का, तुह्मी कोणीही दुःख करूं नका. मला आतां कशाची आशा उरली नाहीं ! आतां मी अक्षयी सुख भोगावयास जात आहें !

**इंदुमति**—माझ्या चिमणे, कसेग हे शब्द बोलतीस ! तुला आमचा कसाग कंटाळा आला ! बये आह्माकरितां नाहीं तर नाहीं; पण ज्या करितां तुझा जीव तिळतिळ तुटत होता त्या बाळ **चंद्रसेना**ची तरी तुला कीव येऊंदे; तुजवाचून बाळे, त्याचा जीव कसाग राहील ?

**चंद्रसेन**—हर हर! प्रिये कशीग मला इथ एकल्याला टाकून जातेस ?

**कमला**—आई, आतां मला बोलवत नाहीं; माझा प्राण कासावीस होत आहे! ( तळमळत ) हाय मरते! हे पहा, हे पहा ते यमाचे काळदूत मला न्यावयाला आले! हाय हाय! आतां मी काय करूं! कोणी सोडवाहो मला! अं:! अं:! हे पहा चांडाळ! आई! ( प्राण घोटाळतो. )

**इंदुमति, वासंतिका, व आनंदी**—अहो चाललीहो आमची वया! तिला कोणी तरी वाचवा. ( रडूं लागतात. )

**चंद्रसेन**—हाय घात झाला! ( मूर्छित पडतो. )

**रतिपाल**—देवा कायरे प्रसंग आला हा! राम राम राम! चंद्रसेना वा सावध हो! ( त्यास उठवून. ) वैद्यबुवा अहो वैद्यबुवा नाडी तरी पहा ताईसाहेबांची!

**वैद्यबुवा**—( नाडी पाहून) हं: काय प्रसंग हा! राम राम राम! ( कपाळास हात लावून स्तब्ध बसतो. )

**इंदुमति**—( हंबरडा फोडून ) अरे काळा कायरे घाला घातलास! हाय! ( धाडकर मूर्छा येऊन पडते. )

**चंद्रसेन**—(दुःखानें ) हर हर! प्रारब्धा अरे काय हें केलेंस! देवा! इतक्यांत या सुंदर शरीरावर कायरे कळा आली! प्रिये! आतां सर्व जगांत माझं कोणी राहिलं नाहीं! सखे, आई गेली, बाबा गेले, सर्व वाताहत झाली; शेवटीं पुढील सर्व सौख्याचा भार मी तुजवर ठेवून होतों तों तीही आशा आज निर्फळ झाली! असो, होणारापुढं इलाज नाहीं. प्राणवल्लभे, इश्वरकृपेनं सर्व गोष्टी आपल्या मनासारख्या होण्याचा समय आला असतां, या अभाग्याला सोडून गेली-

सना? अरे अरे! नुकतीच कुठं सौख्याची आशा उत्पन्न झाली होती तोंच अशी विपरीत दशा व्हावी काय? प्रिये, आतां तुजवांचून या जगांत मला आधार कोणाचा बरं आहे? आतां मी कुणाच्या तोंडाकडं पाहून सौख्य मानूं! प्राणदयिते, एक तूं नाहींशी झाल्यानं मी संसारसौख्याला मुकलोंग मुकलों! प्राणप्रिये, सांग सांग मजकडून असा काय अपराध घडला कीं, तूं या अभाग्याला सोडून चाललीस! एक तुजवाचून मला हें सारं जग शून्य होणार आहे! अरे अरे! काय त्या नाकाची ठेवण, गालाचा गुळगुळीतपणा, अवयवांचा गोंडसपणा, हाय हाय! सर्वच अप्रतिम! देवा, तें आज या दुर्दैव्याला नाहीं-सं झालंना? (कपाळावर हात मारून) फुटक्या नशीबा, कसंरे हात धुवून माझ्या पाठीस लागलं आहेस! प्रिये आतां मी कायग करूं! वैद्यराज तुमच्या मी पाया पडतों, तुह्माला पदर पसरतों, कसेंही करून माझ्या प्रियेला वाचवा! (तिचें मुख कुरवाळून) सखे एक शब्द तरी मजशीं बोल. हाय हाय! आतां कसली प्रिया बोलते! ते दुष्ट यमाचे पाश तिच्या हृदयाला झोंबून आंतील प्राण घेऊन गेले! (तिच्या मुखावर आपलें मुख टेकून) हाय! जगंनिवास!

**इंदुमति**–**कमळे**, बाळे कशीग निष्टुरपणानं मला सोडून जातेस! देवा असा कोणता मी तुझा अपराध केला होता ह्मणून माझ्या लाडकीची आणि माझी ताटातूट करितोस! शिव शिव! परमेश्वरा, आतां मी कायरे करूं! (शेवटचा अचका येऊन **कमलेचा** प्राण जातो.) हाय! (मूर्च्छित पडते.)

**वासंतिका**–(दुःखानें) ताई आह्मा सर्वांना दुःखसागरांत

सोडून, कशीग चाललीस ! देवा काय हा भयंकर प्रसंग ! ताई अग ताई मजशीं एकदां तरी बोल ! ( लागते. )

**चंद्रसेन**—( शोकानें कंठ दाटून) नाहींग नाहीं अक्का आतां कसली प्रिया बोलते. तिला तो दुष्ट काळ घेऊन गेला. चांडाळणी मी एक तुझा वैरी तर माझं काय पाहिजे तें करावयाचं होतंस; पण माझ्या प्रियेनं तुझं काय बरं केलं होतं अरे अरे काय हें घोरकर्म केलंस ! याचे झाडे कुठग देशील ? देवा आज या साऱ्या जगाचं भूषण नाहींसं झालं ! नारायणा कायरे वेळ आणलीस ही ! शिव शिव ! माझ्या सर्व सौख्य वृक्षावर कुऱ्हाड पडली ! प्रिये, मला अशा दुःखांत सोडून एकटीच तूं अक्षयी स्वर्गसुख भोगावयाला कशीग गेलीस ! सखे कृपा करून थांब थांब थोडा वेळ; ज्या मार्गाचं अवलंबन त्वां केलंस तसंच मलाही करणं योग्य आहे ! ( कंबरेची कट्यार उपसून उरांत मारून घेऊन पडतो. )

**रतिपाल**—( घाबरून ) मित्रा कायरे हें केलंस ! कसारे तूंही आह्माला सोडून चाललास ? ( मूर्छित पडतो )

**आनंदी**—( शोकाकुल होऊन ) हर हर ! देवा काय हा भयंकर प्रसंग ! रावसाहेब तुह्मीही कसे हो कंटाळला ! ( रडूं लागते.)

**वासंतिका**—भाऊराया तूंही कसारे बा आह्माला सोडून चाललास ! हाय हाय ! काय हें साहस ! देवा ही कट्यार किती तरी उरांत घुसली आणि काय हा रक्ताचा पाट चालला आहे ! ( रडूं लागते. )

व होऊन दुःखानें ) बाळे मला टाकून
... ? माझ्या पोटीं येऊन आजवर मी तुझं पालन
पोषण केलं असून, मला पुसल्यावांचून तूं कशीग गेलीस ! एकदां डोळे उघडून मजकडे पहा आणि एक शब्द तरी माझ्याशीं बोल ! देवा आतां मी कमला कमला या नांवानं कोणाला हाक मारूं ! कशीग तूं या काळजाला चटका लावून गेलीस ! माझ्या पोटीं पुत्र नव्हता तरी तूंच आमचा पुत्र असं समजून मी सुखांत होतें ! पण आतां मी कुणाकडं पाहून समाधान मानूं ? ( चंद्रसेनास कवटाळून) शिव शिव! बाळा ... ना! कायरे हें साहस केलंस ! बाळा कायरे तुझ्या उरां... हा रक्तश्राव होत आहे ! हर हर चिमणे तूं आणि बाळ चंद्रसेन आह्माला दुःखाग्नींत पोळत टाकून स्वर्गलोकीचं अ... ...ण्याकरितां कसेरे निघून गेला ! तुह्माला आमची कांहींच कारे कीव आली नाहीं ! नारायणा ! काय ह्या अभागिणीनं मागचे जन्मीं पातक केलं होतं ... चं फळ हें आलं शिव ! शिव ! ( दुःखाचा सुस्कारा टाकते. ( इतक्यांत एक जासूद येऊन. )

**जासूद**–( दुःखानें रडत ) बाईसाहेब आव घात झाला ! घात झाला !

**इंदुमति**–( दुःखानें ) कायरे बाबा आणखी तूं ...णार ?

**जासूद**–म्हाराज, बागच्या रस्त्यावर सरकारास्नी आनि कारभारी साबास्नी कुनी दुसमानानं ठार मारूनशानी टाकल्या !

इंदुमति–( दुःखानें ) राम! राम! अरे हा भयंकर प्रसंग शेवट झाला आज शेवट, झाला! हाय! ( धाडकन् बोल ! ( पडते. )

( पडदा पडतो. )

## पंचम अंक समाप्त.